साहसे श्रीः प्रतिवसति।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

## अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता.अकोले, जि.अहिल्यानगर




२०२४-२५

# अगस्त्य








NAAC Accridited Grade B++

प्रकाशक : डॉ.भास्कर शेळके

संपादक : डॉ.सुनील घनकुटे

ISO 9001 : 2015

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSIRY BEST COLLEGE AWARD FIRST PRIZE WINNER 2007

साहसे श्रीः प्रतिवसति ।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,अकोले

ता.अकोले, जि.अहिल्यानगर



# संपादक मंडळ

## नियतकालिक

२०२४-२५

साहसे श्रीः प्रतिवसति।
अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय,अकोले

ता.अकोले, जि.अहिल्यानगर
स्थापना : दि.०१ जुलै १९७४

NAAC Accridited grade B++

फोन नं. (०२४२४) २२१२४८, २२२७०२
Website : www.agasticollege.com
Email : acsakole2005@gmail.com

# ।। अगस्त्य ।।

## नियतकालिक

२०२४-२५

---

प्रकाशक
डॉ.भास्कर शेळके

---

संपादक
डॉ.सुनील धनकुटे

प्रकाशक :
प्राचार्य डॉ.भास्कर शेळके
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते
विज्ञान महाविद्यालय, अकोले

संपादक :
प्रा.डॉ.सुनील घनकुटे

संपादक सदस्य : वरिष्ठ महाविद्यालय
प्रा.डॉ.सुनील मोहटे
प्रा.प्रदीप बच्छाव
प्रा.गोरख इदे
प्रा.सलिम शेख
प्रा.सुप्रिया वैद्य
प्रा.पूजा धुमाळ
प्रा.चंद्रकांत कोल्हे

संपादक सदस्य : कनिष्ठ महाविद्यालय
श्री.दीपक बबन वाक्चौरे
श्री.सोमनाथ देवराम आंबरे
श्री.गंगाराम दुंदा साबळे
श्री.भारत मारुती जगधनी

प्रबंधक :
श्री.सिताराम बगाड

ले आऊट ॲण्ड डिझाईन :
श्री.हरिश कुसळकर

वेब डिझाईन :
प्रा.प्रदीप बच्छाव

मुद्रण :
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान
महाविद्यालय, अकोले
ता.अकोले, जि.अहिल्यानगर (४२२६०१)

वार्षिक नियतकालिक २०२४-२५
दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स,
नियम ८ फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती
प्रकाशन स्थळ : अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते
विज्ञान महाविद्यालय, अकोले
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
------------------------------
प्रकाशन काळ : वार्षिक
प्रकाशक : प्राचार्य डॉ.भास्कर शेळके
------------------------------
पत्ता : अगस्ति कला, वाणिज्य व
दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
संपादकाचे नाव : प्रा.डॉ.सुनील घनकुटे
राष्ट्रीयत्व : भारतीय
मालकी : अगस्ति कला, वाणिज्य व
दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले
ता.अकोले, जि.अहिल्यानगर
------------------------------

मी प्राचार्य डॉ.भास्कर शेळके जाहीर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.
प्राचार्य डॉ.भास्कर शेळके
(प्रकाशक)
------------------------------

सदर अंकात प्रसिध्द करण्यात आलेल्या
साहित्यातील मतांशी संपादक मंडळ
व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.




# अगस्त्य

## नियतकालिक २०२४-२५

## मुखपृष्ठ संकल्पना

या अंकात मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा, लोकशाही प्रक्रियेतील निवडणूका, शेतमाल, प्रसारमाध्यमे, कृषीक्षेत्र, शिक्षण, लोकसंस्कृती या विविध विषयांची विचारधारा मुखपृष्ठातून स्पष्ट होते.

## अंतरंग:

१.प्राचार्यांचे मनोगत

२.संपादकीय

३.मराठी विभाग ०३ ते ६६

४.हिंदी विभाग ६८ ते ६९

५.इंग्रजी विभाग ७१ ते ९०

६.वार्षिक अहवाल ९१ ते ११६

# प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रांनो, हा अंक आपल्या हातात देताना मनस्वी आनंद होतो आहे. सन् १९७२ मध्ये स्थापन झालेल्या अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे दि.०१/०७/१९७४ रोजी अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय स्थापन झाले. या महाविद्यालयात सन् २०२४-२५ सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. माजी प्राचार्य, माजी प्राध्यापक, माजी विद्यार्थी यांचा सन्मान केला गेला. दि.०७/०७/२०२४ रोजी इमारत उद्घाटन, स्मरणिका प्रकाशन आणि संकेतस्थळ उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हयाचे पालकमंत्री नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील, प्रमुख पाहुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. सुरेश गोसावी साहेब, दुसरे प्रमुख पाहुणे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मनोहर चासकर साहेब, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ मार्गदर्शक माजी मंत्री तथा संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मा.मधुकरराव पिचड साहेब, स्वागताध्यक्ष माजी आमदार तथा संस्थेचे कायम विश्वस्त मा.श्री.वैभवराव पिचड साहेब, प्रमुख उपस्थिती मा.श्री.गिरजाजी जाधव तसेच संस्थेचे सर्व स्वीकृत विश्वस्त, पदाधिकारी, सदस्य, माजी पदाधिकारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

महाविद्यालयाचा विकास किंवा प्रगती म्हणजे महाविद्यालय परिवारातील प्रत्येक पातळीवर सर्व घटकांचाच विकास होय. हा विकास परस्परांच्या सहकार्यानेच घडून येत असतो, याचमुळे आपण प्रगती आणि विजयाची पताका सर्वच स्तरांवर फडकवीत आहोत. क्रीडा क्षेत्रातील आपली यशस्वी घोडदौड, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना मधील विद्यार्थ्यांची भरारी, महाविद्यालयात सुरू करण्यात आलेली ग्रामीण भागातील विद्यार्थी शिकला पाहिजे व तो शिक्षणापासून वंचित राहता कामा नये याच हेतूने संस्था, प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थीनी यांच्या सहकार्यातून ३०० मुला-मुलींना मोफत राहण्याची व जेवणाची व्यवस्था कर्मवीर भाऊराव पाटील धान्य संकलन योजनेच्या माध्यमातून करण्यात आली. तसेच स्कूल कनेक्ट योजनेतून तालुक्यातील सर्व शाळांना या उपक्रमांतर्गत जोडण्यात आले.

कोणतीही शिक्षण संस्था ही समाजाचा अविभाज्य घटक असते. समाजात ज्या काही गोष्टी घडतात, त्याची दखल ही महाविद्यालयीन युवकांनी घेतलीच पाहिजे. यावर्षी मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा, गाव गाड्यातील लोकसंस्कृती तसेच समाज माध्यमांचा तरुण पिढीवर होणारा परिणाम हे विषय या अंकामध्ये घेण्यात आले आहेत. वर्षभर अनेक चांगले उपक्रम, कार्यक्रम, समारंभ, महोत्सव संपन्न झाले, पण नियतीच्या शक्ती पुढे काही चालत नाही. आपल्या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त व महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड साहेबांचे निधन झाले, त्यांचे योगदान आणि सामाजिक कार्य विसरता न येण्यासारखे आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

अखेरीस मित्र हो! महाविद्यालय परिवारातील प्रत्येक घटकांमध्ये नांदणाऱ्या हृदयातील सत्यशीलतेतूनच आपल्या महाविद्यालयाची प्रगती होत राहणार आहे, परस्परांच्या सहकार्यानेच हे होणार आहे आणि मित्रहो शेवटी मी एवढेच म्हणेन,

''झेपावणाऱ्या पंखांना परतीची तमा नसावी।नजरेत सदैव नवीन दिशा असावी।
घरट्याचे काय एवढे, बांधता येईल केव्हाही। पण क्षितिजापलिकडे झेप घेण्याची जिद्द असावी।''

**डॉ.भास्कर शेळके**
**प्राचार्य**

# संपादकीय

अगस्त्य २०२४-२५ आपल्या स्वाधीन करताना मला मनस्वी आनंद होत आहे. प्रतिवर्षी येणारे नियतकालिक हे नवीन रूपरंगात, नवीन सुगंधाने बेहोश करीत, तरुणाईच्या प्रतिभेला फुलविण्याची व अविष्कृत करण्याची जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

''हंस: श्वेते: बक: श्वेते: को भेदो बकहंसयो:।
नीरक्षीरविवेक तू, हंसे हंसे बको बक ।।''

या सुभाषिताच्या आशयाप्रमाणे नीरक्षीर न्यायाने हंसासारखी वृत्ती टिकवून दूध आणि पाण्यातील फरक जाणवण्या इतपत पुरेसे चांगले कार्य 'अगस्त्य'च्या संपादनाच्या निमित्ताने आपण करीत आहोत, हे मी नम्रपणे सांगू इच्छितो...!

मित्रहो, आपण सर्वजण ग्रामीण जीवनाचे अपत्य आहोत. आपले संगोपन व शिक्षण या गावच्या मातीशी एकरूप झाले. याचा अनुभव 'लोकसंस्कृती'मधून येतो आहे. पण आजची तरुण पिढी प्रसारमाध्यमांच्या आहारी गेल्यामुळे की काय? एकमेकांतील, घराघरातील, नात्यानात्यातील संवाद अतिशय दुर्मिळ गोष्ट होत चालली आहे. आपला चेहरा हरवत चालला असून, या मृगजळामागे धावण्यात आपल्या चिंतनाची जागा चिंतेने घेतली आहे.

मराठी भाषेला अनेक वर्षापासून अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्न झाले, याचा उहापोहही यात केला गेला आहे. लोकशाही प्रक्रियेतील निवडणुका आणि आजच्या समाज, शेतातील माल व आजच्या बाजारभाव, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर विद्यार्थ्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेतून विचार मांडून नवं विचारवंतांची भर पडलेली आहे.

दरवर्षीप्रमाणे या शैक्षणिक वर्षात घडलेल्या शैक्षणिक व महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला जावा अशा विविध उपक्रमांचा लेखाजोखा या अंकात आहे.

यावर्षी महाविद्यालयास पन्नास वर्षे पूर्ण झाल्याने हे एक सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. अनेक कार्यक्रम, समारंभ, महोत्सव संपन्न झाले, पण नियतीच्या पुढे चालत नाही. आपल्या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त व महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री माननीय मधुकररावजी पिचड साहेब यांचे निधन झाले, त्यांना महाविद्यालयाच्या वतीने विनम्र अभिवादन व श्रद्धांजली.

हा अंक पूर्णत्वास नेण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अक्षररचना करणारे व मुखपृष्ठ संकल्पना मूर्त रूपात आणणारे श्री.हरीश कुसळकर या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाने व सहकार्याने जे जे चांगले ते देण्याचा प्रयत्न केला आहे.

सर्वांचे मनस्वी आभार.

या अंकात त्रुटी या व्यक्तिगत उणिवेमुळे असतील.

**डॉ.सुनील घनकुटे**
**संपादक**

# ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



## स्व.मधुकररावजी पिचड

माजी आदिवासी विकास मंत्री

(कार्यकारी विश्वस्त, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी,अकोले)

## मा.विश्वस्त मंडळ



**मा.श्री.मधुकररावजी पिचड साहेब**
माजी आदिवासी विकास मंत्री तथा कार्यकारी विश्वस्त

कायम विश्वस्त



मा.श्री.गिरजाजी पा.जाधव

कायम विश्वस्त



मा.श्री.वैभवराव पिचड

### स्वीकृत विश्वस्त



मा.श्री.मधुकरराव सोनवणे



मा.श्री.सुरेशराव कोते



मा.श्री.संपतराव वैद्य

# संस्था पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य



मा.श्री.सुनिल बबनराव दातीर
अध्यक्ष



मा.श्री.सुधाकर दिनकरराव देशमुख
सेक्रेटरी



मा.श्री.धनंजय मधुकर संत
खजिनदार



डॉ.दामोधर कारभारी सहाणे
सदस्य



श्री.यशवंत दशरथ आभाळे
सदस्य



श्रीम.कल्पना अजित सुरपुरिया
सदस्य



मा.श्री.सुधाकर काशिनाथ आरोटे
सदस्य



ॲड.श्री.आनंदराव निवृत्ती नवले
सदस्य



मा.श्री.रमेश हरिभाऊ जगताप
सदस्य



मा.श्री.शरद विश्वासराव देशमुख
सदस्य



मा.श्री.मच्छिंद्र पांडुरंग धुमाळ
सदस्य

# महाविद्यालय प्रशासन



**डॉ.भास्कर शेळके**
प्राचार्य



**डॉ.ए.एम.दातीर**
उपप्राचार्य



**डॉ.एस.एस.गायकवाड**
उपप्राचार्य



**डॉ.एस.ए.पाळंदे**
उपप्राचार्य



**प्रा.चांगदेव डोंगरे**
उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय



**प्रा.विवेककुमार वाकचौरे**
पर्यवेक्षक



**श्री.सिताराम बगाड**
प्रबंधक



**प्रा.डॉ.शिवाजी खेमनर**
शैक्षणिक व संशोधन समन्वयक
प्रमुख, गुणवत्ता सुधार योजना



**प्रा.डॉ.किरण जाधव**
विद्यार्थी कल्याण अधिकारी

## कनिष्ठ महाविद्यालय व्यवस्थापन समिती

- मा.श्री.सुनील बबनराव दातीर - अध्यक्ष
- मा.श्री.सुधाकर दिनकरराव देशमुख- सदस्य
- मा.श्री.धनंजय मधुकर संत - सदस्य
- मा.श्रीमती कल्पना अजित सुरपुरिया- सदस्या
- मा.श्री.चांगदेव डोंगरे (उपप्राचार्य)- सदस्य
- मा.श्री.विवेककुमार वाकचौरे (पर्यवेक्षक)- सदस्य
- मा.श्री.एस.जी.टिक्कल (शिक्षक प्रतिनिधी) सदस्य
- मा.डॉ.ए.एन.धीवर (शिक्षक प्रतिनिधी) - सदस्य
- मा.डॉ.भास्कर शेळके (प्राचार्य) - पदसिद्ध सचिव

# महाविद्यालय विकास समिती



मा.डॉ.भास्कर शेळके
प्राचार्य



मा.श्री.सुधाकर देशमुख
सेक्रेटरी



मा.श्री.सुनील दातीर
अध्यक्ष



डॉ.ए.एम.दातीर
उपप्राचार्य



डॉ.एस.एस.गायकवाड
उपप्राचार्य



डॉ.एस.ए.पाळंदे
उपप्राचार्य



डॉ.के.एस.जाधव
विभागप्रमुख प्रतिनिधी सदस्य



डॉ.एम.डी.सय्यद
महिला प्राध्यापक प्रतिनिधी



डॉ.एस.जी.बावळे
समन्वयक, नॅक



श्री.बी.एम.सावंत
शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी



डॉ.तुकाराम रोंगटे
सदस्य-संशोधन क्षेत्र



प्रा.विकास नवले
सदस्य - शिक्षण क्षेत्र



श्री.नितीन गोडसे
सदस्य-उद्योग क्षेत्र



श्री.अनिल गायकवाड
सदस्य-सामाजिक क्षेत्र



डॉ.एस.एम.सोनवणे
प्राध्यापक प्रतिनिधी



डॉ.एस.बी.खेमनर
प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा.व्ही.के.भांगरे
प्राध्यापक प्रतिनिधी (निमंत्रीत)



प्रा.एस.एस.शेटे
महिला प्राध्यापक प्रतिनिधी (निमंत्रीत)

## महिला अत्याचार प्रतिबंधक समिती:

प्राचार्य डॉ.भास्कर शेळके - अध्यक्ष
प्रा.डॉ.अशोक दातीर - उपप्राचार्य
प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड - उपप्राचार्य
प्रा.डॉ.सचिन पाळंदे - उपप्राचार्य
प्रा.डॉ.किरण जाधव - विद्यार्थी विकास अधिकारी
श्री.सीताराम बगाड - प्रबंधक
प्रा.डॉ.महेजबिन सय्यद - प्राध्यापिका
प्रा.सुरेखा आरोटे - प्राध्यापिका
श्रीमती अनिता सहाणे - कार्यालय प्रतिनिधी
श्रीमती पुष्पावती भुजबळ - कार्यालय प्रतिनिधी
कु.करिष्मा नवनाथ मधे - विद्यार्थिनी प्रतिनिधी
कु.राणी प्रकाश पवार - विद्यार्थिनी प्रतिनिधी

## केंद्रीय माहिती अधिनियम २००५ समिती

प्राचार्य डॉ.भास्कर शेळके - अपिलीय अधिकारी
प्रा.डॉ.देवदत्त शेटे - जन माहिती अधिकारी
श्री.सीताराम बगाड - सहा.जन माहिती अधिकारी

## अनुसूचित जाती : विशेष मार्गदर्शन शिष्यवृत्ती माहिती कक्ष

संपर्क नोडल अधिकारी :
१.प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड
२.प्रा.डॉ.संपतराव सोनवणे
३.प्रा.सोपान साळवे
४.प्रा.डॉ.राहूल वाघमारे
५.प्रा.डॉ.रंजना कदम

## रॅगिंग प्रतिबंधक समिती

प्रा.डॉ.किरण जाधव - विद्यार्थी विकास अधिकारी
श्री.सीताराम बगाड - प्रबंधक
ॲड.सौ.मंगला हांडे - वकील
श्रीमती पूजा नवले - शिक्षकेत्तर प्रतिनिधी
श्री.सखाराम पथवे - शिक्षकेत्तर प्रतिनिधी
मा.पोलिस उपनिरीक्षक - सदस्य

## विद्यार्थी तक्रार निवारण समिती

डॉ.भास्कर शेळके - प्राचार्य
प्रा.डॉ.अशोक दातीर - उपप्राचार्य
प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड - उपप्राचार्य
प्रा.डॉ.सचिन पाळंदे - उपप्राचार्य
प्रा.डॉ.किरण जाधव - विद्यार्थी विकास अधिकारी
प्रा.डॉ.विजय भगत - ज्येष्ठ प्राध्यापक
प्रा.डॉ.रंजना कदम - ज्येष्ठ प्राध्यापक(महिला)
प्रा.डॉ.महेजबिन सय्यद - ज्येष्ठ प्राध्यापक(महिला)
श्री.सीताराम बगाड - प्रबंधक
ॲड.मंगला हांडे - सल्लागार
श्री.सखाराम पथवे - प्रतिनिधी
श्री.अमोल वैद्य - पत्रकार प्रतिनिधी
पोलिस निरीक्षक - कायम सदस्य
कु.करिष्मा मधे - विद्यार्थी प्रतिनिधी
कु.राणी पवार - विद्यार्थी प्रतिनिधी

## अंतर्गत तक्रार समिती

प्रा.डॉ.महेजबिन सय्यद - अधिकारी
प्रा.डॉ.रंजना कदम - प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा.सुरेखा आरोटे - प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा.कोमल राठी - प्राध्यापक प्रतिनिधी
ॲड.श्रध्दा गोसावी - वकील
श्रीमती ज्योत्स्ना कदम - सदस्य, लोकपंचायत
प्रा.डॉ.संपत सोनवणे - प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा.डॉ.शिवाजी खेमनर - प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा.काशिनाथ गुंजाळ - प्राध्यापक प्रतिनिधी
श्री.सीताराम बगाड - प्रबंधक
श्रीमती अनिता सहाणे - शिक्षकेत्तर प्रतिनिधी
कु.पूजा वाळेकर - विद्यार्थी प्रतिनिधी
कु.श्रध्दा मोहिते - विद्यार्थी प्रतिनिधी
कु.समीक्षा गीते - विद्यार्थी प्रतिनिधी
कु.इशान भोसले - विद्यार्थी प्रतिनिधी

## समान संधी सेल - दिव्यांग विद्यार्थी समिती

प्राचार्य डॉ.भास्कर शेळके - चेअरमन
प्रा.डॉ.अशोक दातीर - उपप्राचार्य
प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड - उपप्राचार्य
कॅप्टन डॉ.सचिन पाळंदे - उपप्राचार्य
प्रा.डॉ.किरण जाधव - विद्यार्थी कल्याण अधिकारी
प्रा.डॉ.सुरिंदर वावळे - आय.क्यु.ए.सी.समन्वयक
प्रा.डॉ.महेजबीन सय्यद - प्राध्यापिका प्रतिनिधी
प्रा.पुनम वैद्य - समन्वयक
प्रा.अश्पाक पठाण - प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा.अरुण वाकचौरे - प्राध्यापक प्रतिनिधी
श्री.दीपक जाधव - कार्यालय प्रतिनिधी
श्री.किशोर धुमाळ - कार्यालय प्रतिनिधी
कु.करिश्मा मधे - विद्यार्थिनी प्रतिनिधी
कु.राणी पवार - विद्यार्थिनी प्रतिनिधी

## सुवर्ण महोत्सव



महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सव कार्यक्रमास उपस्थित जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पा.,सा.फुले.पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी, नांदेड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर, संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड आदी.



विद्यार्थी ग्राहक भांडार व सेतू कार्यालयाचे उद्घाटन करताना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पा.,सा.फुले.पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी, नांदेड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर, संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड आदी.




महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमानिमित्त महामानवांना अभिवादन करताना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पा.



'सुवर्ण अगस्त्य' या अंकाचे प्रकाशन करताना पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पा., कार्यकारी विश्वस्त माजी मंत्री मधुकरराव पिचड, कायम विश्वस्त वैभवराव पिचड, अध्यक्ष सुनील दातीर, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, संपादक डॉ.सुनील शिंदे व मान्यवर.



विद्यार्थी ग्राहक भांडार व सेतू कार्यालयाचे उद्घाटन तसेच सुवर्ण अगस्त्य स्मरणिकेचे प्रकाशन प्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी मंत्री मधुकरराव पिचड, व्यासपीठावर उपलब्ध मान्यवर.

## सुवर्ण महोत्सव दिंडी









महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त महाविद्यालयात 'सुवर्ण महोत्सव दिंडी' चे आयोजन करण्यात आले. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. या दिंडीतील काही क्षणचित्रे.

## सुवर्ण महोत्सव




विद्यार्थी ग्राहक भांडार व सेतू कार्यालयाचे उद्घाटन तसेच सुवर्ण अगस्त्य स्मरणिकेचे प्रकाशन व संस्था संकेतस्थळ उद्घाटनप्रसंगी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचा गौरव करताना पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील. यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.



सुवर्ण महोत्सवानिमित्त माजी प्राचार्य श्री.एम.डी.कराडकर यांचा गौरव करताना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी, नांदेड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मधुकरराव पिचड.



सुवर्ण महोत्सवानिमित्त संस्थापक कालकथित दादासाहेब रुपवते यांचे वारस ॲड.संघराज रुपवते व उत्कर्षाताई रुपवते यांचा सन्मान करताना कायम विश्वस्त मा.गिरजाजी जाधव व कार्यकारिणी सदस्या श्रीमती कल्पनाताई सुरपुरिया.



विद्यार्थी ग्राहक भांडार व सेतू कार्यालयाचे उद्घाटन तसेच सुवर्ण अगस्त्य स्मरणिकेचे प्रकाशन व संस्था संकेतस्थळ उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील. यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

## मा.मधुकररावजी पिचड ग्रंथतुला











संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मा.श्री.मधुकरराव पिचड यांचे वाढदिवसानिमित्त ग्रंथतुला करण्यात आली. तसेच यानिमित्त इ.१० व इ.१२ वी परीक्षेतील यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.
या सोहळ्यातील काही क्षणचित्रे.

## स्व.मधुकरराव पिचड पुर्णाकृती पुतळा भूमिपूजन









संस्थेचे कार्यकारी विश्वस्त स्व.मधुकरराव पिचड यांचे १० फूटी पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन
पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील, ज्येष्ठ नेते दशरथ सावंत व य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजीव सोनवणे,
संस्थेचे कायम विश्वस्त मा.श्री.गिरजाजी जाधव, कायम विश्वस्त वैभवराव पिचड, सर्व पिचड कुटुंबिय
व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. या सोहळ्यातील काही क्षणचित्रे.

## स्व.मधुकरराव पिचड पूर्णाकृती पुतळा भूमिपूजन



संस्थेचे कार्यकारी विश्वस्त स्व.मधुकरराव पिचड यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन करताना संस्थेचे कायम विश्वस्त वैभवराव पिचड व इतर मान्यवर.



संस्थेचे कार्यकारी विश्वस्त स्व.मधुकरराव पिचड यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन प्रसंगी उपस्थित सर्व पिचड कुटुंबिय.



संस्थेचे कार्यकारी विश्वस्त स्व.मधुकरराव पिचड यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन प्रसंगी उपस्थित कुलगुरु डॉ.संजीव सोनवणे यांचा सन्मान करताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर.



संस्थेचे कार्यकारी विश्वस्त स्व.मधुकरराव पिचड यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख.



संस्थेचे कार्यकारी विश्वस्त स्व.मधुकरराव पिचड यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याप्रसंगी मुख्याध्यापक श्री.राजेंद्र सोनवणे व विद्यार्थ्यांचा सन्मान करताना कायम विश्वस्त मा.श्री.वैभवराव पिचड, अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर आदी.



संस्थेचे कार्यकारी विश्वस्त स्व.मधुकरराव पिचड यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्याप्रसंगी मार्गदर्शन करताना पालकमंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील.

## पारितोषिक वितरण



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराचे कुलगुरु डॉ.ज्ञानदेव म्हस्के यांना मानवंदना देताना एन.सी.सी. कॅडेट.



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभास दीपप्रज्वलन करून प्रारंभ करताना मान्यवर.



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराचे कुलगुरु मा.डॉ.ज्ञानदेव म्हस्के. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराचे कुलगुरु डॉ.ज्ञानदेव म्हस्के यांचा गौरव करताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड. समवेत कायम विश्वस्त मा.गिरजाजी जाधव, स्वी.विश्वस्त मा.संपतराव वैद्य, मा.सुरेशराव कोते, मा.मधुकरराव सोनवणे, अध्यक्ष मा.सुनील दातीर व इतर मान्यवर.

## पारितोषिक वितरण



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात 'बेस्ट स्टुडंट ऑफ द इअर' अवॉर्ड ने विद्यार्थ्याला सन्मानित करताना कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराचे कुलगुरु डॉ.ज्ञानदेव म्हस्के, संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड, कायम विश्वस्त मा.गिरजाजी जाधव, स्वी.विश्वस्त मा.संपतराव वैद्य, मा.सुरेशराव कोते, मा.मधुकरराव सोनवणे, अध्यक्ष मा.सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख व इतर मान्यवर.



महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरणात सन्मानित करण्यात आलेले महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मान्यवरांसमवेत.

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराचे कुलगुरु डॉ.ज्ञानदेव म्हस्के यांचे हस्ते राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत उत्कृष्ट संघ म्हणून फिरता करंडक स्विकारताना विद्यार्थिनी कु.मयुरी कानवडे व कु.करिष्मा मधे. व्यासपीठावर उपस्थित इतर मान्यवर.



## स्नेहसंमेलन









महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनातील गीतगायन, नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थिनी.



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनात सहभागी विद्यार्थिनी. समवेत कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापिका.

## स्नेहसंमेलन





महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनात लावणी सादर करताना विद्यार्थिनी व विद्यार्थी.



महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनात डांगी नृत्य सादर करताना विद्यार्थी.

## वाणिज्य महोत्सव



महाविद्यालयात आयोजित वाणिज्य महोत्सवास दीपप्रज्वलन करुन प्रारंभ करताना मान्यवर.



महाविद्यालयात आयोजित वाणिज्य महोत्सवाचे प्रमुख पाहुणे श्रमिक डेअरी समुहाचे मा.श्री.अमित नवले यांना सन्मानित करतानासंस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.अशोक दातीर, उपप्राचार्य व विभाग प्रमुख डॉ.सचिन पाळंदे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री.चांगदेव डोंगरे, प्रा.डॉ.देवदत्त शेटे व मान्यवर.



महाविद्यालयात आयोजित वाणिज्य महोत्सवात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.भास्कर शेळके.

## आय.टी. महोत्सव



महाविद्यालयात आयोजित आय.टी. महोत्सवात मार्गदर्शन करताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड.



महाविद्यालयात आयोजित कार्यक्रम प्रसंगी वृक्षारोपण करताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड. समवेत अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, कार्यकारिणी सदस्य मा.श्री.शरदराव देशमुख, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके व मान्यवर.



महाविद्यालयात आयोजित आय.टी. महोत्सवात मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर.



महाविद्यालयात आयोजित आय.टी. महोत्सवाचे उद्घाटन करताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.वैभवराव पिचड. समवेत कायम विश्वस्त मा.गिरजाजी जाधव,अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, कार्यकारिणी सदस्य मा.श्री.शरदराव देशमुख, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, विभाग प्रमुख प्रा.काशिनाथ गुंजाळ व मान्यवर.

## आय.टी.विभाग





महाविद्यालयात आय.टी. विभागाच्या वतीने विविध ठिकाणी शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आले.

## अजीवन व अध्ययन विभाग



आजीवन अध्ययन विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमास दीपप्रज्वलन करून प्रारंभ करताना मान्यवर.



आजीवन अध्ययन विभागाच्या वतीने आयोजित महिला सबलीकरण कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.मोहनराव बोरसे.



आजीवन अध्ययन विभागाच्या वतीने आयोजित महिला सबलीकरण कार्यक्रमात
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वकील मा.श्री.भाऊसाहेब गोडसे.

## स्वातंत्र्य दिन









स्वातंत्र्य दिन कार्यक्रमात ध्वजारोहन करताना मा.प्राचार्य डॉ.भास्कर शेळके. संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, कार्यकारिणी सदस्या श्रीमती कल्पनाताई सुरपुरिया, तसेच लेफ्टनंट सचिन पाळंदे आदी. यावेळी प्रारंभी २६/११ स्मारकासमोर शहीदांना मानवंदना देण्यात आली तसेच मा.प्राचार्य यांनी मार्गदर्शन केले. एन.सी.सी. कॅडेटच्या वतीने करण्यात आलेल्या परेडची मान्यवरांकडून पाहणी करण्यात आली.

## प्रजासत्ताक दिन






प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहन करताना संस्थेचे कायम विश्वस्त मा.श्री.वैभवराव पिचड व मा.प्राचार्य डॉ.भास्कर शेळके.
संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, कार्यकारिणी सदस्या श्रीमती कल्पनाताई सुरपुरिया,
तसेच लेफ्टनंट सचिन पाळंदे, प्रा.सुरेखा गुंजाळ, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी.
यावेळी प्रारंभी २६/११ स्मारकासमोर शहीदांना मानवंदना देण्यात आली तसेच मा.प्राचार्य यांनी मार्गदर्शन केले.
एन.सी.सी. कॅडेटच्या वतीने करण्यात आलेल्या परेडची मान्यवरांकडून पाहणी करण्यात आली.

## ग्रंथालय विभाग




महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत लेखक व विद्यार्थी संवाद कार्यक्रमास उपस्थित मा.प्राचार्य डॉ.भास्कर शेळके व सर्व प्राध्यापक.



'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' कार्यक्रमांतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा व सामहीक वाचन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ग्रंथपाल श्री.प्रदीप बच्छाव.



ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना ज्येष्ठ ब:हिस्थ वाचक इंजि.शांताराम शेळके. समवेत संस्थेचे शिक्षणाधिकारी मा.श्री.एस.पी.मालुंजकर, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.अशोक दातीर, डॉ.साहेबराव गायकवाड, सहा.ग्रंथपाल डॉ.प्रविण घुले व प्राध्यापक तसेच विद्यार्थी.






महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रानकवी श्री.तुकाराम धांडे व ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अनिल सहस्त्रबुध्दे.

## जागतिक आदिवासी दिन



दि.९ ऑगस्ट २०२४ रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.





जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.भास्कर शेळके.



जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी - विद्यार्थिनी व मान्यवर .

## कला विभाग




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वक्ते, व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.



कला महोत्सवांतर्गत आयोजित काव्य वाचन स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी.समवेत उपप्राचार्य डॉ.साहेबराव गायकवाड.



महाविद्यालयात आयोजित 'लेखक आपल्या भेटीला' कार्यक्रमात मार्गदर्शन करताना वक्ते डॉ.अविनाश सांगोलेकर,
समवेत उपस्थित मान्यवर.

## कनिष्ठ महाविद्यालय : विविध उपक्रम



कनिष्ठ महाविद्यालयांतर्गत दि.१० ऑगस्ट २०२४ रोजी इ.१२ वी विज्ञान वर्गाचा पालक मेळावा संपन्न झाला.



कनिष्ठ महाविद्यालयांतर्गत पारंपरिक दिवस विविध वेषभुषेत सादर करताना विद्यार्थी व विद्यार्थिनी.

## विविध उपक्रम



महाविद्यालयात वृक्षारोपण करताना कार्यकारी विश्वस्त मा.श्री.मधुकरराव पिचड, अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य व प्राध्यापक.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनी महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे समन्वयक प्रा.डॉ.धनराज हाडुळे यांना जगन्नाथ राठी पुरस्काराने गौरविण्यात आले.




महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर. व्यासपीठावर उपस्थित सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.साहेबराव गायकवाड आदी.



महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.रंजना कदम लिखीत 'विचारवेध' पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरु डॉ.ज्ञानेदव म्हस्के, संस्थेचे कायम विश्वस्त मा.आ.वैभवराव पिचड, कायम विश्वस्त मा.श्री. गिरजाजी जाधव, स्वी.विश्वस्त मधुकरराव सोनवणे, अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, कार्यकारिणी सदस्या मा.श्रीमती कल्पना सुरपुरिया, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके.

## क्रीडा विभाग (वरिष्ठ महाविद्यालय)



महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य श्री.संजय लांडगे आदींसह सहभागी विद्यार्थी.



महाविद्यालयात आयोजित आंतरविभागीय बेसबॉल मुली स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शा.शिक्षण व क्रीडा विभागाचे कक्षाधिकारी मा.श्री.दत्ता उत्तेकर यांचा सन्मान करताना संस्थेचे अध्यक्ष श्री.सुनिल दातीर, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, एम.बी.ए., एम.सी.ए. चे संचालक डॉ.प्रशांत तांबे.



महाविद्यालयाचा विद्यार्थी कु.वैभव मुठे याची तलाठी पदावर नियुक्ती झाल्याबद्दल गौरव करताना संस्थेचे अध्यक्ष श्री.सुनिल दातीर, श्री.सुधाकर देशमुख, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, शा.शिक्षण संचालक डॉ.राहुल भोसले.



आंतरविभागीय बेसबॉल (मुली) स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी.

## क्रीडा विभाग (कनिष्ठ महाविद्यालय)



तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त खेळाडूंसह संस्थेचे अध्यक्ष श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी श्री.सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत,कार्यकारिणी सदस्य श्री.शरदराव देशमुख, श्री.सुधाकर आरोटे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके आदी.



तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेतील विजेता व जिल्हास्तरीय उपविजेता मुलींचा संघ. समवेत मार्गदर्शक क्रीडा शिक्षक.



तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेतील विजेता मुलांचा संघ. समवेत क्रीडा शिक्षक प्रा.योगेश उगले.



राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी मुलींच्या संघात निवड झाल्याबद्दल कु.शारदा इंद्रभान उघडे हिचे अभिनंदन करताना संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, उपप्राचार्य श्री.चांगदेव डोंगरे, क्रीडा शिक्षक प्रा.योगेश उगले व प्रा.संगिता नवले.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिक करताना प्राध्यापक व प्राध्यापिका.

## कनिष्ठ महाविद्यालय : विविध उपक्रम



प्रा.चं.का.देशमुख यांचेकडून 'आम्ही अधिकारी झालो' या पुस्तकाच्या १०० प्रतींचे विद्यार्थी व ग्रंथालयास वाटप करण्यात आले.



सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय,संगमनेर येथे कवी अनंत फंदी स्मृती करंडक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणारी विद्यार्थिनी कु.ज्ञानेश्वरी अरविंद नाईकवाडी हीने लहान गटात प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल गौरव करताना मान्यवर.समवेत प्रा.मनिषा गोडसे.



परसबागेत श्रमदान करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी



रानभाज्या महोत्सव व महिला सन्मान मेळाव्यात सहभागी विद्यार्थी -विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षक.



दि.५ ऑगस्ट २०२४ ते दि.४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान राबविण्यात आले. यानिमित्त आयोजित रॅलीस प्रारंभ करताना उपप्राचार्य श्री.चांगदेव डोंगरे.

## कनिष्ठ महाविद्यालय : विविध उपक्रम



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील फिजीक्स डिपार्टमेंट येथे इंडियन फिजिक्स असोसिएशनतर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ.ए.आर.भिडे पुरस्कार स्विकारताना प्रा.विवेककुमार वाकचौरे.




पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष सुनील दातीर, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य श्री.संजय लांडगे.




विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन करताना युनिक ॲकॅडमी संगमनेरचे श्री.गोडसे सर.




पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भास्कर शेळके .

## राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे आयोजित शिबीरास भेट देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके आदींसह ग्रामस्थ.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे आयोजित शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रम अधिकारी डॉ.शिवाजी खेमनर. समवेत उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक व प्राध्यापक.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे आयोजित शिबीरामध्ये श्रमदान करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक.



## राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे आयोजित शिबीरास भेट देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करताना संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी मा.श्री.सुधाकर देशमुख, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके आदींसह ग्रामस्थ.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे आयोजित शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रम अधिकारी डॉ.शिवाजी खेमनर. समवेत उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक व प्राध्यापक.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने तांभोळ येथे आयोजित शिबीरामध्ये श्रमदान करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक.



## राष्ट्रीय सेवा योजना




श्री गणेश विसर्जन अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने श्री.गणेश मूर्ती व निर्माल्य संकलन करण्यात आले.
यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ.शिवाजी खेमनर, डॉ.विजय काळे व सर्व स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने पोस्टर प्रदर्शनाची पाहणी करताना कार्यक्रम अधिकारी डॉ.शिवाजी खेमनर, डॉ.विजय काळे,
डॉ.सुरिंदर वावळे, डॉ.सुनील घनकुटे, प्रा.गावंडे, प्रा.गणेश भांगरे, प्रा.सलिम शेख, प्रा.वाघमारे व सर्व स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी.

## एन.सी.सी.विभाग



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.पराग काळकर यांना सन्मान गार्ड, मानवंदना देताना एन.सी.सी. छात्रसैनिक.सोबत कायम विश्वस्त श्री.वैभवराव पिचड, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके,राष्ट्रीय छात्र सेनाअधिकारी कॅप्टन डॉ.सचिन पाळंदे.



महाविद्यालयाची एन.सी.सी.
कॅडेट कु.जयश्री मंडलिक
हीची प्रथम पुणे चालक पदी निवड झाली.



ऑपरेशन सिंदूर या भारतीय सेना दलाच्या मिशन ऑपरेशनमध्ये राष्ट्रीय छात्र सेनेचे माजी एन.सी.सी.छात्र सैनिक सार्जंट अशोक भालेराव, सार्जंट शुभम वैद्य यांनी यशस्वीकामगिरी केल्याबद्दल गौरविताना संस्थेचे कायम विश्वस्त श्री.गिरजाजी जाधव,अध्यक्ष श्री.सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, मेजर बी.आर.शिंदे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी कॅप्टन डॉ.सचिन पाळंदे.



राष्ट्रीय संविधान दिवसानिमित्ताने राष्ट्रीय छात्र सेना प्रभात फेरी काढण्यात आली व एकता मुकबधीर विद्यालयात मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. प्रसंगी सी.टी.ओ.प्रा.सुरेखा गुंजाळ, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि राष्ट्रीय छात्र सैनिक.

## मराठी विभाग




प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे येथे आयोजित पथनाट्य स्पर्धेत सहभागी विद्यार्थी - विद्यार्थिनी.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध येथे आयोजित पथनाट्य स्पर्धेत सहभागी विद्यार्थी - विद्यार्थिनी.



रतनगड येथे आयोजित सहलीमध्ये सहभागी विद्यार्थी- विद्यार्थिनी.




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सादरीकरण करताना विद्यार्थी. समवेत प्रमुख पाहुणे साहित्यिक डॉ.सुनील शिंदे, प्राचार्य डॉ.भास्कर शेळके, उपप्राचार्य डॉ.साहेबराव गायकवाड, मराठी विभागाचे सर्व प्राध्यापक व उपस्थित मान्यवर.

## गुणगौरव...






सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६ व्या पदवीदान समारंभात महाविद्यालयाचा विद्यार्थी कु.शुभम दातखिळे याचा गौरव करताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मा.ना.चंद्रकांत दादा पाटील, प्रमुख पाहुणे राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता समितीचे अध्यक्ष, प्रा.डॉ.अनिल सहस्त्रबुध्दे, कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी आदी मान्यवर.

## नवरात्रोत्सव

नवरात्रोत्सवानिमित्त कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित दांडिया - गरबा उत्सवात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.भास्कर शेळके. समवेत उपप्राचार्य प्रा.चांगदेव डोंगरे, पर्यवेक्षक प्रा.विवेककुमार वाकचौरे. प्रा.मनिषा गोडसे आदी.





नवरात्रोत्सवानिमित्त कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित दांडिया - गरबा उत्सवात नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.

नवरात्रोत्सवानिमित्त कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित दांडिया - गरबा उत्सवात नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.



# मराठी विभाग

प्रा.डॉ.सुनील घनकुटे
प्रा.दीपक वाक्चौरे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | माझं गाव - सानिका लहू कोल्हाळ | ०३ |
| २ | गर्दणी गावची संस्कृती - कु.वर्षा लक्ष्मण जेडगुले | ०४ ते ०७ |
| ३ | पांगरी गावची संस्कृती - प्रा.चांगदेव डोंगरे | ०८ ते ०९ |
| ४ | संगीत (पद्य) - कु.गौरी संजय शेळके | ०९ |
| ५ | लोकसंस्कृती - कु.समृध्दी मधुकर इरनक | १० |
| ६ | भारतीय लोकसंस्कृती - कु.गौतमी संतोष खांबेकर | ११ |
| ७ | लोकसंस्कृती - कु.अक्षदा प्रताप सावंत | १२ ते १३ |
| ८ | लोकशाही (पद्य) - कु.श्रुती अनिल सोनवणे | १३ |
| ९ | लोकसंस्कृती (पद्य) - कु.हर्षदा नवनाथ कोकणे | १४ |
| १० | मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा - कु.सानिका लहू कोल्हाळ | १५ ते १६ |
| ११ | भाषेला अभिजात दर्जा मिळणे का महत्त्वाचे आहे - कु.ऐश्वर्या भास्कर कानवडे | १७ ते १९ |
| १२ | मराठी भाषा - कु.मोहिनी दिलीप गुंड | २० ते २२ |
| १३ | आजची तरुण पिढी आणि प्रसार माध्यमे - कु.हर्षदा मधुकर शेटे | २३ ते २४ |
| १४ | तरुण पिढी, समाज माध्यमे आणि देशाचा विकास - श्रीमती अनिता दगडू सहाणे | २५ ते २६ |
| १५ | तरुणाईच्या सृजनशिलतेच्या संवर्धनासाठी समाज माध्यमे - कु.काजल बाळचंद कोरडे | २७ ते ३० |
| १६ | समाज माध्यमे आणि युवकांचे अधिकार - कु.संस्कृती सचिन शिर्के | ३१ |
| १७ | आजची तरुण पिढी समाज माध्यमे वापरताना - कु.रवींद्र सोमनाथ गडकरी | ३२ ते ३४ |
| १८ | प्रसार माध्यमे : दू:धारी तलवार- श्रीमती पुष्पलता विजय धुमाळ | ३५ |
| १९ | आजच्या तरुण पिढीवर समाज माध्यमांचा प्रभाव - कु.भाग्यश्री त्रिंबक पथवे | ३६ ते ३७ |
| २० | समाज माध्यमे तरुणाईच्या जीवनातील अविभाज्य भाग - कु.आदिती दत्तू वाळूंज | ३८ ते ३९ |
| २१ | तरुण पिढी (पद्य) - कु.हर्षदा नवनाथ कोकणे | ३९ |
| २२ | आजचा तरुण - कु.इन्शा समीर शेख | ४० |
| २३ | निवडणूक प्रक्रिया आणि आजचा समाज - कु.अंजली रवींद्र कुलाळ | ४१ ते ४२ |
| २४ | आजचा समाज आणि मतदान - कु.प्रतिक्षा विनोद शेळके | ४३ ते ४४ |
| २५ | शेतीमाल उत्पादन खर्च व बाजारभाव - कु.धनश्री तुकाराम नाडेकर | ४५ |
| २६ | शेतीमाल खर्च व उत्पादन बाजारभाव - कु.ज्ञानेश्वरी अरविंद नाईकवाडी | ४६ ते ४७ |
| २७ | कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाची आवश्यकता - कु. हर्षदा नवनाथ कोकणे | ४८ |
| २८ | शैक्षणिक क्षेत्रातील नैतिकता - कु.कस्तुरी केशव शिंदे | ४९ |
| २९ | प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था: गुरुकुल ते विद्यापीठ - प्रा.डॉ.किरण जाधव | ५० ते ५६ |
| ३० | स्त्री शिक्षण : कु.ज्ञानेश्वरी अरविंद नाईकवाडी | ५७ |


## पुस्तक परिक्षण


| | | |
|---|---|---|
| १ | ताई मी कलेक्टर व्हयनू : कु.साक्षी शांताराम वाकचौरे | ५९ ते ६० |
| २ | तेथे जीवाणू जगती - कु.मोहिनी दिलीप गुंड | ६१ ते ६२ |
| ३ | विंग्ज ऑफ फायर - कु.प्रतिक्षा गंगाराम देठे | ६३ ते ६५ |
| ४ | श्यामची आई - कु.अवधुत गोरक्षनाथ नवले | ६६ |

# माझं गाव

कु.कोल्हाळ सानिका लहू,
एफ.वाय.बी.सी.एस.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील सुंदर आणि छोटे गाव म्हणजे लिंगदेव. माझं गाव एका डोंगरावर वसलेल आहे. आधी या गावाला खडकवाडी असे नाव होते, ज्या जागेवर ते गाव वसलेलं आहे, तिथे खडकाची जमीन जास्त आहे. त्यामुळे पूर्वीच्या काळी खडकवाडी असे नाव पडले होते. एक दिवस पूर्वजांना तिथे महादेवाचे लिंग म्हणजेच पिंड सापडले. त्या पिंडीला नाव दिले लिंगेश्वर. या महादेवाचे एक मंदिर गावकऱ्यांनी स्थापन केले. याच सुप्रसिद्ध धार्मिक मंदिरामुळे 'लिंगदेव' नाव गावाला पडले.

या मंदिरासमोर मराठी नवीन वर्षाच्या स्वागताला म्हणजेच गुढीपाडव्याला अनेक भक्त जत्रेसाठी येतात. या दिवशी लिंगेश्वर महादेवाचा अभिषेक पहाटे पार पडतो. त्यानंतर आरती व पूजा अर्चना केली जाते. अगदी सकाळीच दर्शनासाठी रांगा लागतात. भोवतालच्या अनेक शहरांमधून आणि गावांमधून लोक दर्शनासाठी येतात. आरती व पूजा झाल्यानंतर भव्य मिरवणूक काढली जाते. या मिरवणुकीमध्ये लेझीम, नृत्य, ढोल पथक, टिपरी, अश्व नृत्य आणि विविध उपक्रम कार्यक्रम आयोजित केले जातात. यात शालेय विद्यार्थी देखील सहभागी होतात. तसेच सर्व पंचक्रोशीतील भाविक व आलेले हजारो भाविक सहभागी होतात. त्यामुळे मिरवणुकीची शोभा वाढते. दिवसभरात हजारो लाखो भाविक या ठिकाणी भेट देतात. या यात्रेचे प्रमुख आकर्षण हे सायंकाळी पाहायला मिळते.ते म्हणजे संगीत आघाडी. म्हणजेच गावरान मूळ भाषेत याला 'सोंग' असे म्हटले जाते. त्यात पारंपरिक देवी, देवता त्याचबरोबर महाभारत आणि रामायण मधील प्रसंगांचे उल्लेख व दृश्य पहावयास मिळते.

यातील प्रमुख पात्रे म्हणजेच सूत्रधार, विदूषक, गणपती, सरस्वती, कच्छ, राम, सीता, लक्ष्मण, रावण, मच्छ, घटत्कोच, त्राटिका, शूर्पणखा, राजा हिरण्यकश्यप, गदाधारी भीम, अभिमन्यू, कर्ण, दुर्योधन इत्यादी पात्रे असतात. माझे वडील देखील काही वर्ष यात सहभागी झाले होते. यात जिवंत दृश्य पाहतोय की काय असे वाटते. अनेक दिवस अगोदर या कार्यक्रमाची तयारी सुरू होते. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील आवडता खेळ कुस्ती आयोजित केली जाते. यात अनेक कुस्तीपटू सहभागी होतात, आणि बक्षीस मिळवतात. महत्त्वाचं म्हणजे संपूर्ण यात्रा शांततेत पार पडते. या यात्रेत कोणत्याही प्राणीमात्रावर हिंसा केली जात नाही, हे या गावचे विशेष महत्त्व आहे.

त्याचबरोबर गावात शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. गावात पहिली ते चौथी हे प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. त्याचबरोबर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक महाविद्यालय आहे. ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि चार ते पाच खाजगी रुग्णालय आहेत. गावात ब्युटी पार्लर, सायबर कॅफे, किराणा दुकान, औषध दुकान, हार्डवेअर व कपड्यांची दुकाने आहेत. एकंदरीतच सर्व सुविधा असणारं असं माझं सुसज्ज गाव आहे.

लिंगदेव हे गाव मुळा नदीच्या काठावर वसलेलं आहे. नदीच्या काठी असल्यामुळे शेती येथील प्रमुख व्यवसाय आहे. आणि म्हणूनच गावातील प्रमुख वर्ग हा शेतकरी आहे. गावात रविवारी बाजार भरतो, आजूबाजूच्या वाड्या-वस्त्यांमधून लोक बाजार करण्यासाठी येतात. गाव हे धार्मिक प्रवृत्तीचे असल्याने सगळे सण, कार्यक्रम एकोप्याने साजरे होतात. असे माझे गाव सुंदर आणि प्रगत आहे.

# गर्दणी गावची संस्कृती

कु.जेडगुले वर्षा लक्ष्मण
द्वितीय वर्ष, कला

डोंगरदऱ्यात वसलेलं गर्दनी गाव आहे. आमच्या गावात अनेक रूढी, परंपरा मानल्या जातात. या गावामध्ये अनेक कार्यक्रम होतात, की जे पूर्वीपासून चाललेले आहेत. त्या परंपरा गाव अजून पण जपत आहे. त्या गावातील लोक परंपरेनुसार काही सण, कार्यक्रम साजरे करतात. आमच्या गावात लग्न समारंभ पारंपरिक पद्धतीने होतात. त्यामध्ये हळद, साखरपुडा केला जातो. लग्नात बाया लग्नांची गाणी, हळदीला गाणी इतकेच नाही तर साखरपुड्यात पण गाणी गातात. आमच्याकडे हळदीचा कार्यक्रम रात्रभर चालत असतो. हळदीचा कार्यक्रम परंपरेनुसार होतो. त्यामध्ये घट बसवतात, तेल पाडतात, देवदेवतांना पुजतात. हळदीच्या वेळी तर बायांच्या अंगावर येतं त्यावेळेस नवरीला ज्या ज्या बाईच्या अंगावर देवी येते ना, त्या ठिकाणी पाया पडायला सांगतात. हळदीच्या दिवशी पण वेगवेगळे कार्यक्रम असतात. नाच गाणे, मेहंदी असते. त्यांना एक विशिष्ट मान असतो. तो जो घट असतो, त्या घटाचे गाणे म्हटले जाते. हा घट नवरीचा मामा भरत असतो.

''घटभरीला भरीला ओ मामाने...घट भरीला
त्याही घटावं लागतं काही काही गं.. त्याही घटाव लागतं..
घटभरीला भरीला ओ मामाने...घट भरीला
त्याही घटावं लागत तांदूळ वं त्याही घटावं
घटभरीला भरीला ओ मामाने...घट भरीला
त्याही घटावं लागतं व नारळही त्याही घटावं''

असे गाणे हळदीच्या वेळी म्हटले जाते. लग्न समारंभामध्ये पण स्त्रिया गाणे म्हणत असतात. जेव्हा वराड येते, तेव्हाही स्त्रीया गाणे म्हणतात.

नवरीच्या घरी जाते वेळेस लग्न लावायला आपण जातो, त्यावेळी लग्नाच्या वेळेस अशी अनेक गाणी म्हटले जातात. नवरी नवरदेवाला हळद लावते, त्यावेळी पण गाणी म्हटली जातात. अशा विविध संस्कृती आजही जपल्या जात आहेत. अजून पण आमच्या गावामध्ये त्या परंपरेनुसार सण साजरे केले जातात.

लग्नामध्ये सादर केले जाणारे गाणे पुढील प्रमाणे..

''खारीक खोबरं रसाळ शेंडीचा नारळं..
येनी कर गं फराळ...
येनीची नातं लय झकास..
येई लावीतो हात येनी घाल ग नाकात...

खारीक खोबरं रसाळ शेंडीचा नारळ..
येनी कर गं फराळ...
येनीच डोलरं लय झकास..
येई लावीतो हात, येनी घाल गं गळ्यात...

खारीक खोबरं रसाळ शेंडीचा नारळ..
येनी कर गं फराळ...
येनीच तफासं लय झकास..
येई लावीतो हात, येनी घाल गं कानात.''

अशा प्रकारची गाणी लग्नामध्ये म्हटली जातात. दुसरी गोष्ट म्हणजे नागपंचमीला दरवर्षी आमच्या गावामध्ये अखंड सप्ताह बसत असतो. तो सात दिवसांचा असतो. दररोज कीर्तन, वेगवेगळ्या देवांची गाणी, असे कार्यक्रम सतत सात दिवस चालत असतात. प्रत्येक घरातील माणूस हा दिवस-रात्र विना घेऊन मंदिरात उभा असतो. ती परंपरा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली आहे. त्यात सप्ताह जेवणाची उत्तम सोय पण केलेली असते. ज्या दिवशी सप्ताह उठतो. त्या दिवशी स्त्रिया फुगड्या खेळतात. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आमच्या गावात हनुमानाचे, विठ्ठल रुक्मिणी, गणपती, शनी मंदिर आहे. तेथे रत्नागिरी माता मंदिर आहे, तिचे देवस्थान डोंगरावर पण आहे. दसऱ्याच्या वेळेस त्या देवीला म्हणजेच गडावर खूप गर्दी असते. रत्नागिरी मातेला अनेक लोकांनी नवस केले आहेत. तिचे स्थान एका आदिवासी माणसाने केलेले आहे, त्या व्यक्तीचे नाव 'मंगळू जीवना मेंगाळ' होते. त्याने रत्नागिरी माता मंदिरामध्ये मूर्तीची स्थापना केली म्हणून हे मंदिर ऐतिहासिक आहे. गावात अजूनही मंदिरे आहेत. राणुमाता कानोबा, रत्नागिरी मातेची जत्रा उत्साहाने साजरी केली जाते. गणेश उत्सव, दहीहंडी, थोर पुरुषांच्या जयंत्या उत्साहात साजऱ्या केल्या जातात.

आदिवासी हा इंग्रजीतील ॲबोरिजिनीज या शब्दाचा रूढ मराठी पर्याय आहे. आदिवासी म्हणून नये असा एक दृष्टिकोन आहे. गावाची संस्कृती पाहत असताना आदिवासींची वेगळी अस्मिता किंवा संस्कृती आहे. ते वनात वस्ती करून राहतात एवढाच त्यांच्या वेगळेपणा आहे. अशा प्रकारचा हा दृष्टिकोन आहे. बरेच आदिवासी गट डोंगरात राहत असल्यामुळे त्यांना अलीकडे गिरीजन असेही म्हटले जाते. एका विशिष्ट आदिवासी गटात जमात म्हणूनही संबोधण्यात येते. उदाहरणार्थ वारली जमात, ठाकूर जमात इत्यादी.

'प्रिमिटिव्ह' म्हणजे 'आदिम' किंवा 'अप्रगत लोक' आणि 'सेव्हेज' म्हणजे 'मागासलेले' किंवा 'रानटी लोक'. 'प्रिमिटिव्ह' किंवा 'सेव्हेज' या शब्दांपासून आदिवासींचा मागासलेपणा अज्ञान किंवा त्यांचा भोळेपणा सुचित होतो. आदिवासी शब्दास अर्थ प्राप्त करून देणे हे मानवशास्त्रातील आजही न सुटलेले कोडे आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना 'इंडिजिनस' संबोधले आहे, कारण आदिवासी संस्कृतीची घडण या संस्कृतीच्या संपर्कावाचून स्वतंत्र रीतीने झाली आहे. अलीकडे त्यांना निरक्षर समाज म्हणूनही संबोधण्याची ही शिफारस करण्यात येते.

आदिवासी बोलींना लिपी नसते, त्यामुळे आदिवासी समाज निरक्षर असतो. अलीकडील मानवशास्त्रीय लिखाणात आदिवासी समाजाचा निरक्षर समाज असाच उल्लेख करण्यात येतो. कॅमेरून जमातीची कोरीव लाकडी तीवई, नागर संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी, असे सामान्यपणे म्हणता येईल. सर्वसाधारणपणे जंगलात कुर्मग दऱ्याखोऱ्यात व संस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते वस्ती करून राहतात.

नागर संस्कृतीचा त्याप्रमाणे वर्गश्रेणीबद्ध समाजाशी संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा संस्कृती आदिवासींमध्ये आढळतात. अर्थात जगात सर्व आदिवासी त्या त्या प्रदेशातील मूळ रहिवासी आहेतच असे म्हणता येत नाही, परंतु दुसऱ्या सर्वसामान्य संज्ञेच्या अभावी आदिम संस्कृतीची दर्शक अशी आदिवासी हीच संज्ञा रूढ झाली आहे. अनेक नागर संस्कृती उदयास आल्या, परंतु त्यांच्याशी संपर्क न साधल्यामुळे किंवा न आल्यामुळे आदिवासी जमाती जशाच्या तशा राहिल्या. त्यांच्यात हजारो वर्ष विशेष परिवर्तन झाले नाही. दक्षिण पॅसिफिक महासागरातील 'न्यू आयर्लंड' बेटावरील मेलानिशियन आदिवासींचे कोरीव गणचिन्ह आदिवासी समाजासंबंधी भरपूर संशोधन व लिखाण झाले, असले तरी आदिवासी या संज्ञेची एकही सर्वमान्य व्याख्या करता आलेली नाही.

आदिवासी जमातींची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१) प्रत्येक आदिवासी जमात एका विशिष्ट भूप्रदेशात राहते, तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या प्रदेशाच्या मानाने लहान असतो. आदिवासी क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर किंवा जंगलात असते, रस्त्यांच्या अभावी तो प्रदेश दुर्गम असतो.

२) आदिवासी जमात साधारणपणे अंतर्विवाही असते व तिचे बहिर्विवाही कुळींत विभाजन झालेले असते. प्रत्येक समाजातील गट लहान असतात. ते नातेसंबंधावर आधारलेले असतात. या गटांचे सदस्यत्व आधुनिक समाजातील मंडळाच्या सदस्यत्वाप्रमाणे ऐच्छिक नसते.

३) प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते. आदिवासी समाजाचे नियंत्रण पूर्णपणे पंचायत किंवा त्याचा मुखिया करतो. एकेका आदिवासी जमातीची बहुदा स्वतंत्र भाषा व बोली असते. आदिवासींचा धर्म क्षेत्रीय म्हणजे त्यांच्या निवासापुरता मर्यादित असतो. त्यांची तीर्थक्षेत्रेही त्यांच्या भागातच असतात.

४) आदिवासी अर्थव्यवस्थेत गटवार समविभाजनाचा वा धंदेवार भिन्न सामाजिक गटांचा अभाव असतो. सर्व लोक सर्व प्रकारची कामे करतात. याशिवाय आदिवासी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. वाटा, वरवंटा, सापळे, जाळे, आकडे, गळ, दोऱ्या, टाकेदार व धारदार दांडकी, हातोडा, कोयता यासारखे प्राथमिक अवजारेच वापरत असतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादन वितरण सेवन या तीन टप्प्यांपैकी वितरण म्हणजे, उत्पन्नाची सार्वत्रिक देवघेव. हा टप्पा आदिवासी अर्थव्यवस्थेत नसतो. उत्पादन कमी असल्यामुळे बाजारपेठही नसते. जो तो आपापल्या उत्पादनाचा उपभोग घेतो. त्याची अर्थव्यवस्था बहुदा चलना वाचून चालणारी व वस्तुविनिमयधारी असते. वस्तू विनिमय म्हणजे उपयुक्त वस्तूची देवघेव असते.

सर्वसाधारण समाजात आदिवासींबाबत भीती आणि औत्सुक्य असते. प्राथमिक अर्थव्यवस्था असणारे, स्त्रियांचे जबरदस्ती अपहरण करून त्यांच्याशी पाशवी वर्तन करणारे, स्वच्छंद लैंगिक संबंध ठेवणारे, वाटेल तसे भक्षण करणारे, किंबहुना नरभक्षणाचीही खंत न बाळगणारे तसेच जादूटोण्यावर श्रद्धा ठेवणारे, उघडे नागडे लोक म्हणजे आदिवासी असा प्रगत समाजाचा चुकीचा समज आहे. या उलट निसर्गाशी तादम्य पावलेल्या स्वच्छंदी स्वतंत्र वृत्तीच्या आणि आधुनिक जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट न झालेल्या आदिवासींचे जीवन सुखामय व अनुकरणीय आहे, हा विचारही विशेषतः पश्चिमी साहित्यात आग्रहाने मांडलेला आहे. काही वैज्ञानिकांच्या मते विज्ञान युगात सभ्यतेचा प्रगतिशील विकास झाला असला तरी, त्यामुळे नैसर्गिक सुखापासून माणसे दुरावतात. विज्ञानामुळे मिळालेल्या भौतिक सुखांपेक्षा त्यामुळे निर्माण झालेली मानसिक दुःखी अधिक आहेत. अर्थात आदिवासी जीवनाच्या सुखाची तरफदारी करणारे लोक फार थोडे आहेत.

भारतीय 'स्मृती' ग्रंथात आदिवासी जमातींचा उल्लेख सापडतो. स्मृतीकारांनी त्या अनुलीमप्रतिमेला संकरातून निर्माण झाल्या असे म्हटले आहे, परंतु त्यातील शबर, रक्ष, निषाद, किरां, यासारखे पुष्कळ असे गट जाती नसून आदिवासी होते. त्यामुळे त्यांना हीन दर्जा प्राप्त झाला. रामायणात कीराम, निषाद, शबर इत्यादी आदिवासींचा उल्लेख आहे. बेटांवर राहणारे, कच्चे मासे खाणारे, खाली मानवाचे आणि वर वाघाचे शरीर असणारे असा किरांविषयीचा उल्लेख आहे. तर निषाद हे जंगलात राहणारे लोक असा उल्लेख आहे. पूलिंद व किरां हे हिमालयात राहणारे आदिवासी असा उल्लेख आहे. एकलव्याची कथा सर्वश्रुतच आहे. पुढे कलचुरी राजा विरुद्ध धीरू नावाच्या जमातीने बंड केल्याचा उल्लेख 'चेदी' राजांच्या शिलालेखात सापडतो.

भारताच्या इतिहासात आदिवासी जमाती स्थानिक राजांच्या वतीने लढल्याची अनेक उदाहरणे आहेत. शिवाजी राजांना रामोशी व कोळी जमातींचे बरेच सहाय्य झाले. आदिवासींची पिळवणूक करणाऱ्यांविरुद्ध बरीच बंडे झाली. १७७८ ते १९४७ च्या दरम्यान आसाम, बिहार, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश या राज्यात सुमारे ७५ बंडे झाली. यातील अधिकांश ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या विरुद्ध होती. महाराष्ट्रातही भिल्लांनी इंग्रजांविरुद्ध उठाव केला होता. १९५६ ते १९५८ च्या दरम्यान ठाणे जिल्ह्यात वारल्यांनी जमीनदारीच्या विरुद्ध बंड पुकारले होते. आदिवासी या भारतीय उपखंडातील जमाती आहेत, ज्यांना भारतातील काही ठिकाणी स्थानिक मानले जाते. हा शब्द एक आधुनिक संस्कृत शब्द आहे जो १९३० च्या दशकात आदिवासी राजकीय कार्यकर्त्यांनी मूळचा दावा करून आदिवासींना स्वदेशी ओळख देण्यासाठी वापरला होता.

भारतातील मूळ रहिवाशांपैकी एक असल्याचा दावा केला जात असला तरी सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतर अनेक सध्याचे आदिवासी समुदाय झाले. प्राचीन शिकारी, सिंधू संस्कृती, इंडिआर्यन आणि ऑस्ट्रेलिया यांच्या विविध अंशाचे वंशज आहेत. आदिवासी परंपरा आणि प्रथा भारतीय संस्कृती आणि सभ्यतेच्या सर्व पैलूंमध्ये व्यक्त आहेत. तरी ही जागरूकता बहुतेकवेळा लोकप्रिय जाणीवेत अभाव असते आणि भारतीय तत्वज्ञान, भाषा आणि प्रथा यामध्ये आदिवासींच्या योगदानाची व्याप्ती अनेकदा अपरिचित राहिलेली आहे. किंवा इतिहासकार आणि सामाजिक यांनी कमी लेखले आहे. आदिवासी प्रजासत्ताकांनी सामाजिक समतेचे अनेक पैलू टिकवून ठेवले होते, जे अजूनही काही आदिवासी समाजांमध्ये आढळू शकतात. जे व्यावसायिक लूट आणि शोषणाच्या

दुष्परिणामांपासून कसेतरी सुटलेले आहेत. आदिवासी समाज अप्राप्त आहे आणि समाजाची सर्व उत्पादने सामायिक केली जात आहेत तोपर्यंत अशी मूल्य व्यवस्था टिकून राहिली. याच विचारधारेचे आमचे गाव म्हणजे गर्दणी.

आमच्या गावामध्ये सर्व सण साजरे करतात पण हळूहळू त्या परंपरा नष्ट होत चाललेल्या दिसून येतात. गावामध्ये गणेश उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. ठिकठिकाणी गणेश मूर्ती बसवल्या जातात. दहा दिवस त्यांना थाटामाटात पुजले जाते. आमच्या गावात काही प्रसिद्ध ठिकाणे आहेत म्हणून ती जपून राहिलेली आहेत, पण त्याचबरोबर या निमित्ताने लोक एकत्र येऊन उत्सव साजरे केले जातात. एका ठिकाणी बसून निर्णय घेतले जातात, पूर्वीसारखी आजही संस्कृती जपत आहेत. प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये या ठिकाणी पण विविध कार्यक्रम होतात. वेगवेगळ्या स्पर्धा अजूनही राबवल्या जातात. आदिवासी समाज अजूनही दऱ्या खोऱ्यात वसलेला आहे. ठिकठिकाणी त्याचे स्थान आहे, शेती केली जाते, पण अलीकडे ही संस्कृती नाहीशी होत चालली आहे.

गर्दनी गावातील लोक शहरापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात डोंगराच्या पायथ्याशी किंवा जंगलात झोपड्या करून राहतात. निसर्ग पूजक असलेल्या आदिवासी संस्कृतीमध्ये धार्मिक विधींना खूप महत्त्व आहे. सूर्य, चंद्र, तारे, आकाश, पृथ्वी, पाऊस, जलधारा, वायु, अग्नी इत्यादींची तसेच प्रसंगी रौद्ररूप धारण करणाऱ्या शक्तींची पूजाही त्यांच्या सणावारांची केंद्रबिंदू ठरते.

गर्दनी गावात साजरी होणारे सण, पारंपरिक रीती सर्वच आनंदाने साजरे केले जातात. गावातील रत्नागिरी मातेची यात्रा उत्साहात साजरी केली जाते, देवीची काठी निघते व काठीची मिरवणूक होते. मंदिराची सजावट व लाइटिंग केले जाते. तसेच यानिमित्त तमाशाचे आयोजन होते. यात्रेत मोठ्या प्रमाणावर खेळण्याची दुकाने देखील येतात. सायंकाळच्या वेळेत कुस्त्यांचा कार्यक्रम होतो. देवीच्या यात्रेला अनेक ठिकाणचे लोक पाया पडण्यासाठी येतात. गावामध्ये स्वच्छता अभियान राबविले जाते. सर्व गावाला शौचालय आहेत, स्मशानभूमी आहे, देवस्थान आहे, सरकारी व खाजगी दवाखाना आहे. पतसंस्था आहे. गावात मंगल कार्यालय आहे. सर्व जाती धर्मातील विवाह या ठिकाणी केले जातात. गावातील लोकांमध्ये एकात्मतेची भावना आहे.

# पांगरी गावची लोकसंस्कृती

प्रा.चांगदेव डोंगरे
उपप्राचार्य,कनिष्ठ महाविद्यालय

भौगोलिक रचना :- गावाच्या व डोंगराच्या बाजूला असलेल्या 'पांगाराच्या' झाडामुळे 'पांगरी' हे नाव गावाला पडले, परंतु सद्यपरिस्थितीमध्ये 'पांगरी' हे गाव पांगली झाले आहे, कारण सर्व गाव विखुरले गेले आहे. गावामध्ये ६० टक्के समाज आदिवासी ठाकर, कोळी महादेव आहे. हा समाज पाच ते सहा वाड्या ज्या डोंगराच्या पायथ्याला किंवा डोंगरावर वसलेल्या आहेत. ज्या डोंगराच्या पायथ्याला ही आदिवासी वस्ती आहे त्या वाडीला नाव देखील तसेच डोंगराच्या नावावरून किंवा आडनावावरून दिले आहे. उदा.सुळकी डोंगराच्या पायथ्याला सुळकेवाडी आहे तसेच जांभळा मुरूम व जांभळाची झाडे असल्यामुळे एका वस्तीला 'जांभळमाथा' नाव पडले आहे.

खंडवेवाडी, मधेवाडी, पथवेवाडी, कडाळवाडी, पडवळेवाडी, कडा पांगरी (कडेवाडी) अशा अनेक वाड्या आहेत. पांगरी हे गाव दक्षिणोत्तर पसरलेले आयताकृती आहे. गावाच्या पायथ्याला दक्षिणेला मुळा नदी असून गावाचे उत्तर टोक हे डोंगरांनी वेढलेले आहे. उत्तरेच्या बाजूला असलेल्या धोडप, सुळकी, अस्वल्या हे डोंगर असून पश्चिमेच्या बाजूला मोग्रस गाव आहे. दोन गावांच्या मध्ये उत्तर दक्षिण असा डोंगर ज्याला 'वाखार' म्हटले जाते.पूर्वेच्या बाजूला शेरेवाडी व पिंपळगाव खांड गावे आहेत. गावाची पूर्व पश्चिम लांबी ४ किमी असून दक्षिणोत्तर लांबी ६ किलोमीटर आहे.

**धार्मिक स्थळे:-** गावामध्ये मारुती मंदिर,मुक्ताई देवी मंदिर, महादेव मंदिर, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, भैरवनाथ मंदिर व हिंदू मुस्लिम ऐक्य असलेले 'मोठा देव' व 'पीर साई' मंदिरे आहेत. गावची सर्वात मोठी यात्रा मुक्ताई देवीची चैत्रामध्ये भरते. या यात्रेला सकाळी देवीची काठी वाजत गाजत काढली जाते. देवीला पुरणपोळीचा गोड नैवेद्य दाखविला जातो. या यात्रेसाठी गावातील वेगवेगळ्या समाजाचे सर्व गावकरी एकत्र येऊन अत्यंत आनंदाने हा यात्रा उत्सव साजरा करतात. या यात्रेसाठी बाहेरगावी नोकरीला असणारी, मोलमजुरी करण्यासाठी इतर ठिकाणी गेलेले सर्व गावातील नागरिक एकत्र येतात. संध्याकाळी एखादा तमाशा मनोरंजनासाठी असतो. दुसऱ्या दिवशी हजेरी असते. पूर्वी हगामा सुद्धा होत असे, पण आता तो बंद झाला. उत्तरेला पांडवकालीन महादेव मंदिर आहे, ज्याचा नुकताच जिर्णोद्धार केला आहे. महादेव मंदिर (पांगरेश्वर) येथे महाशिवरात्रीला त्रिदिनी हरिनाम सप्ताह असतो. तसेच प्रत्येक श्रावणी सोमवारी मोठा उत्सव होत असतो. या गावाचे एक वैशिष्ट्य मुक्ताई देवी व भगवान महादेव यांचे एकत्र एकापाठोपाठ एक मंदिरे आहेत. महादेव मंदिराच्या समोर मुक्ताई देवी मंदिर आहे. अशा प्रकारचा योगायोग फार दुर्मिळ आहे. इतर गावांमध्ये महादेव मंदिर ओढ्याच्या कडेला स्मशानभूमी असते व देवीचे मंदिर गावाच्या बाजूला एकांत ठिकाणी किंवा डोंगरामध्ये पाहावयास मिळते. म्हणजेच दोन्ही मंदिरे एकत्र दिसत नाही. 'मोठा देव' व 'पीर साई' मंदिर एकत्र आहे. जिथे चैत्र महिन्यात यात्रा भरते व हिंदू मुस्लिम समाज एकत्र येऊन आनंदाने हा उत्सव पार पाडतात. या गावांमध्ये कोणत्याही प्रकारचा जात भेद, भांडण, तंटे वगैरे होत नाही. गुण्यागोविंदाने आजही सर्व समाज एकत्र नांदत आहे. गावचा सरपंच हा शक्यतो आदिवासी कोळी महादेव समाजाचा असतो. या सर्व समाजाला बरोबर घेऊन गावची वाटचाल चालू आहे.

**सण उत्सव:-** या गावांमध्ये सर्व सण, उत्सव अत्यंत आनंदाच्या वातावरणामध्ये होत असतात. गावांमध्ये सलोखा आहे. सध्या गाव पांगलेले आहे. सर्व लोक आपापल्या शेतामध्ये स्थायिक झालेले आहेत. मारुती मंदिरासमोर पुरातन काळापासूनचे साधारणत: १०० ते १२५ वर्षांपूर्वीचे चिंच, लिंब, पिंपळ, वड वृक्ष आहेत. ज्या वृक्षांमुळे मंदिरासमोर सुंदर असे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक समारंभ, लग्न विधी याठिकाणी संपन्न होतात. सदर वातावरण अत्यंत सुंदर आल्हादायक आहे. या वृक्षांवर अनेक पशुपक्षी गेल्या कित्येक वर्षापासून या ठिकाणी वास्तव्य करतात. तसेच गावामध्ये होणारा हरिनाम सप्ताह हा देखील शेकडो वर्षापासून अव्यहातपणे अखंडपणे

चालू आहे. यामध्ये कोणताही खंड नाही. २० वर्षांपूर्वी मंदिराचा गावाच्या पुढाकारातून जीर्णोद्धार केला गेला. मंदिरामध्ये हनुमान, राम-लक्ष्मण, सीता व ज्ञानेश्वर माऊली यांच्या सुबक मूर्ती आहेत. गावांमध्ये १ली ते ७वी पर्यंत शाळा आहे . गावामध्ये पिण्यासाठी व पिकांसाठी मुबलक प्रमाणामध्ये पाणी उपलब्ध आहे, म्हणून गावात दुष्काळ जाणवत नाही. गावाजवळील उत्तरेतील तलाव आज पर्यंत जेव्हापासून पूर्ण झाला आहे, तेव्हापासून कोरडा पडलेला नाही. तसेच पिंपळगाव खांड धरण झाल्यापासून त्या ठिकाणाहून काही पाईपलाईन आल्यामुळे संपूर्ण शेत शिवार हिरवागार झालेला आहे. सर्व परिसर जरी डोंगराळ व मुरूमाचा आहे, तरी बागायती क्षेत्र वाढत आहे. सर्व प्रकारची पिके या गावांमध्ये घेतली जातात. जसे टोमॅटो, ऊस, कोबी, फ्लावर, द्राक्षे, डाळिंब, आंबा, गहू, हरभरा, बाजरी, भात, मका व कडधान्य इत्यादी. गावामध्ये सर्व सण उत्सव अत्यंत आनंदाच्या वातावरणामध्ये होत असतात. होळीचा सण हा खूप सुंदर पद्धतीने होत असतो. सर्व गावातील नागरिक आपल्या घरातील गोवऱ्या एकत्र आणून मंदिरासमोर खूप मोठी होळी रचतात. त्याचबरोबर गावामध्ये 'वीराचा पाडवा' हा देखील सर्व गावकरी एकत्र येऊन वाजत गाजत साजरा करत असतात. गावामध्ये सर्व धार्मिक उत्सव वेगवेगळ्या महापुरुषांच्या जयंती आनंदाने साजऱ्या होत असतात. आदिवासी समाजाचे देखील सर्व उत्सव अत्यंत आनंदाने होत असतात आणि यामध्ये सर्व मराठा समाजाचे लोक सामील असतात. अशा प्रकारचे छोटे परंतु सुंदर आणि एक आदर्शवत् असे माझे पांगरी गाव आहे.

## संगीत

गौरी संजय शेळके,
इ.११ वी ब

संगीताच्या कोलाहलात आज ते
सूर हरवले न जाणे कुठे
कर्णबधिर वाद्यांच्या गर्दीत
स्वरभानच ते अलगत सुटे..

शब्दसुरांच्या मैत्रीचे ते
अवशेष दिसती क्वचित कुठे
शब्द गेले सूर्य विरले
संगती स्वरांची भेट तुटे..

संगीत आराधना स्वरांची
प्रसन्न होतील खचित ते
सरस्वती मग प्रसन्न होईल,
सामोरी येईल स्वरातून ते..

कलारत्न संगीत तू ते
मदती सारे या क्षेत्र
जपू या निगुतीने अभिजात संगीता
जतन करूया वारसा मित्रा

# लोकसंस्कृती

कु.समृध्दी मधुकर इरनक
इ.११ वी, कला - ब

"माझ्या महाराष्ट्राच्या गावी,
तिथे प्रत्येक घरात एक गोड वास,
गाणी, नृत्य, संवादाचा आनंद,
माझ्या लोकसंस्कृतीचा असतो खास.."

लोकसंस्कृती म्हणजे त्या समाजाची सांस्कृतिक परंपरा मूल्य आणि विश्वास जी लोकसमूहाच्या दैनंदिन जीवनात प्रकटतात. या संस्कृतीमध्ये एकत्रितपणे असलेल्या आदर्श, विश्वास, रितीरिवाज, सण, उत्सव, भाषा, कला आणि परंपरा समाविष्ट असतात. लोक संस्कृती हा प्रत्येक समाजाच्या गाभ्यातील एक महत्त्वाचा भाग आहे, ज्यामुळे त्या समाजाची ओळख तयार होते.

भारतीय लोकसंस्कृती अत्यंत विविधतेने नटलेली आणि समृद्ध आहे. भारतीय समाजामध्ये विविधतेमध्ये एकता असलेल्या लोकसंस्कृतीचे अनोखे दर्शन घडते. महाराष्ट्रातील लोकसंस्कृती विशेषतः शौर्य, इतिहास, सण-उत्सव आणि पारंपरिक कलेच्या माध्यमातून समृद्ध आहे.

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमध्ये संगीत, नृत्य, कला आणि लोककला यांचे महत्त्व आहे. गवरी, झपता, काठीचा नाच, लावणी आणि तुकाराम किंवा रामदासी भजन यासारख्या विविध कलेच्या प्रकारांमध्ये महाराष्ट्राची लोकसंस्कृती समृद्ध आहे. याशिवाय महाराष्ट्रात असलेले विविध सणांची परंपरा ही लोकसंस्कृतीचा महत्त्वपूर्ण भाग आहे. गणेशोत्सव, मकर संक्रांति, गोवर्धन पूजा आणि होळी या सणांच्या माध्यमातून लोकसंस्कृती प्रकटते.

लोकसंस्कृती केवळ कला आणि सणांपुरती मर्यादित नाही. ती समाजाच्या विविध घटकांना एकत्र आणण्याचे कार्य करते. लोकसंस्कृती एक महत्त्वाचे सामाजिक साधन आहे. जे समाजाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा पुढे नेते. त्याच्या माध्यमातून पुढील पिढ्यांना आपल्या पारंपरिक मूल्यांची माहिती मिळते आणि ते आपली संस्कृती जपण्यासाठी मदत करते.

अशाप्रकारे लोकसंस्कृती हे समाजाच्या अस्तित्वाचे आणि ओळखीचे एक महत्त्वाचे अंग आहे. ज्याचे जतन आणि संवर्धन करणे आपल्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

"लोक संस्कृतीला ठेवू प्रगल्भ,
संवर्धित करू आणि जपू,
कारण तीच आहे आपली खरी संपत्ती,
जीवनाला सुंदरतेने सजवू."

# भारतीय लोकसंस्कृती

कु.गौतमी संतोष खांबेकर
इ.११ वी कला - ब

भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, विलक्षण भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यमुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशातील चालीरीती, परंपरा व कल्पना सामावून घेत भारतीय संस्कृतीने 'सिंधू' संस्कृती जन्माला आणली. तसेच वैदिक काळात, दक्षिण भारतातील 'लोहयुग' काळात, बौद्ध धर्माच्या 'उद्धव' आणि 'ऱ्हासाच्या' काळात तसेच भारताचे 'सुवर्णयुग', 'मुसलमानी' आक्रमण व 'युरोपियन' देशांच्या वसाहतीत दरम्यान झालेले बदल पचवून देखील स्वतःचे परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे. भारतीय संस्कृतीने तिच्या इतिहासाने, अद्वितीय भौगोलिक रचनेने, वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा व कल्पना स्वीकारून तसेच पुरातन परंपरा जपून आकार घेतला आहे. भारतात जागोजाग वेगवेगळे लोक, धर्म, वातावरण, भाषा, चालीरीती आणि परंपरा यात वैविध्य दिसत असूनही आढळणारे साम्य, हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. देशभरात पसरलेल्या विविध उपसंस्कृती आणि हजारो वर्षांच्या परंपरा, ज्यांची एकत्रित वळलेली मोट म्हणजे भारतीय संस्कृती. ती अनेक प्रसिद्ध अध्यात्मिक गुरूंचे व योगशिक्षकांचे आश्रयस्थान आहे. भारतीय संस्कृतीला स्वतंत्र अशी वेगळी वैशिष्ट्ये आणि परंपरा लाभलेली आहे. भारतीय संस्कृती ही अति प्राचीन आहे. वैदिक साहित्य हे भारतीय संस्कृतीचे मूळ साधनग्रंथ आहेत. भारतीय संस्कृती समजून घेताना या धार्मिक साहित्याचा उपयोग होतो.

मनुष्य व त्याच्या वतीचे विश्व मिळून निसर्ग बनतो. या निसर्गामध्ये जीवनाच्या उत्कर्षाला अनुकूल असे बदल करुन म्हणजेच निसर्गावर काही संस्कार करतो. मनुष्य आपली जीवन यात्रा चालवतो. केवळ बाह्य विश्वातील पदार्थांवर संस्कार करतो असे नव्हे तर, स्वतःचा देह आणि मन बुद्धी यांच्यावरही संस्कार करून स्वतः बदल अभिप्रेत आहेत.

भारताच्या सांस्कृतिक इतिहासाची वाटचाल पाहिली असता, तिच्यात प्रमुख तीन वैशिष्ट्ये दिसून येतात. अखंडित परंपरा, राजकीय व धार्मिक सत्तांच्या केंद्रीकरणाचा अभाव, संस्कृती संघर्ष टाळून संस्कृती संगम करण्याची प्रवृत्ती.

भारतीय संस्कृतीचा पाया 'वेद' हा मानला जातो. ज्ञानाच्या अधिष्ठानावर आधारित अशी ही संस्कृती आहे. वेदावर आधारलेली संस्कृती म्हणजे, वैदिक संस्कृती होय. वेद आपले सर्वाधिक प्राचीन साहित्य मानले जातात. वेदांची निर्मिती अनेक ऋषींनी केली. वेदांमधील काही 'सुम' हे स्त्रियांनीही रचलेली आहेत. वैदिक साहित्याची भाषा संस्कृत होती. वैदिक वाङ्मय अत्यंत समृद्ध आहे. 'ऋग्वेद' यातील मूळ ग्रंथ मानला जातो, तो काव्य रूपामध्ये आहे. ऋग्वेदासह यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्वेद असे चार वेद आहेत. या चार वेदांच्या ग्रंथांना संहिता असे म्हणतात. म्हणजे 'जाणणे' त्यापासून वेद ही संज्ञा तयार झाली. तिचा अर्थ ज्ञान असा होतो. मौखिकपटनाच्या आधारे वेदांचे जतन केले गेले आहे. वेदांना 'श्रुती' असेही म्हणतात.

# लोकसंस्कृती

कु.अक्षदा प्रताप सावंत
इ.११वी विज्ञान ब

'संस्कृती' या शब्दांमध्ये 'सम' हा उपसर्ग आणि 'कृ' हा संस्कृत धातू आहे. संस्कृतीचा अर्थ 'सर्वसमावेशक कृती असा होतो.' धर्मासह समग्र अंतर बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार.

गेल्या दहा पंधरा वर्षापासून लोकसंस्कृती विविध अंगांनी झालेला अभ्यास आणि संशोधन आता मान्यता पावले आहे. जेव्हा आपण भारतीय संस्कृती असा शब्दप्रयोग करतो, तेव्हा प्रामुख्याने आर्यांनी प्रस्थापित केलेली वैदिक संस्कृती आपल्यासमोर साकार होते, तीच आपली खरी आणि एकमेव संस्कृती आहे. अशी आपली धारणा बनलेली असते. अशा प्रकारची धारणा निर्माण होणे यात फारसे गैर नाही. पण ही धारणा पूर्ण सत्यावर आधारलेली नाही, कारण आपली संस्कृती केवळ वैदिक संस्कृती नाही. आर्य भारतात येण्यापूर्वी अति प्राचीन काळापासून या भूप्रदेशात एक प्रगत आणि समृद्ध संस्कृती नांदत होती. फार मोठे भूप्रदेशात ती विस्तारलेली होती. 'हडप्पा' आणि 'मोहंजदडो' या ठिकाणी उत्खननामध्ये 'सिंधू' संस्कृतीचे जे अवशेष सापडले आहेत, त्यावरूनही हेच सिद्ध होत आहे. या संस्कृतीला अनेकांनी अनेक नावे दिली आहेत.

भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, विलक्षण भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यामुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशातील चालीरीती, परंपरा व कल्पना सामावून घेते. भारतीय संस्कृतीने सिंधू संस्कृती दरम्यान जन्माला आलेले, तसेच वैदिक काळात दक्षिण भारतातील लोहयुगकाळात बौद्ध धर्माच्या उद्भव आणि ऱ्हासाच्या काळात, तसेच भारताचे सुवर्ण युग, मुसलमानी आक्रमण व युरोपियन देशांच्या वसाहती दरम्यान झालेले बदल, पचवून देखील स्वतःची परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे. भारतीय संस्कृतीचे तिच्या इतिहासाने, अद्वितीय भौगोलिक रचनेने, वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा व कल्पना स्वीकारून, तसेच पुरातन परंपरा जपून आकार घेतला आहे.

लोकसंस्कृती या साऱ्या रुजलेल्या आणि टिकून राहिलेल्या धारणा आहेत. त्याचे मूळ आहे ते, 'आदिम' संस्कृतीत असलेल्या यात्वात्मक विधीमध्ये. तंत्र, मंत्रात्मक विधीमध्ये. या विधीचे बरेच अंश वेगवेगळ्या रूपांमध्ये पाझरत पाझरत लोकसंस्कृतीमध्ये कमी अधिक प्रमाणात उतरले आहेत, आणि विज्ञानाने सारे कवेत घेतलेले असतानाही, ते ग्रामीण भागात अजून टिकून आहेत. यातून विचार म्हणजे केवळ जादू टोना नव्हे, किंवा जारण मारण नव्हे अथवा वामावरही नव्हे. पूर्वीच्या शक्तपंथीय उपासनेमध्ये वामाचाराला विशेष स्थान असल्याने, या विचाराचा हा अर्थ जनसामान्य तरुण झाला. पुढील काळात त्यात निर्माण झालेल्या विकृतीमुळे बराच बदनामही झाला. या विचाराचे स्वरूप आणि हेतू पूर्णतः वेगळा होता. मोहरी एवढ्या आकाराच्या बियापासून विशाल वटवृक्ष विस्तारतो तो या शक्तीमुळेच. एका दाण्यापासून जोंधळ्याचे ओंजळभर दाणे निर्माण होतात, या शक्तीमुळे, एका बी पासून तयार झालेल्या झाडाला शेकडो फळे येतात, त्या अज्ञात शक्तीमुळेच.

लोकसंस्कृतीचे एक ठळक आणि अपरिहार्य वैशिष्ट्य म्हणजे तिचे भूमिशी असलेले दृढ नाते. लोकसंस्कृतीचा उपासकाला भूमि ही केवळ अन्नधान्य पुरविणारी उपजावू जमीन वाटत नाही. ती त्याची देवता असते. लोक जीवनाची सेवाभावी अन्नपूर्णा असते.

भारत हे हिंदू, बौद्ध, जैन व शीख या धर्मांचे जन्मस्थान आहे. आज हिंदू धर्म व बौद्ध धर्म हे जगातील अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या क्रमांकाचे धर्म असून, या दोन्ही धर्मांचे एकत्रित सुमारे दोन अब्जांवर अनुयायी आहेत. संस्कृतीच्या संदर्भात विविध संकल्पना मानल्या आहेत. 'ऋण' कल्पना ही भारतीय समाजशास्त्रीय महत्त्वाची संकल्पना असून आश्रम व्यवस्थेची या संकल्पनेची सांगड घातलेली दिसून येते. आश्रम मानवी आयुष्याची चार

भाग कल्पून त्या प्रत्येक भागाला आश्रम असे नाव दिले आहे. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वनाप्रस्थ आणि संन्यास असे हे चार आश्रम आहेत.

भारताच्या सांस्कृतिक इतिहासाची वाटचाल पाहिली असता, तिच्यात प्रमुख तीन वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यात अखंडित परंपरा, राजकीय व धार्मिक सत्तांच्या केंद्रीकरणाचा अभाव, संस्कृती संघर्ष टाळून संस्कृती संगम करण्याची प्रवृत्ती, भारतीय संस्कृती कोश खंड नववा. भारतीय संस्कृतीचा पाया वेद हा मानला जातो. वेद म्हणजे ज्ञान. ज्ञानाच्या अधिष्ठानावर आधारित अशी ही संस्कृती आहे. वेदावर आधारलेली संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती होय. वैदिक साहित्याची भाषा संस्कृत होती. वैदिक वाङ्मय अत्यंत समृद्ध आहे. ऋग्वेदासह यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद आहेत.

# लोकशाही

सोनवणे श्रुती अनिल,
११ वी विज्ञान ब

मी पाहिला होता सूर्यास्त होताना लोकशाहीचा
मी पाहिला आहे, उदय होताना ठोकशाहीचा ||धृ||

राजकारण आमचा प्रांत नाही,आम्हाला ते नाही कळत,
परंतु मी पाहिले होते,होते मणिपूर जळत,
हाच का खरा विजय आपल्या झुंडशाहीचा?
मी पाहिला होता सूर्यास्त होताना लोकशाहीचा...

प्रांत, धर्म, जात, भाषा,
भेदाभेद आम्हास मान्य नाही,
दुराचार, अत्याचार आजही,
ही गोष्ट सामान्य नाही,
हाच का खरा विजय आपल्या गुंडशाहीचा?
मी पाहिला होता सूर्यास्त होताना लोकशाहीचा..

पंचवार्षिक ला जेव्हा होतो,
लोकशाहीचा जागर,
मनातून खरे सांगू का? फक्त
लोकांना हे दाखवतात गाजर
हाच का खरा विजय आपल्या अडबंगशाहीचा?
मी पाहिला होता सूर्यास्त होताना लोकशाहीचा...

# लोकसंस्कृती

कु.हर्षदा नवनाथ कोकणे
प्रथम वर्ष, वाणिज्य

''गावात दारोदारी वाजतात सकाळी सुंदर गाणी
दवबिंदू सजलेत जसे अंगणी..

वासुदेव राम पहऱ्यात म्हणत असतात अभंग अन् गाणी...
सण उत्सवांमध्ये वाजत असतो ढोल अन् ताशा..

रांगोळी अंगणी काढत महिला,
पारंपरिक रीती भारतीय अन् ठेवतात अनेक आशा...

परंपरेनुसार चालत आलेली शेती जपतात आपले शेतकरी,
पंढरपूरच्या वारीचा एक वेगळाच आनंद घेत पायी चालत

फुगडी खेळत असतात आपले सर्व वारकरी..
दूरदर्शनच्या काळात हे सर्व हरवले आहे,

पण जागरण गोंधळ, जुनी गाणी, अभंग,
हरिपाठ अजूनही येतात ओठांवर...

जन्मापासून ते मरणापर्यंत लोकसंस्कृतीची साथ असावी,
लोक संस्कृतीने सर्व माणसांना जगण्याची एक नवीन उभारी द्यावी...!''

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

कु.सानिका लहू कोल्हाळ
प्रथम वर्ष, बी.सी.एस.

मी एका मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी. माझे वडील प्राथमिक शिक्षक आहेत. विशेष म्हणजे माझ्या वडिलांचे शिक्षण बी. ए. मराठी आहे, म्हणजे त्यांनी मराठी भाषा आणि साहित्यातील पदवी संपादित केली आहे. 'मी मराठी! असं म्हणताच, एक वेगळा अभिमान वाटतो.' मराठी ही माझी मातृभाषा आहे. सात ते दहा किलोमीटर वरती मराठी भाषा बोलण्याची पद्धत बदलते. असेच मराठी भाषेच्या काही बोलीभाषा आहेत. जसे की कोंकणी मराठी, कोल्हापूरी मराठी, कारवारी मराठी, बेलगावी, वऱ्हाडी, मालवणी, मोरस, मराठवाडी, नागपूरी इत्यादी अशा अनेक बोलीभाषा महाराष्ट्रात बोलल्या जातात.

मराठी भाषेचा खूप मोठा इतिहास आहे. ही भाषा देखील इतर काही भाषांप्रमाणेच प्राचीन आहे. सुमारे २४ ०० वर्षे इतके आपल्या भाषेचे वय आहे. 'गाथा सप्तशती' हे मराठी भाषेतील पहिले पुस्तक आहे. कोकणी, अहिराणी, मालवणी आणि कोळी या भाषेंचा यावर जास्त प्रभाव दिसून येतो. मराठी भाषेचे दोन प्रमुख प्रकार आहेत. वऱ्हाडी बोलीभाषा व प्रमाण बोलीभाषा. उत्तरेपासून तर दक्षिणेपर्यंत मराठीचा विस्तार झालेला आहे. भारताच्या दक्षिण भागात मराठी भाषा अधिक विकसित आहे.

''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी...!''

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र अस्तित्वात आला. मराठी भाषिकांचे राज्य म्हणून महाराष्ट्राला ओळखले जाते. विष्णुशास्त्री चिपळूणकर स्वतःला मराठी भाषेचा शिवाजी म्हणवत असत. निबंधमालेतील तीन निबंध, पद्य रत्नावली, मराठी व्याकरणातील निबंध इत्यादी यांचे ग्रंथ आहेत. संस्कृत भाषेतील आर्य संस्कृत ही मराठीची जननी आहे. या सगळ्यांमुळे मराठी भाषा ही अभिजात आहे असे आपल्या लक्षात येईल.

प्राचीन लेखन साधने म्हणजे शिलालेख, ताम्रपट, लोकसाहित्य हे भाषेच्या इतिहासाची महत्त्वाची साधने आहेत. भारताच्या महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड, कर्नाटक आणि तेलंगणा या राज्यांमध्ये देखील मराठी भाषा बोलली जाते. दादरा नगर हवेली, दमन व दिव या केंद्रशासित प्रदेशात देखील आपली मराठी भाषा बोलली जाते.

मराठी भाषा प्राचीन भाषांपैकी एक आहे. मराठी ही महाराष्ट्राच्या प्राकृततेचे आधुनिक रूप आहे. आपल्या भाषेचा साहित्य आणि कलेवर देखील प्रभाव आहे. मराठी भाषेने आपली छाप साहित्य व कलेवर सोडली आहे. शतकानुशतके मराठी भाषेने या प्रदेशाचा सांस्कृतिक परिदृश्याला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे, कारण महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य आहे. महाराष्ट्र अधिनियम १९६० नुसार महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा मराठीला घोषित करण्यात आले आहे. २७ फेब्रुवारी या दिवसाला 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरे केले जाते. संस्कृत पासून मराठी भाषा निर्माण झाली असे एक मत आहे. मराठी भाषा पश्चिम आणि मध्यम भारतातील इंडो आयर्न भाषा आहे.

दादोबा पांडुरंग तर्खडकर, होय दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी 'मराठी भाषेचे व्याकरण'हे पुस्तक लिहिले आहे. १८३६ मध्ये हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यांनी यशोदा पांडुरंगी धर्म विवेचनही लिहिले.

मराठी व्याकरणाबद्दलचे पहिले आधुनिक पुस्तक विल्यम केरी यांनी १८०५ मध्ये छापले होते. मोरो केशव दामले यांनी 'शास्त्रीय मराठी व्याकरण' हे पुस्तक लिहिले होते. मराठी व्याकरणाचे शास्त्रीय स्वरूप विकसित करण्यासाठी या पुस्तकाचा वापर करण्यात आला होता. मराठी व्याकरणाचा मुख्य क्रम विषय - वस्तू - क्रियापद असा आहे. मराठीत संज्ञा लिंग (पुरुष, स्त्रीलिंग, नपुसक) संरव्या (एक वचन, अनेक वचन) , मुळाक्षरे, वर्ण प्रकार, स्वरचिन्हे, बाराखडी, जोडाक्षरे, शब्द व वाक्य, नावे , नाम, सर्वनाम, क्रियापद, विशेषण, काळ, समानार्थी, विरुद्धार्थी, वचन, विरामचिन्हे, अव्यय, म्हणी आणि निबंध लेखन विषयी मार्गदर्शन इत्यादीचा मराठी व्याकरणात समावेश होतो.

मराठी आपली मायबोली
मराठी अपुला बाणा
असू दे आपल्या ध्यानीमनी
मी मराठीच म्हणा..
नका जरी ही कमी लेखू
स्वतःच्या या मातृभाषेला
अमृतातेही पैजा जिंके असे
ज्ञानोबा हीच साठी म्हणाला..

२७ फेब्रुवारी या मंगलदिनी
जन्मतः अभिजात असलेल्या
मराठी भाषेचा हक्काचा दिन
आनंदाने साजरा करूया..

अभिजात या शब्दाचा काय नक्की अर्थ होतो? तर अगोदर जन्मलेला, मूळ, उच्च कुलीण किंवा श्रेष्ठ. थोडक्यात सांगायचे तर अभिजात भाषा म्हणजे भारत सरकारकडून एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेला दिला जाणारा एक दर्जा. हा दर्जा त्या भाषेला दिला जातो, या भाषेत प्राचीनता, श्रेष्ठता, स्वयंभूपणा आणि सलगता आहे. केंद्र सरकारने भाषेत अभिजात दर्जा देण्यासाठी काही निकष घालून दिलेले आहेत. हे चार निकष अभिजात भाषा दर्जा देण्यासाठी पुरेसे आहेत.

१. श्रेष्ठ दर्जाचं प्राचीन साहित्य ती भाषा अभिजात.

२. भाषेला दीड ते अडीच हजार वर्षांचा इतिहास हवा.

३. भाषेला भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूषण असावे.

४. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.

हा दर्जा ज्या भाषेंना दिला जातो त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून त्या त्या राज्याला भरीव अनुदान मिळते.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देण्यासाठी खूप प्रयत्न केले गेले. राज्य सरकारने प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमून त्याचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला होता. एकूण ५२ बोलीभाषेपासून आपली मराठी भाषा नटलेली आहे. मराठी भाषेची महती दुर्गा भागवतांचे आजोबा राजाराम शास्त्री भागवत यांनी १८८५ साली तर ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर यांनी १९२७ सालीच त्यांच्या ग्रंथांमधून लिहून ठेवली आहे. मराठी अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी ही राज्य सरकारने खूप प्रयत्न केले.

आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. केंद्र सरकारने मराठीसह पाली, बंगाली, आसामी आणि प्राकृत या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. अनेक वर्षांपासून मराठी साहित्यिक, भाषा अभ्यासक आदींनी ही मागणी लावून धरली होती. अखेर या सर्वांचे व आपल्या मराठी जनांचे स्वप्न पूर्ण झाले.

३ ऑक्टोबर २०२४ ला हे मान्य झाले. यामुळे सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकवण्याची सुविधा होईल. मराठीतील प्राचीन ग्रंथांना अनुवादित करण्यास सुरुवात होईल. राज्यातील १२ हजार ग्रंथालयांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरला, सर्व ग्रंथालय सशक्त झाली.

मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी, जपण्यासाठी, संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना मोठी मदत झाली आहे. अभिजात भाषेतील स्कॉलरसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात.. यापुढे हा पुरस्कार मराठी भाषेत काम करणाऱ्या व्यक्तीला मिळेल, ही आपल्यासाठी आपल्या मराठी भाषेसाठी आनंदाची बाब आहे.

# भाषेला अभिजात दर्जा मिळणे का महत्त्वाचे आहे

कु.ऐश्वर्या भास्कर कानवडे
द्वितीय वर्ष, विज्ञान

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, याचा अर्थ असा की, मराठी भाषा आता भारतातील अभिजात भाषांच्या यादीत समाविष्ट झाली आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असायला हवी. त्या भाषेतील समृद्ध ग्रंथ व अन्य साहित्य परंपरा असावी. ते मूळ त्याच भाषेतील लिहिलेले असावे. अनुवादित नसावे. भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे अशा सर्वसाधारण अटी आहेत.

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणजे नेमके काय झाले ?**

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठीसह बंगाली, आसामी, प्राकृत, पाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून मराठी साहित्यिक, भाषा अभ्यासक यांनी ही मागणी लावून धरली होती. अखेर या सर्वांचे स्वप्न आज पूर्ण झाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी चळवळ उभी करण्यात आली होती. राज्य शासनाने रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समिती देखील नेमली होती. या समितीने ५०० पानांचा अहवाल केंद्राकडे सादर केला होता. ज्यामध्ये मराठी भाषा वैशिष्ट्यपूर्ण असून, ती अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण करते. याचे पुरावे देण्यात आले होते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे आता मराठीच्या बोलींचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळेल. संशोधन आणि साहित्यसंग्रह करण्याच्या दृष्टीने चालना मिळणार आहे. सर्वात महत्त्वाची म्हणजे, भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकविण्याची सुविधा उपलब्ध केली जाऊ शकते. मराठीतील प्राचीन ग्रंथांना अनुवादित करण्याची सुरुवात होणार आहे. राज्यातील बारा हजार ग्रंथालयांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. या निर्णयानंतर सर्व ग्रंथालय सशक्त होतील.

मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी, संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी यांना मोठी मदत मिळू शकेल. अभिजात भाषेतील स्कॉलर्स साठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. यापुढे हा पुरस्कार मराठी भाषेत काम करणाऱ्या व्यक्तीला मिळेल. मराठीसह पाच भाषांना अभिजात दर्जा देण्याआधी तमिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला होता. केंद्राच्या आजच्या निर्णयामुळे मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार सह केंद्र सरकारकडून भरीव अनुदान मिळेल.

कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देण्याचे अधिकार हे केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाला आहेत. गृहमंत्रालयाने २००५ साली हे अधिकार सांस्कृतिक मंत्रालयाला दिले. मराठीच्या अभिजात दर्जाबद्दल संशोधन करून तसा अहवाल केंद्र सरकारला देण्यासाठी २०१२ साली प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली. २०१३ साली या समितीने आपला अहवाल प्रकाशित केला. महारठी, महरठी, मऱ्हाटी, मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला. असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्र भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्ष जुनं असल्याचे पुरावे असल्याचे या अहवालात म्हटलं आहे.

अकरा कोटी लोकांची मराठी जगातली दहाव्या क्रमांकाची भाषा आहे. देशातली ती एक महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे. तिच्या ऐतिहासिक प्रवासाचे संदर्भ देत आणि विविध शतकांमध्ये विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाचा विचार करून, तिचं अभिजातपण स्वयंसिद्ध आहे. समितीने सादर केलेले पुरावे सगळ्यांनाच पटतात असंही नाही. भाषा वैज्ञानिक चिन्मय धारूरकर यांनी बीबीसी मराठीसाठी लिहिलेल्या लेखात म्हटलं होतं की, महाराष्ट्री प्राकृत आणि मराठीचा संबंध लावणे हे केवळ अटीत बसण्याचा अट्टहास होय. मुळात केवळ नावात महाराष्ट्री असल्याने संबंध प्रस्थापित झाला, इतकी ती सहज सोपी गोष्ट नाही. महाराष्ट्री प्राकृतची लाळ ज्या

निकषांवर मराठीशी जोडता येते, तशीच ती गुजरातीशी देखील जोडता येईल. आणि उद्या ज्या निकषांवर मराठीला अभिजात ठरवले जाईल, त्याच निकषांवर गुजराती देखील हा दर्जा मागू शकेल.

"मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला म्हणजे, ती एक प्राचीन भाषा आहे. आणि त्या भाषेतील साहित्य श्रेष्ठ आहे, असे मानले जाते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात."

अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी काही निकष पुढीलप्रमाणे:

१) भाषा किमान दीड ते दोन हजार वर्ष प्राचीन असावी.
२) त्या भाषेतील साहित्य परंपरा समृद्ध असावी.
३) त्या भाषेतील साहित्य मूळच्या भाषेत लिहिलेले असावे.
४) भाषेचा प्रवास अखंडित असावा.
५) प्राची आणि सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे.
६) माझा मराठीची बोलू कौतुके। परी अमृतातेही पैजा जिंके।।

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळताच संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण आहे. मराठीसह पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. यापूर्वी हा दर्जा सहा भाषांना मिळाला होता. केंद्र सरकारने १२ ऑक्टोबर २००४ रोजी अभिजात भाषेची श्रेणी जाहीर केली. सर्वात आधी तामिळ भाषेला २००४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा मिळाला होता. त्यानंतर २००५ मध्ये संस्कृत, २००८ मध्ये कन्नड आणि तेलगू, २०१३ मध्ये मल्याळम आणि २०१४ मध्ये ओडिया भाषेला अभिजात दर्जा मिळाला होता. त्यानंतर नऊ वर्षांनी केंद्र सरकारने मराठी, पाली, प्राकृत, असामी आणि बंगाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. भारतात आता एकूण ११अभिजात भाषा झालेल्या आहेत. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी गेल्या काही वर्षांपासून लढा सुरू होता. संसदेत वारंवार याबाबतची मागणी होत होती. राज्यातल्या सर्वच पक्षांनी ही मागणी लावून धरली होती. त्यामुळे अभिजात भाषा म्हणजे काहीतरी आहे, इतकीच माहिती सामान्य नागरिकांना होती.

२००४ मध्ये जेव्हा नियम तयार केले गेले, तेव्हा त्या भाषेतील ग्रंथांची पुरातनता आणि हजार वर्षांच्या इतिहासाची नोंद असणं गरजेचं होतं. प्राचीन साहित्य ग्रंथांना एक भाग ज्याला वक्त्यांच्या पिढ्यांकडून मौल्यवान वारसा म्हणून गणलं जातं. त्याचबरोबर साहित्यिक परंपरा मूळ असली पाहिजे, आणि दुसऱ्या भाषेतून घेतलेली नसावी, या निकषावर तामिळ ही भाषा अभिजात भाषा म्हणून ग्राह्य धरली गेली.

नोव्हेंबर २००५ मध्ये अभिजात भाषेच्या निकषात सुधारणा करण्यात आली आणि संस्कृतला हा दर्जा मिळाला होता. अभिजात भाषा ठरवण्यासाठी त्या भाषेचा इतिहास हा दीड ते २००० वर्ष जुना असणं गरजेचं आहे. दुसऱ्या भाषेतून सदर भाषा उसनी घेतलेली नसावी. तसेच त्याची एक स्वतंत्र साहित्य परंपरा असावी. प्राचीन भाषा आणि आधुनिक भाषेत फरक असणं गरजेचं आहे. २०२४ मध्ये यात एक निकष सुधारला गेला. यात ज्ञानग्रंथ विशेषतः गद्यग्रंथ व्यतिरिक्त कविता, शिलालेख यांचा पुरावा म्हणून वापर केला गेला. म्हणजेच भाषेतील प्राचीन साहित्य, शिलालेख आणि जुन्या नोंदी असणं गरजेचं आहे.

तामिळ भाषेला २००४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, पण मराठीसाठी २०२४ उजाडाव लागलं. जवळपास २० वर्षांनी मराठी भाषेला हा दर्जा मिळाला आहे. जगातील क्रमवारीमध्ये पहिल्या १५ क्रमांकात स्थान आहे. पण असं असूनही मराठीसाठी लढा द्यावा लागला. अभिजात भाषेचे संवर्धन करण्यासाठी दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा निधी दिला जातो. इतकच काय देशातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये अभिजात भाषा शिकवण्यासाठी तरतूद करण आवश्यक आहे. तसेच या भाषांचा अभ्यास करण्यासाठी केंद्रीय विद्यापीठामध्ये अध्यासनांची स्थापना केली जाते. प्राचीन ग्रंथ अनुवादीत करण्यासोबत ग्रंथालयांना पाठबळ मिळतं. अभिजात भाषेतील दोन अभ्यासकांना दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. अभिजात भाषांचं संशोधन करण्यासाठी अ सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडीज इन क्लासिकल लँग्वेज ची स्थापना केली जाते. दुसरीकडे शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात लक्षणीय रोजगाराच्या संधी निर्माण होतील. प्राचीन ग्रंथ आणि ज्ञान प्रणालीचे पुनरुज्जीवन करण्यास प्रोत्साहन मिळेल.

तामिळ आणि संस्कृत भाषेला गृह मंत्रालयाकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाला होता. त्यानंतर पुढील अंमलबजावणी आणि भविष्यातील मान्यतेची, जबाबदारी सांस्कृतिक मंत्रालयाने स्वीकारली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. ही एक लढाई यशस्वी झाली. मराठी भाषिकांसाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात. मराठी भाषेने हे सर्व निकष पूर्ण केले आणि म्हणूनच तिचा दर्जा अभिजात भाषांमध्ये समाविष्ट केला गेला.

संत ज्ञानेश्वर महाराज मराठी भाषेचे कौतुक करताना म्हणतात ...

'माझा मराठीची बोलू कौतुके ।
परी अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।।'

अमृताहुनी गोड असलेली मराठी ही आपल्या महान अशा महाराष्ट्राची मातृभाषा आहे. आपल्याला आईसारखी प्रिय असलेल्या मराठी भाषेचा अभिमान आहे. आज असंख्य साहित्य मराठी भाषेत उपलब्ध आहे. सुरुवातीला आपल्या संतांनी लिहिलेले ग्रंथ, यानंतर अनेक विचारवंत आणि लेखकांनी लिहिलेली पुस्तके, कथा, कादंबऱ्या यामुळे मराठी भाषेच्या साहित्यात आमूलाग्र बदल होत गेला. मराठी भाषेतील आद्य कवी मुकुंदराज यांनी आपल्या 'विवेकसिंधू' ग्रंथामध्ये मराठी भाषेचा गौरव करताना सांगितलेले आहे. आपल्या मराठी भाषेत इतके ग्रंथ उपलब्ध आहेत. खूप सारे ज्ञान आपल्या भाषेत उपलब्ध आहे. मग ज्ञान मिळविण्यासाठी इतर भाषांचा उपयोग का करावा ?

# मराठी भाषा

कु.मोहिनी दिलीप गुंड,
द्वितीय वर्ष, विज्ञान

संत ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे की, माझा मराठीची बोलू कौतुकें। परि अमृतातेही पैंजा जिंके। अमृतासाठी पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेला अजूनही अभिजात भाषेचा दर्जा मिळाला नव्हता. शेवटी ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी आनंदाची बाब आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी चार निकष लावले जातात.

१. संबंधित भाषेच्या साहित्याचा इतिहास हा किमान १५०० ते २००० वर्षे प्राचीन असावा.

२. या भाषेतील प्राचीन साहित्य हे महत्त्वाचे मौल्यवान असावे.

३. भाषेला स्वतःचे स्वयंभूषण असावं. ती कोणत्या भाषेतून उसनी घेतलेली नसावी.

४. प्राचीन भाषेचे स्वरूप हे सध्याच्या भाषेपासून वेगळे असावे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, एक लढाई यशस्वी झाली. आपल्या मराठी भाषिकांसाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी मराठीने वरील निकष पूर्ण केले, म्हणूनच तिचा दर्जा अभिजात भाषांमध्ये समाविष्ट केला गेला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा अर्थ हा आहे की, 'मराठी भाषा आता भारतातील त्या विशिष्ट भाषांच्या यादीत आली आहे'. प्राचीन परंपरा, साहित्यिक श्रीमंती आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे अभिजात भाषांना ओळखले जाते.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने भरपूर फायदे आहेत. भाषेचे संवर्धन आणि संरक्षण झाले. सरकारकडून मराठी भाषेच्या संशोधनासाठी आणि तिच्या संवर्धनासाठी निधी मिळेल. त्यामुळे मराठी भाषेच्या जतनासाठी आणि प्राचीन साहित्याच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन मिळेल. शोध कार्याला प्रोत्साहन मिळेल. अभिजात भाषांवर संशोधन करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय स्तरावर विशेष अनुदान आणि शिष्यवृत्ती दिली जाईल. मराठी भाषेतील प्राचीन साहित्य-संस्कृती आणि इतिहास यांचे अधिकाधिक शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश होईल. ज्यामुळे मराठी विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेचा अधिक खोल अभ्यास करता येईल. अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचा दर्जा उंचावला गेला आणि तिच्या जतनासाठी प्रसारासाठी अनेक नवे मार्ग खुले झाले आहेत.

मराठी भाषा ही इंडो युरोपियन भाषा कुळातील एक भाषा आहे. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर, गोवा राज्याची सह अधिकृत भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्रीय प्राकृतचे आधुनिक रूप आहे, म्हणूनच आम्ही म्हणतो,

''शान माझी मराठी, गान माझा मराठी,<br>
अभिमान माझा मराठी, स्वाभिमान माझा मराठी.<br>
माझ्या मराठीची गोड मधाळ वाणी, मराठी भाषा माझी महाराष्ट्राची राणी.<br>
लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी,<br>
ज्ञानेश्वरांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी, तुकोबांनी रचली गाथा,<br>
समृद्ध संपन्न झाली, माझी मराठी भाषा..''

मराठीचे वय सुमारे २४०० वर्ष आहे. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेले आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे. गोवा आणि गुजरात सारख्या राज्यातही मराठी भाषा काही प्रमाणात बोलली जाते. गोव्यात मराठीला समृद्ध असा इतिहास आहे.

मराठी भाषेचा उदय प्राकृत भाषेच्या 'महाराष्ट्र' या बोलीभाषेपासून झाला, असे बहुतांशी मानले जाते. नव्या संशोधनानुसार मराठी अन् प्राकृत ह्या एकच भाषा असल्याचे सम प्रमाण सिद्ध केले आहे. सदर महाराष्ट्र शासनाच्या संशोधन अभिजात मराठी प्रतिवृत्ताने केले. ज्ञात इतिहासावर पैठण येथील सतवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली. मराठी ही भाषा दैवत नागरी लिपी वापरून लिहिली जाते. मराठीतील आज उपलब्ध असलेला पहिला ग्रंथ 'गाथा सप्तशती' हा सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा आहे. मुकुंद राजांनी 'विवेकसिंधू' या ग्रंथाद्वारे शंकराचार्यांच्या वेदांतावर निरूपणात्मक विवेचन केले आहे. शके ११९० मध्ये लिहिला गेलेला मराठीतील हा आद्यग्रंथ. इसवी सन १२७८ मध्ये म्हाइंभट यांनी 'लीळाचरित्र' लिहिले. त्यानंतर इसवी सन १२९० मध्ये 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाचे रचना ज्ञानेश्वरांनी केली. महानुभव संप्रदायाने मराठी साहित्यात मौलिक भर घातली. संत एकनाथ यांनी या भाषेत भारुडे लिहिली व या 'एकनाथी भागवत', 'भावार्थ रामायण' आदी ग्रंथांची भर घातली.

खरंतर आपल्या मराठी भाषेचा अभिमान असलाच पाहिजे.आपल्या मराठी भाषेत अनेक साहित्य, कादंबऱ्या, पोवाडे, लेख, कविता, ग्रंथ आहेत. आपली मराठी भाषा आपला स्वाभिमान आहे. आपल्याला आपल्या मराठी भाषेची किंमत तेव्हाच कळते, जेव्हा आपण परदेशात किंवा परराज्यात जातो. तिथे आपल्याला दुसरी भाषा बोलायला लागते. असं वाटतं कुणीतरी आपल्याला वाळीत टाकलेले आहे. खरं तर ही जादू आपल्या मराठी भाषेची आहे. उगाच नाही आपण मराठी भाषेला मातृभाषा किंवा मायबोली म्हणत. तर त्यामागचं खरं कारण आहे, ही भाषा आपल्याला आपली वाटते. आपली या भाषेची नाळ जोडलेली आहे. आपल्याला मराठी भाषेचा लळा लागलेला आहे. आपण मराठी भाषा बोलतो ही आपल्यासाठी एक भाग्याची गोष्ट आहे, हे भाग्य प्रत्येकाच्या नशिबात असतेच असे नाही असं मला वाटतं. मराठी भाषा ही सर्वोत्कृष्ट भाषा आहे. जर आपल्याला मराठी बोलता येत असेल, तरच आपण इतर भाषा शिकू शकतो. मराठी भाषा ही अशी भाषा आहे की, या भाषेबद्दल कितीही लिहिलं तरी ते कमीच आहे.

मराठीमध्येच वाल्मीक ऋषींनी 'रामायण' लिहिले. तसेच 'गीता', शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' कादंबरी असे प्रसिद्ध ग्रंथ, कादंबऱ्या ज्या की आपल्याला जीवन कसे जगावे? कसे वागावे? व कसे बोलावे? शिकवते. हे सगळं मराठी भाषेतच आहे. अशी माझी मौल्यवान भाषा आहे, तर का नाही या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणार.

तामिळ भाषेला २००४ साली अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. पण मराठीसाठी २०२४ उजाडावा लागला. जवळपास २० वर्षांनी मराठी भाषेला हा दर्जा मिळाला आहे जगातील ११ कोटी लोकांनी मराठी ही भाषा असून जागतिक क्रमवारीत पहिल्या १० क्रमांकाची स्थान आहे. पण असं असूनही मराठीसाठी लढा द्यावा लागला. त्याचं झालं असं की, २०१२ मध्ये प्राध्यापक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. त्यांनी २०१३ मध्ये अहवाल सादर करताना मराठीचा उच्चार बदलत गेल्याचा नमूद केलं. महारठठी,महरठठी, मऱ्हाटी आणि मराठी असा उच्चार होत गेल्याचे सांगितलं. तितकच नव्हे तर मराठी भाषा अडीच हजार वर्षे जुनी असल्याचेही अहवालात नमूद केलं गेलं. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला होता.

अभिजात भाषेचे संवर्धन करण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जातो. इतकच काय तर देशातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये अभिजात भाषा शिकवण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच या भाषांचा अभ्यास करण्यासाठी केंद्रीय विद्यापीठामध्ये अध्यासनांची स्थापना केली जाते. प्राचीन ग्रंथ अनुवादीत करण्यासोबत ग्रंथालयांना पाठबळ मिळतं, अभिजात भाषेतील दोन अभ्यासकांना दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. अभिजात भाषेचा संशोधन करण्यासाठी स्थापना केली जाते. दुसरीकडे यामुळे शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात लक्षणीय रोजगार संधी निर्माण होतील. डिजिटायझेशन संग्रहण, भाषांतर, डिजिटल मीडिया यासारख्या क्षेत्रात नोकऱ्या निर्माण होतील. प्राचीन ग्रंथ आणि ज्ञान प्रणालीचे पुनरज्जीवन करण्यास प्रोत्साहन मिळेल.

पीआयबीच्या रिपोर्टनुसार शिक्षण मंत्रालयाने अभिजात भाषेच्या प्रगतीसाठी विविध पावलं उचलली आहेत.

संस्कृतला प्रोत्साहन देण्यासाठी २०२० मध्ये संसदेच्या कायद्याद्वारे तीन केंद्रीय विद्यापीठांची स्थापना करण्यात आली आहे. सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ क्लासिकल तमिळीची स्थापना करण्यात आली आहे. याद्वारे प्राचीन तामिळ ग्रंथांचे भाषांतर करणे, संशोधनासाठी चालना देण्यासाठी आणि विद्यापीठातील विद्यार्थी आणि भाषा अभ्यासकांसाठी अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आला आहे. शास्त्रीय भाषांचा अभ्यास आणि जतन आणखी वाढवण्यासाठी म्हैसूर मधील 'सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस' च्या अधिपत्याखाली अभिजात कन्नड, तेलगू, मल्याळम आणि ओडिया या भाषांच्या अभ्यासासाठी केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त शास्त्रीय भाषेच्या क्षेत्रातील कामगिरी ओळखण्यासाठी आणि प्रोत्साहित करण्यासाठी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले गेले आहेत. केंद्र सरकारने आज जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मराठीला आणि अन्य भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे नोकरीच्या संधीत वाढ होईल. विशेषतः सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होतील, त्याचबरोबर संवर्धन, माहिती गोळा करणे या भाषांमधील पुरातन साहित्याचं प्रकाशन तसेच डिजिटल माध्यमात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. केंद्र सरकारच्या आजच्या निर्णयामुळे महाराष्ट्र (मराठी), बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश (पाली आणि प्राकृत), पश्चिम बंगाल (बंगाली), आसाम (आसामी) या राज्यांवर या निर्णयाचा प्रभाव पडेल. मात्र राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर या निर्णयाचा पुरोगामी परिणाम होईल. माझ्या मातृभाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल मला खूप आनंद झाला. मलाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही आनंदाची बाब आहे.

# आजची तरुण पिढी आणि प्रसार माध्यमे

कु.हर्षदा मधुकर शेटे,
प्रथम वर्ष वाणिज्य

'६५ किलोची तलवार वागवतात त्यांचं नाव येसाजी'
'हजारांच्या विरोधात एकटे खिंड लढवतात त्यांचं नाव बाजी'
'स्वामींसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालवतात त्यांचं नाव जीवाजी',
आणि या सगळ्यांना एकत्र आणून घडवतात त्यांचं नाव 'शिवाजी'.

भारत देशातील महाराष्ट्र राज्यात शिवाजी महाराजांसारखे तरुण होऊन गेले. स्वराज्य उभे केले ते तरुणांच्या जीवावर. देशाला स्वातंत्र्य मिळाले ते तरुणांच्या जीवावर. जगातील सर्वात मोठी क्रांती म्हणजे फ्रेंच क्रांती ही त्या देशातील तरुणांचच देण आहे. हा आहे तरुणांचा इतिहास. तरुणांमुळे सर्व चक्र चालते असे म्हणायला काही अडचण नाही.

तरुण काय असतो? या देशाची संस्कृती काय? आमच्या राष्ट्राचे सामर्थ्य काय? हे स्वामी विवेकानंदांनी सिद्ध केले. स्वामी विवेकानंद हे तरुण असताना अंगावरती भगवी वस्त्र परिधान करून सर्वस्वाचा त्याग केला. यातून तरुण पिढीला चांगला संदेश मिळाला आहे. तरुण कसा असावा, हा आदर्श झेपवण्यासाठी आवश्यक असलेलं सामर्थ्य कसं असावं, याचा आदर्श विवेकानंद आहेत. पण आज आदर्श घेणारे तरुण मात्र वेगळ्याच मार्गाला लागले आहेत. आपण काय करावे आणि काय करू नये याचे भान विसरले आहेत.

आजची तरुण पिढी ही पुस्तके वाचून ज्ञान मिळवण्यापेक्षा इतर गोष्टींसाठी म्हणजेच प्रसारमाध्यमांना वेगळे महत्त्व देत आहे. त्यांना त्याशिवाय जगणे कठीण झाले आहे असे दिसते. सर्व इतर प्राण्यांपेक्षा मनुष्यप्राणी हा वेगळा पडतो. कारण तो त्यांच्या ज्ञानाने इतरांशी जास्त प्रगती करताना दिसतो. या प्रगतीमुळे पृथ्वीवरील माणसाचे अस्तित्व टिकून आहे. पण ही प्रगती कुठेतरी खुंटल्यासारखी वाटते. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणायचे, ''जेव्हा या देशातील तरुण पिढी ही योग्य चालायला सुरुवात करेल, तेव्हा या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीच रोखू शकत नाही. प्रत्येक देशाची वृद्धी तेथील तरुणांवर अवलंबून असते.''

पण आजची तरुण पिढी ही प्रसार माध्यमांचा योग्य वापर करण्यापेक्षा अयोग्य वापर करत असताना दिसते आहे. कित्येक फेक अकाउंट असलेले फेसबुक, अफवा पसरवणारे व्हाट्सॲप, घरी माय बापाचं न ऐकणाऱ्यांना जिथे दुसऱ्यांची टिवटिव ऐकावी लागते ते ट्विटर आणि ज्यांच्या शिवाय आयुष्याचा टायर हे पंक्चर ट्यूब झाल्यासारखं वाटतं ते युट्युब ही सगळी प्रसारमाध्यमे आहेत. अनेक तज्ज्ञांनी असे म्हटले आहे की, कित्येक युवकांचे या प्रसार माध्यमांमुळे आयुष्य घडले तर कित्येक बुद्धी जीवांचे असेही मत आहे की,'प्रसारमाध्यमे हे युवकांचा मार्ग भटकवण्यासाठी जबाबदार आहेत. आपल्या देशाला महासत्ता बनवण्याची जबाबदारी ज्या युवकांवर आहे. तो युवक स्वहित आणि देशहितासाठी प्रसारमाध्यमांचा वापर करतो का? प्रसारमाध्यमांवर तरुणांची भूमिका काय आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळेनाशी झाली आहेत. कर्तव्याची जाण आणि जबाबदारी नसल्यागत आपला मौल्यवान वेळ वाया घालवला जात आहे.

समाजाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांचे भान विसरून अजाणतेप्रमाणे प्रसार माध्यमांचा वापर तरुणांकडून सुरू आहे, तेव्हा माध्यमे समाजाचा प्रसार करण्यासाठी आहेत का? असा प्रश्न पडतो. ६ ऑगस्ट १९९१ साली युरोप आणि युनियन यांनी जगातील पहिली वेबसाईट बनवली तर २००४ साली फेसबुकची निर्मिती झाली आणि प्रसारमाध्यमांच्या क्रांतीला सुरुवात झाली. प्रसार माध्यमे ही सुद्धा विश्वासाच्या चारही दिशांचे चांगले विचार आपल्यापर्यंत घेऊन येते, परंतु आजची तरुण पिढीचे मन व्हाट्सॲपच्या स्टेटसला दिलेला आहे. आजच्या तरुण पिढीचे मस्तक हे फेसबुक मेसेंजरवर मुलीच्या फेक अकाउंट व चॅटिंग करण्यामध्ये नतमस्तक झालेले आहे आणि त्यांचा मेंदू हा प्रसारमाध्यमांनी भरलेला आहे.

प्रसारमाध्यमांचा आजच्या तरुण पिढीवर प्रचंड प्रभाव आहे. युवकाला पबजी आणि ब्लुवेल सारखे घातक आणि वेळखाऊ गेम तर माहित आहेत, परंतु या देशासाठी वयाच्या २३ व्या वर्षी हसत हसत फासावर जाताना सळसळत्या रक्तांचा, धगधगता रक्तार शहीद 'भगतसिंग' मात्र माहीत नाहीत. तरुण मुलींना ऐश्वर्या राय च्या मुलीचे नाव आणि सैफ अली खानच्या मुलाचे नाव माहित आहे, मात्र भारताचे राष्ट्रपती होऊन गेलेले डॉ. अब्दुल कलाम यांचे पूर्ण नाव माहीत नाही. प्रसारमाध्यमातून मेसेज किंवा रिप्लाय देणारी तरुण पिढी हे स्वतःच्या आईला पडणाऱ्या टाचांच्या भेगांशी अनभिज्ञ आहे. शेतकऱ्याला कर्जमाफी व्हावी यावर कमेंट करतो पण आपल्या स्वतःच्या बापाला शेतात काम करण्यासाठी मदत करावी असे वाटत नाही ही शोकांतिका आहे. सर्व भान हरपून आणि योग्य काय ? अयोग्य काय ? याची सांगड न घालता आजचा तरुण जगत आहे.

संत तुकोबा म्हणायचे, ''पुत्र व्हावा ऐसा गुंडा की ज्याचा तिन्ही लोकी झेंडा।।''

परंतु आजच्या युवकांची अवस्था अशी आहे की, 'पुत्र झाला गुंडा की ज्याचा फक्त प्रसार माध्यमावर झेंडा.' असा प्रसारमाध्यमांवर झेंडा फडकवणारा युवक इतका गुरफटून गेला आहे की, तो म्हणतो, 'आहे तरुण तर घे मजा करून जाशील मरून तर टाकतील पुरून.' असे वाटते की आजच्या तरुणांचे विचार असे झाले पाहिजेत की,'समाजसेवा करू मन भरून, भ्रष्टाचारास टाकू पुरून, विरोधगारीच टाकू मारून, गोरगरिबांना सोबत धरून, अन्यायाचा पराभव दाखवू करून. या देशाला तेव्हाच म्हणू की, आम्ही या देशाचे तरुण प्रसारमाध्यमांचा योग्य वापर करून भारताला महासत्ता टाकू करून' असे विचार हे प्रसार माध्यमांवरून आजच्या तरुण पिढीचे असायला हवेत.आजची तरुण पिढी ही ८० टक्के इंटरनेटचा वापर हा मनोरंजनासाठी करते व वीस टक्के वापर हा शैक्षणिक व इतर चांगले गोष्टींसाठी करते हाच वापर उलटा केला तर, भारत देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. माती जर ओली असेल तरच त्याला आकार देता येतो. तसेच अजून आपलाही वेळ वाया गेलेला नाही. आपण नव्याने सुंदर आयुष्य जगण्यासाठी आजचा तरुण पिढीने प्रयत्न केले पाहिजेत.

संत कबीर असे म्हणतात,

''जो रहीम उत्तम प्रकृती का करी सतत कुसगं, चंदन विष व्यापक नाही लिपटे रहे भुजंग..''

याचा अर्थ असा की, ज्याप्रमाणे चंदनाच्या झाडाला सापाने विळखा घातल्यानंतर त्या चंदनामध्ये सापाचं विष जात नाही. अगदी त्याचप्रमाणे आजच्या तरुण पिढीला या प्रसारमाध्यमांच्या जाळ्यात अडकून सुद्धा प्रसारमाध्यमांतील चांगल्या गोष्टी कोणत्या आणि वाईट गोष्टी कोणत्या यातील फरक कळेल, तेव्हा खऱ्या अर्थाने प्रसारमाध्यमांचा योग्य वापर होईल. या प्रसारमाध्यमांचा प्रामाणिकपणे वापर केला, तरच प्रत्येकाचे आयुष्य समृद्ध होईल. एखाद्या युवकाला नोकरी मिळावी, विचारांची क्रांती होऊन एखादा नायक तयार व्हावा, आपल्या सुस्वराने एखादा गायक तयार व्हावा. कुणी वक्ता, कोणी लेखक तयार व्हावा आणि प्रत्येक तरुणाच्या विकासातून माझा देश महासत्ता व्हावा. यासाठी जर आजच्या तरुण पिढीने समाज माध्यमांचा वापर केला तर, खऱ्या अर्थाने आजच्या तरुण पिढीने समाज माध्यमांचा योग्य वापर केला असे म्हणता येईल.

प्रत्येक गोष्टीवर त्या त्या व्यक्तीचा दृष्टिकोन अवलंबून असतो. आजूबाजूच्या गोष्टीकडे बघण्याचा दृष्टिकोन जर बदलला तर आजूबाजूची सृष्टी देखील बदलत असते आणि प्रसारमाध्यमांकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सत्य आणि चांगले याचा स्वीकार करणे गरजेचे आहे. आजची तरुण पिढी ही स्वतःच्या आयुष्यात काय होतं, स्वतःच्या घरात काय चाललंय? यापेक्षा २४ तास हे प्रसारमाध्यमांसाठी देतात या पेक्षा दुसरी वाईट गोष्ट नाही असे वाटते. जर आजच्या तरुण पिढीने प्रसारमाध्यमांचा वापर व्यक्तिमत्व विकासासाठी, व्यवसायाच्या विस्तारासाठी, स्वतःत दडलेल्या कलेच्या प्रदर्शनासाठी ईलर्निंग साठी केला तर प्रत्येक जण स्वतःच्या आयुष्यात यशस्वी होईल आणि नक्कीच स्वामी विवेकानंद यांना अपेक्षित असलेला भारत आणि ज्या ज्या व्यक्तीने हा हिंदुस्थान घडवला आहे तो भारत आपण सर्व मजबूत बनवूया.

''मन, मेंदू आणि मनगटावर विश्वास हवा,
नुसतं वय वाढलं म्हणून होत नसतो युवा.''

# तरुण पिढी, समाज माध्यमे आणि देशाचा विकास

श्रीमती अनिता दगडू सहाणे,
कनिष्ठ लघुलेखक

देशाचे भविष्य हे तरुण पिढीच्या हातात आहे, परंतु ही तरुण पिढी आज मोठ्या प्रमाणात प्रसार माध्यमांच्या आहारी गेलेली दिसते. 'तरुण पिढी' ही आपली समस्या नसून शक्ती आहे. तसेच तरुण पिढीच्या हातामध्ये बळ आहे. फक्त या बळाचा वापर समाज उपयोगी कार्यासाठी व्हावा. आजचा तरुण चिकित्सक, बुद्धिवादी व धडाडीचा आहे. प्रचंड महत्त्वाकांक्षा व जबर इच्छाशक्ती यांच्या आधारे खरोखरच तो आकाशाला गवसणी घालू शकतो. आजची तरूण पिढी ही हुशार आणि तंत्रस्नेही आहे. काहीतरी करून दाखविण्याची धमक या आजच्या तरूणाईमध्ये आहे.

विज्ञानाने देखील सिद्ध केले की, मागील तरुण पिढीपेक्षाही आजची तरुण पिढी ही दहा पटीने पुढे आहे. म्हणूनच तर त्याचे पडसाद हे आजच्या प्रगतीच्या वाटेवर देखील दिसून येत आहेत. या नव्या युगाला आता 'मॉडर्न युग' म्हणून ओळखले जाते. तरुण पिढी प्रसारमाध्यमांच्या उपलब्ध सुविधांचा मोठ्या प्रमाणात वापर करताना दिसत आहे. मोबाईल, संगणक, इंटरनेट व अनेक प्रकारच्या चैनीच्या वस्तूंबद्दलची त्यांची आकर्षकता वाढत आहे. आणि त्यातील तंत्र आत्मसात करून तरूणाई स्वतःला आज मॉडर्न बनवू पाहते आहे. परंतु ही तरूणाई स्वतःला जितकी मॉडर्न बनवू पाहते, तितकीच ती मनाने व विचारांनी मॉडर्न आहे का? याचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. आणि नसेल तर त्याची कारणेही जाणून घेणे आवश्यक आहे.

तरुण पिढी म्हणजे देशाची आशा आणि अपेक्षा आहे. परंतु आजची तरुणाई खरोखरच समाजासाठी आणि येणाऱ्या पुढच्या पिढीला आर्दश आहे काय? सन २००१ च्या जनगणेनुसार भारतात एकूण लोकसंख्येत तरुणांची संख्या जास्त आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत देखील सर्वात जास्त तरुण आपल्या देशात आहेत.जगभरात मोठ्या प्रमाणात प्रसार माध्यमांचा वापर वाढल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना सुद्धा घरबसल्या आर्थिक व्यवहार करता येतात व कोणत्याही विषयाची कमी वेळात आणि सविस्तर माहिती मिळते. त्याचबरोबर जगभरातील घडामोडी, भौगोलिक माहिती, निसर्गरम्य ठिकाणे हे सर्व थेट प्रेक्षपणामुळे घरबसल्या लोकांना पाहता येतात. सर्व कवी, लेखक, फोटोग्राफर, कलाकार इ. मंडळींनी प्रसार माध्यमांचा वापर स्वतः व्यक्त होण्यासाठी खुबीने केला आहे. समाजमाध्यमे जसे की, फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप यासह टेलिव्हिजनचा अतिरेकी वापर झाल्यामुळे या परिस्थितीत ही तरूण पिढी भरकटणार तर नाही ना, अशी रास्त शंका मनात येते. आपल्या पोस्टला सर्वाधिक लाईक कसे मिळतील यासाठी आता सोशल मीडियावर स्पर्धा सुरु झाली आहे.

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत करण्यामध्ये तरुण पिढीने पुढाकार घेतला. व्हॉट्सअॅप, फेसबुक, ट्विटर या माध्यमांचा त्यावेळी प्रभावीपणे वापर करून, पूरग्रस्तांना मदत करण्यात आली. पूरग्रस्तांना मदत करणाऱ्या तरुणांमध्ये समन्वय ठेवण्यासाठी हा सोशल मीडियाचा वापर झाला. प्रसार माध्यमांना काहीजण आभासी, काल्पनिक जग असं संबोधतात. पण मला तसं वाटत नाही. प्रसार माध्यम हे एक प्रकारे समाजाचेच प्रतिबिंब असते. समाजातील बऱ्या वाईट प्रवृत्तीच दर्शन प्रसार माध्यमांवर घडत असते. आज देशात कोणतीही महत्वाची घटना घडल्यास त्याचे पडसाद पहिल्यांदा प्रसार माध्यमांद्वारे उमटताना दिसतात. त्या घटनेविषयी चर्चा प्रसार माध्यमांतून घडून येते. अशी चर्चा करण्यात तरुणाई आघाडीवर राहिली आहे. अशा चर्चेतून समाजाला योग्य दिशाही मिळते. अशा चर्चा करण्यासाठी तरुणाईने वाचन, मनन, चिंतन इत्यादींच्या माध्यमातून स्वतःला अधिकाधिक बळकट करणे गरजेचे आहे.

प्रसार माध्यमांचा तरुण पिढीबरोबरच जुनी पिढी देखील वापर करत आहे. ही जुनी पिढी व्यक्त होतं नसली तरी तरुण पिढी प्रसार माध्यमांव्दारे कशी व्यक्त होते ? याच्यावर बारीक लक्ष ठेऊन असते. एकप्रकारे ही मंडळी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचेच काम करत असतात.प्रसार माध्यमांवर टाकलेली पोस्ट व्हायरल व्हायला जास्त वेळ

लागत नाही. अगदी वाऱ्यासारख्या पोस्ट व्हायरल होत असतात. अशा या व्हायरल जगात तरुणाईने आक्रमकतेला थारा न देता संयम ठेऊन विवेकी वृत्तीने व्यक्त होणं गरजेच आहे. तरुण पिढीच्या तुलनेने जुन्या पिढीचं प्रसार माध्यमावर व्यक्त होण्याच प्रमाण कमी आहे. आपण प्रसार माध्यमांचा वापर करून केलेली कृती, मांडलेलं मत अनेकजण वाचत व पाहत असतात. त्यामुळे प्रसार माध्यमांव्दारे व्यक्त होताना तरुणाईने जबाबदारीने व्यक्त होणं गरजेचं आहे.

प्रसार माध्यमांच्या अतिवापरामुळे अनेकांना नैराश्याला सामोरे जावे लागले आहे. लेखनाच्या माध्यमातून, मेसेजद्वारे प्रसार माध्यमांवरून मोठ्या प्रमाणात संवाद साधला जातो, पण प्रत्येकवेळी असा संवाद यशस्वी ठरतोच असे मात्र नाही. मेसेजरूपी अर्धवट संवादामुळे गैरसमज वाढण्याचीच शक्यता अधिक असते. त्यामुळे मैत्री जोडणारी ही प्रसारमाध्यमे मैत्री तोडण्यास देखील कारणीभूत ठरू शकतात. खोडसाळपणे एखाद्या व्यक्तीविषयी चुकीची माहिती पसरविण्यासाठी तसेच, व्यक्तीला बदनाम करण्यासाठी प्रयत्न केला जावू शकतो. त्यामुळे प्रसार माध्यमांवरील सर्व माहितीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नये. माहितीची शहानिशा करूनच विश्वास ठेवला पाहिजे.

रात्री किंवा दिवसभर मोबाईलचा वापर, व्हिडिओ गेम्स, टेलिव्हिजनचा वापर याचा परिणाम आज तरुणाईच्या अभ्यासावर, आरोग्यावर आणि वर्तणुकीवर देखील झालेला दिसून येतो. वर्तमानात जगताना आजची पिढी खरोखरच प्रगल्भ किंवा परिपूर्ण आहे का, यावर विचार करण्याची वेळ आली आहे. संग्रह मग तो खेळणीचा असो की पुस्तकांचा, तो टेलिव्हिजन किंवा मोबाइलला उत्तम पर्याय आहे. विशेष म्हणजे मुलांनाही याचा उत्तम फायदा होतो. वेगवेगळी खेळणी किंवा पुस्तके मुलांना खेळण्यास, वाचण्यास मिळतात. त्यातून मुलांना वाचनाची आवड निर्माण होते.

प्रखर राष्ट्रनिष्ठा व देशप्रेम यातूनच शेकडो क्रांतिकारक फासावर चढले. त्यातून भारताला स्वातंत्र्य मिळाले. परंतु आजपर्यंत भारताने एक महासत्ता म्हणून जगापुढे यायला हवे होते. तसे मात्र झाले नाही. शिक्षणव्यवस्थेतील काही त्रुटींमुळे आज बेकारांची संख्या वाढली आहे, लोकसंख्या नियंत्रणात नाही, पर्यावरणाचे प्रश्न ऐरणीवर आहेत, देशात स्वार्थी राजकीय नेत्यांनी युवकांचा जाती धर्मावर आधारीत द्वेष समाजात वाढविण्यासाठी वापर करून घेतला आहे.

खरतर तरूण पिढीशी पालकांनी अत्यंत मनमोकळेपणे बोलले पाहिजे. त्यामुळे पालक आणि पाल्य यांच्यात जनरेशन गॅप दिसणार नाही. आपली मुलं कुठे जातात?, कुणाशी बोलतात? इंटरनेट, मोबाईलचा उपयोग कुठल्या गोष्टींसाठी करतात, याची जाणीव पालकांना योग्य वेळी होणे अपेक्षित आहे. त्यातून जर काही विपरित आढळल्यास ते योग्य प्रकारे हाताळल्यानेही प्रश्न सुटतात. भरकटलेल्या तरुणांना योग्य मार्गावर आणणे शक्य असते. अशा या भरकटत चाललेल्या तरूणांना योग्य मार्गदर्शनच मॉर्डन बनवू शकते. पालकांच्या जीवन अनुभवाचा फायदा पाल्याला नक्कीच होऊ शकतो. त्यामुळे निर्णय घेताना पालकांचे मत विचारात घेणे आणि आपले विचार त्यांना पटवून देणे हे प्रत्येक पाल्याचे कर्तव्य आहे. युवकांच्या या बंद मुठीमध्ये संपूर्ण जग जिंकण्याची शक्ती आहे. या शक्तीचा सक्षमपणे वापर करावा. यासाठी समाजाने प्रयत्न केले पाहिजेत.

विकसनशील भारताला एक आर्थिक महासत्ता बनविण्याचा निर्धार आपण केला आहे. भारताचे भवितव्य या कोवळ्यांच्या हातात आहे. आपण हे हात मजबूत करायला हवेत. आज गरज आहे, युवकांपुढे चांगले आदर्श निर्माण करण्याची व शिक्षणव्यवस्थेत बदल करून ती अधिक मानवी व रोजगारप्रधान बनविण्याची. शिक्षणाबरोबरच मानवी जीवनमूल्ये युवावर्गात रुजविणे देखील महत्त्वाचे आहे. तसेच प्रसार माध्यमांचा योग्य गोष्टींसाठी वापर झाला पाहिजे. त्या अनुषंगाने शासनाने नियमावली तयार केली पाहिजे. तरुण पिढी आणि प्रसार माध्यमे यांची चांगली सांगड बसली तर देशाच्या विकासासाठी नक्कीच हातभार लागेल.

# तरुणाईच्या सृजनशिलतेच्या संवर्धनासाठी समाज माध्यमे

कु.काजल बाळचंद कोरडे,
प्रथम वर्ष, बी.सी.एस.

आजची तरुण पिढी धाडसी, पराक्रमी, आक्रमक आहे. तरुण पिढी अनुकरणप्रिय ही आहे. पण ती थोडीशी संभ्रमीत आहे, थोडीशी आगाऊ आहे. स्वतःला प्रगत म्हणते पण मागासही आहे. या पिढीला एक धुंदी आणि नशा जास्त प्रिय आहे.

'आजची तरुण पिढी धाडसी, पराक्रमी, आक्रमक आहे.' काय छान वाटले ना, हे ऐकून, पण ते तर आम्हीही आहोत. आम्ही धाडस दाखवले ते नवीन टेक्नॉलॉजी बरोबर जुन्या संस्कृतीची सांगड घालण्याची. आम्ही पराक्रम करत आहोत, तो दोन पिढ्यांना (आधीची आणि आजची) बरोबर घेऊन पुढे जाण्याचा! जे आम्हाला पटत नाही, त्याचा विरोध करताना आम्ही आक्रमक होतोच! उदाहरण द्यायचे झाले तर स्त्री वरचे अत्याचार.

आजच्या तरुण पिढीला अनुकरण करावेसे वाटते ते पाश्चात्य देशातील संस्कृतीचे. करा ना जरूर करा तुम्ही पाश्चात्य देशांचे पण तुम्ही अनुकरण करत आहात. ते जे सोपे आहे त्या गोष्टीचे तुम्हाला आकर्षण वाटेल ते फक्त त्यांच्या व्यसनाचे. त्यांची दारू, सिगारेट आणि नशा निर्माण करणारे ड्रग्ज तुम्हाला जास्त प्रिय आहेत आणि बरंच काही...!

आम्हाला आकर्षक वाटले ते त्यांनी ठेवलेल्या स्वच्छ परिसराचे, त्यांनी निर्माण केलेल्या टेक्नॉलॉजीचे. ज्यामुळे आपण जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातील लोकांशी संपर्क ठेवू शकतो. तसेच ज्यामुळे आपल्याला चांगले आणि योग्य ज्ञान मिळते. टेक्नॉलॉजीचा उपयोग योग्य रीतीने केला तर आपण निश्चितच प्रगतीपथावर असू. आपल्या पंतप्रधानांनी आधी गुजरातसाठी त्यातील समतोल शोधून काढला आणि आता आपल्या देशासाठी तो समतोल निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत.

'तशी तारुण्याला धुंदी आणि नशा कायमच तेच', पण या धुंदीत आम्ही भान विसरलो नाही किंवा या नशेतून आम्ही आत्मघातही करून घेतला नाही. तुम्हाला धुंदी आहे व्यसनांची.

तुम्हाला वाटते, We will look cool if we follow the attractive but cheap things of foreigners.

आजची तरुण पिढी आयुष्यातील निर्णय स्वतंत्रपणे घेताना दिसत आहे मग शिक्षणासाठी पुढचा मार्ग शोधणे असो, किंवा लग्नासाठी जोडीदार शोधणे असो. या सगळ्या गोष्टींसाठी आई-वडिलांचे मत घेणे खरे तर गरजेचे असते. पण काही मुले एकतर थेट निर्णय सांगून मोकळे होतात, किंवा काहीही न सांगता त्यांना अंधारात ठेवतात. मला वाटते याची बरीच कारणे असावीत, मुलांना कदाचित वाटते की, आपले आई-वडील जुनाट विचारांचे आहेत, ते आपली ही गोष्ट स्वीकारणार नाही किंवा आपले आई-वडील खूप शिस्तप्रिय आहेत. त्यांना या गोष्टी पटणार नाही, व ते आपल्याशी कठोर वागतील. या भीतीने मुले या गोष्टी लपवत असावेत आणि स्वतःच निर्णय घेत असावेत.

घरातील नको इतके स्वातंत्र्य आणि नको इतके बंधन या दोन्ही गोष्टी घातकच असतात. जर पालक सुरुवातीपासूनच मुलांची मनमोकळेपणे बोलत असतील तर, मुले कोणतीही गोष्ट लपविणार नाहीतच. सर्व काही सांगून त्यांचे मत विचारात घेतील आणि पटलं तर त्याप्रमाणे वागतील किंवा त्यांची मते आई-वडिलांना सांगतील.

"तरुण मन, नवे युग घडवू, विचारांच्या कळ्या फुलवू,
आजची तरुण पिढी, उद्याचे विश्व सजवू!"

शेवटी पालकांच्या पिढीमध्ये आणि आत्ताच्या पिढीमध्ये वैचारिक दरी असणारच आहे. पण पालकांनी आणि मुलांनीही आपलेच बरोबर आहे, हा अट्टाहास न करता गोष्टी समजून घ्याव्यात. बऱ्याच ठिकाणी पालक आपले निर्णय मुलांवर लादतात, त्यामुळे मुलांचा आवाज दाबला जातो, मग भीतीपोटी मुले घरी काहीही न सांगता निर्णय

घेतात.

''आजची तरुण पिढी स्वप्नांचे बळ घेते, प्रत्येक वाटा नव्या दिशा दाखवते,
आभाळाला भिडू पाहते ही उर्मी, तरुणाईची शपथ-प्रगतीची कर्मी!''

सोशल मीडिया हा तरुणाईच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तरुणाई सोशल मीडियावर सक्रिय असते. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हाट्सअप, युट्युब या माध्यमांचा वापर करण्यात आजची तरुण पिढी अग्रेसर आहे. २००४ साली स्थापन झालेल्या फेसबुकची भारतात २०१४ च्या दरम्यान लोकप्रिय व्हायला सुरुवात झाली. त्याला परिस्थिती देखील तशीच पोषक ठरली. सोशल मीडिया वापरण्यासाठी लागणारे इंटरनेट स्वस्थ दरात उपलब्ध झाले. स्वस्त दरातील स्मार्टफोन बाजारात उपलब्ध झाले. इंटरनेट आणि स्मार्टफोन या दोन मुख्य गरजा पूर्ण झाल्यानंतर, सोशल मीडिया वापरण्याच्या प्रमाणात वाढ व्हायला सुरुवात झाली. जिओच्या आगमनामुळे तर यामध्ये अजूनच भर पडली. सुरुवातीला फक्त फेसबुक वर फोटो अपलोड करणे, ओळखीचे अनोळखीचे मित्र जोडणे, त्यांच्याशी चॅटिंग करणे, एवढ्या पुरते फेसबुकला मर्यादित ठेवण्यात आले. मात्र कालांतराने यामध्ये विविध बदल झाले.

''प्रसार माध्यमे, जगाला जोडणारी,
ताजा विचार देणारी, दिशा दाखवणारी,
प्रत्येक हृदयाशी संवाद साधणारी,
प्रसारमाध्यमे नवी आशा जिवंत करणारी.''

कवी, लेखक, फोटोग्राफर, कलाकार मंडळींनी सोशल मीडियाचा व्यक्त होण्यासाठी खुबीने वापर केला. एक प्रकारे सोशल मीडियातून तरुणाईच्या अभिव्यक्तीचा विस्फोट घडून आला. आपल्या पोस्टला सर्वाधिक लाईक कसे मिळतील. यासाठी स्पर्धा सुरू झाली. अनेकांनी फेसबुक सारख्या माध्यमातून नवनवीन मित्र जोडले. विचारांची देवाणघेवाण सुरू झाली. एकमेकांतील अंतर कमी झाले. व्यक्त होण्यासाठी कोणतेही बंधन नसल्यामुळे तरुणाईच्या आत दडलेल्या भावना, विचार यांना वाट मोकळी झाली.

''तंत्रज्ञानाची गती वाढवते,
तथ्यांची ताकत समजावते,
समाजात सत्याचा दीप लावते,
नव्या युगाला साथ देते..''

सेक्स, प्रेम यासारख्या विषयावर आजही या समाजात बिनधास्तपणे बोलता येत नाही. मात्र सोशल मीडियामुळे समाजात दबल्या गेलेल्या यासारख्या विषयांवर तरुणाई व्यक्त होऊ लागली आहे.

''नव्या बातम्या घेऊन येते,
खऱ्या गोष्टी जगास दाखवते,
ज्ञानाचा प्रकाश पसरवते,
अंधाराला दूर करते..''

हा फार महत्त्वाचा बदल घडून आला. ज्यांना लेखनातून व्यक्त व्हायचे होते, त्यांनी फेसबुकचा आधार घेतला, तर ज्यांना बोलून व्यक्त व्हायचे होते, त्यांनी युट्युब सारख्या माध्यमाचा वापर केला. काहींनी स्वतःचे यूट्यूब चैनल काढले.

''प्रसारमाध्यमे जगाला जोडणारी आहे,
प्रत्येक आवाजाचा दरवाजा आहे,
प्रसारमाध्यमे जगाला जोडणारी,
ताजा विचार देणारी, दिशा दाखवणारी...''

सोशल मीडियाच्या वापरात तरुणाई इतर वयोगटापेक्षा अग्रेसर आहे. वर्ष २००४ मध्ये स्थापन झालेलं फेसबुक त्याच वर्षीपासून लोकप्रिय व्हायला सुरुवात झाली. तसेच वर्ष २०१४ च्या भारतातल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारात महत्त्वाचा भाग म्हणून फेसबुकला महत्त्व आलं होतं. भारतात तरुणांची टक्केवारी जास्त

आहे, त्यामुळे तरुण ज्या अजेंडाचा वापर करतात, तोच अजेंडा वापरत. ही निवडणूक यशस्वी झाली. आजची भारतीय तरुणाई फेसबुक विषयी काय सांगते ते पाहणं म्हणूनच रंजक ठरणार आहे.

''लोकशाहीचा आधार आहे, प्रत्येक आवाजाचा दरवाजा आहे,
स्वातंत्र्याचे बळ वाढवते, समाजाला नवे स्वप्न देते...''

तरुणांनी सोशल मीडियाकडे आव्हान म्हणून पाहिलं. त्यांनी ते स्वीकारलं आणि आता त्यातून अनेक तरुण मंडळी रोजगार मिळवताना दिसत आहे. बदलत्या काळानुसार तरुण बदलले आणि रोजगार उभा केला. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्रामच्या माध्यमातून रोजगारच नाही तर प्रसिद्धी सुद्धा मिळवली. आपल्यात असलेले गुण, आपल्याला येत असलेली कला, शर्ट घडी करण्यापासून तर स्वयंपाक करण्यापर्यंतच्या गोष्टी आपण सोशल मीडियाच्या माध्यमातून शिकत आहोत.

अगदी लहानशा गोष्टीही आपल्याला प्रचंड मोठ करू शकतात. याचं उत्तम उदाहरण म्हणजे सोशल मीडिया. आपली मराठमोळी प्राजक्ता कोळी, भुवन भाम, मधुरा रेसिपी यांच्यासह अनेक लोक आहेत, जे आपलं कौशल्य सादर करून लोकांच मनोरंजन करतात आणि रोजगार मिळवतात. आपल्या रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या गोष्टी किती विनोदी असतात, मात्र आपण त्या गोष्टी विनोदी वृत्तीने घेत नाही. अनेक साध्या गोष्टींवर व्हिडिओ करून युट्युब वर प्राजक्ता कोळी पोस्ट करत असते. त्यातून ती किमान चार ते पाच लाख रुपये महिन्याला कमावते, असं तिनेच इन्स्टाग्राम लाईव्ह मध्ये सांगितलं आहे. कमी वयात सोशल मीडियाच्या आहारी न जाता तिने सोशल मीडियाकडे एक संधी म्हणून पाहिलं त्याचा हा परिणाम.

अगदी लहानपणापासून तर वयाची सत्तरी ओलांडलेल्या व्यक्तीपर्यंत सगळेच सोशल मीडियावर प्रचंड प्रमाणात सक्रिय असतात. नाते, मैत्री इथपर्यंत मर्यादित असलेला सोशल मीडिया आता राहणीमान बदलण्यापासून तर अजेंडा बदलण्यापर्यंत पोहोचलेला आहे. सध्याच्या धकाधकीच्या आयुष्यात आणि स्पर्धेत टिकण्यासाठी माणसाने अपडेट राहणे गरजेचे आहे. मात्र त्याच्या आहारी जाणं तेवढंच धोक्याचं आहे.

आपल्यावर सोशल मीडियाचा प्रभाव प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात. आपण कोणत्या बाजूकडे लक्ष केंद्रित करतो, त्यावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. सध्याची तरुणाई सोशल मीडियासाठी जगताना दिसते आहे. याच माध्यमातून होणाऱ्या गैरसमजांचे देखील प्रमाण आहे.

''तंत्रज्ञानाची साथ पण नवकल्पनांचे बळ, तरुण मन बांधते जगाचे नवे बळ,
समाज संस्कृती भविष्याचे स्वप्न, हीच तरुणही आहे जगाचा स्तंभ..''

दारूसाठी पैसे न दिल्याने तरुणाने केला आई-वडिलांचा खून केला, ही नुकतीच संभाजीनगरला घडलेली घटना ऐकुण मन विषण्ण झाले. भारत मातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपले रक्त सांडणारा तरुण आज कोठे वाहत चालला आहे, याची खंत वाटते. प्रखर राष्ट्रनिष्ठा, जाज्वल्य, देशप्रेम यातूनच शेकडो क्रांतिकारक फासावर चढले. सुभाष बाबूंच्या नेतृत्वाखाली हजारो क्रांतिकारकांनी देशासाठी प्राण वेचले. आणखी किती जणांनी आत्म बलिदान केले, याची गणतीच नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाले, परंतु आजपर्यंत भारताने एक महासत्ता म्हणून जगापुढे यायला हवे होते, कारण आपल्याकडे विरांच्या रक्ताने न्हाऊन निघालेली भूमी थरारक प्रकट करणारा आदर्श इतिहास आहे, परंतु आजही चित्र न दिसता, दिसते आहे ते युवा पिढीचे वैफल्य युक्त जीवन.

भारताचे भवितव्य या कोवळ्यांच्या हातात आहे. आपण हे हात मजबूत करायला हवेत. आज गरज आहे ती युवकांपुढे चांगले आदर्श निर्माण करण्याची, शिक्षण व्यवस्थेत बदल करून ती अधिक रोजगार प्रधान बनविण्याची. शिक्षणाबरोबरच पारंपरिक जीवनमूल्य युवा वर्गात रुजविणे महत्त्वाचे आहे. वडीलधाऱ्यांचा आदर, सामाजिक जाणीव व समाजाचे आपल्यावर असलेले ऋण, याची जाणीव त्यांना करून द्यावयास हवी.

अशा प्रसंगी राज्यकर्त्यांचे धोरण व प्रसार माध्यमांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. युवकांच्या या बंद मुठीमध्ये संपूर्ण जग जिंकण्याची शक्ती आहे. या शक्तीचा सक्षमपणे वापर करावा. यासाठी समाजाने प्रयत्न केले पाहिजेत. आजच्या युवा पिढीकरिता आज आमच्यासाठी शाळा महाविद्यालय म्हणजे मौज करण्याची साधने ठरत आहेत. शाळेत नाव टाकायची तेही डोनेशन भरून नंतर वर्षभर टाइमपास.

कॉलेज हे प्रेम करण्याचे माहेरघरच झाले की? बलात्कार व आत्महत्या करण्याचे स्थान? या सर्व बाबतीत

कॉलेजच्या तरुणाच्या जीवनाबद्दल कोणती दिशा आहे हा चिंतेचा प्रश्न. आज रस्त्यावर मुले मुलींची छेड काढताना बिनधास्तपणे 'आती क्या खंडाला', 'यायला रे लडकी बडी मस्त मस्त' अशी गाणी म्हणताना कशाचाही विचार करत नाही. त्यासाठी मार खाल्ला तरी परत,'प्यार किया तो डरना क्या' हे वाक्य तयारच. आजची युवा पिढी सिगारेट, जुगार, लुटमार, दंगली यासारख्या विघातक कार्यात अडकत आहे. नवी पिढी पाश्चात्यांचे अनुकरण करत आहे. त्यामुळे आत्मावलोकनाची गरज निर्माण झाली आहे. मातीतच दोष निर्माण झाल्याने निघणारी पिके ही रोगट बनण्याचे कारण म्हणजे ५० वर्षातील सामाजिक चुका आहेत.

आपल्या सदोष शिक्षणव्यवस्थेमुळे आज सहा कोटींच्या बेकारांची फौज उभी आहे, लोकसंख्या नियंत्रणात नाही. देशात स्वार्थाने त्यांनी या युवकांचा जाती-धर्मावर आधारित भेदभाव निर्माण करण्यासाठी वापर करून घेतला आहे. आज आपल्यापुढे आदर्श उभी आहेत ते छोटा राजन, हर्षद मेहता आणि तेलगी यांचे. खरे तर युवा पिढी ही आपली समस्या नसून शक्ती आहे. युवकांच्या बाहूत अफाट बळ आहे फक्त या शक्तीचा वापर सृजनशील कार्यासाठी व्हावा.

''तंत्रज्ञानाचे झपाटले जग,
फोन हातात माहितीचा हलकग,
इन्स्टा, ट्विटर, युट्युबचा खेळ,
तरुणाई सज्ज घेते नवा वळणवेळ,
तरुणाईची चाल डिजिटल ची धमाल,
प्रसारमाध्यमे आमची नवी ताल,
सोबत मीडियाचं शिकवतो नवा रस्ता,
प्रेरणा देते नव्या स्वप्नांचा दरवळता.''

# समाज माध्यमे आणि युवकांचे अधिकार

संस्कृती सचिन शिर्के,
११वी विज्ञान

आजच्या युगात सोशल मीडिया लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या जीवनाचा भाग झाला आहे. जगाच्या पाठीवर कुठेही दूर असणारी व्यक्ती सोशल मीडियामुळे जवळ आली, परंतु सोशल मीडियामुळे आपल्या जवळची व्यक्ती दूर जात नाही ना? याचा मात्र नक्की विचार करावा कारण बहुदा असे बघितले जाते की, आम्ही सोशल मीडियामध्ये इतके गुंग झालेलं असतो, की जवळची व्यक्ती आम्हाला काय सांगत आहे, याकडे आमचं लक्ष नसतं. व्हाट्सअप संदेशावरून पती-पत्नीचे भांडण, घटस्फोट यांचे प्रमाण देखील वाढले आहे. एका सर्वेक्षणानुसार सोशल मीडियावर दारू पिणाऱ्या व्यक्तीच्या फोटोमुळे तरुणांना व्यसन लागले आहे. तरुणाई नैराश्याच्या गर्तेत बुडाली आहे.

सोशल मीडिया युवकांना मत मांडण्याचे अधिकार देते, स्वातंत्र्य देते, ही गोष्ट जरी खरी असली तरी, याच सोशल मीडियामुळे वर्णद्वेष, धर्म द्वेष, जातिवाद, प्रांतवाद पसरवला जात आहे. अंधश्रद्धा, अश्लीलता पसरवली जात आहे. रेव पार्टीचे आमंत्रण येथून दिली जातात. फेक अकाउंट उघडून तरुण-तरुणींची फसवणूक केली जाते. नकळत त्या वयामध्ये सेक्सच्युअल मटेरियलचा मारा याच सोशल मीडियामुळे घातला जातो. सोशल मीडियामुळे युवकांचे, समाजाचे, देशाचे जर नुकसान होत असेल, तर नक्कीच हे घातक ठरू शकते. महापुरुषांच्या विरोधात, धर्माच्या विरोधात पोस्ट करून लोकांच्या अस्मिता, धार्मिक भावना दुखवल्या जाणार नाहीत याची निश्चितच काळजी घ्यायला हवी.

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात, तसेच सोशल मीडियाचे व्यक्तिगत आयुष्यावर, समाजमनावर चांगले आणि वाईट परिणाम होतात. एखाद्या व्यक्तीचा अपघात झाल्यावर त्या व्यक्तीला सोशल मीडियावर संदेश टाकल्यानंतर तात्काळ मदत होत असेल, त्या व्यक्तीचे प्राण वाचत असतील तर निश्चितच हा सोशल मीडियाचा चांगला वापर आहे. कारण सोशल मीडियाचा उपयोग व्यक्तीचा जीव वाचविण्यासाठी व्हावा ना की जीव घेण्यासाठी.

नोकरी, रोजगार, व्यवसाय या संदर्भातील सूचना प्राप्त होणे, अभ्यासाचे समूह तयार करून शैक्षणिक विकास करणे, हा देखील सोशल मीडियाचा चांगला वापर आहे. खरे तर माध्यमे वाईट नसतात, तर आपण त्याचा वापर कसा करतो यावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम अवलंबून असतात. आपल्याकडे तंत्रज्ञान आले, त्याचा निश्चित शोधक बुद्धीनेच वापर केला पाहिजे.

तुकाराम महाराज म्हणतात,

''सोनियाचा कळस, माजी भरिला सुरारस,
मृतिकेचा घट, माजी अमृताचा साठ..''

म्हणजे सोन्याच्या कळसात मद्य तर मातीच्या गड्यात अमृत यापैकी तुम्ही कशाची निवड कराल? हे आता आपण ठरवले पाहिजे. म्हणून नकारात्मकतेचा, वाईटाचा त्याग करून सकारात्मकतेचा आणि चांगल्याचा पुरस्कार केल्यास युवकांची सोशल मीडियावर मुक्त संचार करण्यास हरकत नाही.

# आजची तरुण पिढी समाजमाध्यमे वापरताना..

कु.रवींद्र सोमनाथ गडकरी,
प्रथम वर्ष, कला

प्रसारमाध्यमे हा तरुणाईचा दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तरुणाई प्रसारमाध्यमांवर किंवा सोशल मीडियावर सक्रिय असते. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हाट्सअप, युट्युब अशा माध्यमांचा वापर करण्यात आजची तरुण पिढी अग्रेसर आहे. २००४ साली स्थापन झालेल्या फेसबुकने भारतात २०१४ सालच्या दरम्यान लोकप्रिय व्हायला सुरुवात केली. त्याला परिस्थिती देखील तशीच पोषक ठरली. प्रसार माध्यमे वापरण्यासाठी लागणारे इंटरनेट स्वस्त दरात उपलब्ध झाले. इंटरनेट आणि स्मार्टफोन या दोन मुख्य गरजा पूर्ण झाल्यानंतर प्रसारमाध्यमे वापरण्याच्या प्रमाणात वाढ व्हायला सुरुवात झाली. अलीकडे आलेल्या जिओच्या आगमनामुळे तर यामध्ये अजूनच भर पडली. सुरुवातीला फक्त फेसबुक वर फोटो अपलोड करणे, ओळखीचे किंवा अनोळखीचे मित्र जोडणे, त्यांच्याशी चॅटिंग करणे एवढ्या पुरते फेसबुकला मर्यादित ठेवण्यात आले मात्र कालांतराने यामध्ये विविध बदल झालेले दिसतात.

युजरच्या आवडीप्रमाणे फेसबुकने देखील विचार बदलायला सुरुवात केली. तरुण पिढीला अभिव्यक्त होण्यासाठी सोशल मीडिया जवळचा वाटू लागला. मातृभाषेतून तरुणाई व्यक्त होऊ लागली, स्वतःची सामाजिक आणि राजकीय घडामोडीत आवड असणारी तरुणाई यामध्ये नेहमीच अग्रेसर राहिली. या प्रसारमाध्यमांमुळे तरुणाईला व्यक्त होण्यासाठी चांगले आणि खुले व्यासपीठ उपलब्ध झाले.

कवी, लेखक, फोटोग्राफर, कलाकार मंडळींनी प्रसारमाध्यमांवर व्यक्त होण्यासाठी खुबीने वापर केला. एक प्रकारे प्रसारमाध्यमांतून तरुणाईचा अभिव्यक्तीचा विस्फोट घडून आला. आपल्या पोस्टला सर्वाधिक लाईक कसे मिळतील. यासाठी स्पर्धा सुरू झाली. अनेकांनी फेसबुक सारख्या माध्यमातून नवनवीन मित्र जोडले.विचारांची देवाणघेवाण सुरू झाली. एकमेकांतील अंतर कालांतराने कमी झाले. व्यक्त होण्यासाठी कोणतही बंधन नसल्यामुळे तरुणाईच्या आत दडलेल्या भावना, विचार यांना वाट मोकळी झाली. सेक्स, प्रेम यासारख्या विषयांवर आजही या समाजात बिनधास्तपणे बोलता येत नाही, मात्र सोशल मीडियामुळे समाजात दबल्या गेलेल्या यासारख्या विषयांवर तरुणाई व्यक्त होऊ लागली आहे. हा फार महत्त्वाचा बदल घडवून आला. ज्यांना लेखनातून व्यक्त व्हायचे होते, त्यांनी फेसबुकचा आधार घेतला, तर ज्यांना बोलून व्यक्त व्हायचे होते त्यांनी युट्युब सारख्या माध्यमातून वापर केला. काहींनी स्वतःचे यूट्यूब चैनल सुरू केले.

ध्रुव राठी या २१ वर्षीय तरुणाने स्वतःचे यूट्यूब चैनल सुरू केली, आणि त्या चैनलच्या माध्यमातून तो चालू घडामोडींवर विश्लेषणात्मक व्हिडिओ तयार करू लागला, त्याच्या या व्हिडिओला अल्पावधीतच चांगला प्रतिसाद लाभला. त्याचे सध्या २.५ मिलियन इतके सबस्क्रायबर आहेत. मैथिली ठाकूर ही तरुणी गायिका प्रसारमाध्यमांमुळे प्रसिद्धीस आली. सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्या गाण्याचे व्हिडिओ व्हायरल झाले, आणि तिच्या प्रतिभेला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला व मिळतो आहे. सोशल मीडियामुळे तरुणाईच्या अभिव्यक्तीला चालना मिळाली आणि यामुळे तरुणाईमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मोठी मदत झाली. व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व्यक्त होणं खूप गरजेचं असतं.

प्रसार माध्यमाद्वारे व्यक्त होण्याची संधी दिल्यामुळे अनेकांचा व्यक्तिमत्व विकास घडवून आला. या प्रसारमाध्यमांनी तरुणाईला स्वतःची ओळख निर्माण करण्यास मोलाची मदत केली. पूर्वी एखादी व्यक्ती पड्याआड झळकली की सेलेब्रिटी होऊन जायची. मात्र आता या प्रसारमाध्यमांद्वारे अनेकांना सेलिब्रिटी बनवले. फेसबुक सेलिब्रिटी हा नवीन वर्ग उदयास आला. प्रसारमाध्यमांद्वारे अनेकांना जॉब मिळाला आहे. विविध क्षेत्रात करिअरच्या कोणत्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत. याची माहिती सोशल मीडियाद्वारे सहज उपलब्ध होत आहे. प्रसार माध्यम म्हणजे फक्त मनोरंजन, टाइमपास असं चित्र आता राहिलेलं नाही.

अण्णा हजारे यांचे आंदोलन असो की, निर्भया बलात्काराने देशभर उभे राहिलेले आंदोलन. ही आंदोलने उभी करण्यासाठी प्रसारमाध्यमांचा महत्त्वाचा वाटा होता. ट्विटर, फेसबुक वरून या आंदोलनासंबंधी पोस्ट पाहिल्या, लिहिल्या गेल्या. हॅशटॅक वापरण्यात आले, यामुळे या विषयाशी संबंधित लोक जोडले गेले, आणि आंदोलन व्यापक होण्यास मदत झाली. हे सगळं घडवून आणण्यात तरुण पिढीचा महत्त्वाचा वाटा होता. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत करण्यामध्ये तरुण पिढीने पुढाकार घेतला. व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर या माध्यमांचा प्रभावीपणे वापर करून पूरग्रस्तांना मदत करण्यात आली. पूरग्रस्तांना मदत करणाऱ्या तरुणांमध्ये समन्वय ठेवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर झाला. ट्विटर वरून मुख्यमंत्री कार्यालयाला टॅग करून पुराच्या पाण्यात लोक कोणत्या ठिकाणी अडकली आहेत, याची माहिती देण्यात आली. तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यास तरुणाई नेहमीच पुढे राहिले आहे.

प्रसारमाध्यमांना काहीजण आभासी, काल्पनिक जग असं संबोधतात. पण मला तसं वाटत नाही. सोशल मीडिया हा एक प्रकारे समाजाचे प्रतिबिंब दाखवतो. समाजातील बऱ्या-वाईट प्रवृत्तींचे दर्शन घडवतो. समाजात जसे वादविवाद होतात, तसे वादविवाद सोशल मीडियावर किंवा प्रसारमाध्यमांवर देखील घडतात. काही वेळा हे वाद पोलीस स्टेशन पर्यंत देखील जातात. माझ्या एका मित्राने आदिवासी समाज सेक्स याविषयी कसा उदारमतवादी आहे याविषयी एका पोस्ट खाली कमेंट केली. त्याच्या या कमेंट मुळे काही आदिवासी बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या आणि त्या माझ्या मित्रावर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला. अशा घटना ज्यावेळेस घडतात त्यावेळी बाळासाहेबांच्या निधनानंतर घडलेली घटना आवर्जून आठवते. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर मुंबई बंदची हाक देण्यात आली होती. त्या मुंबई बंद विरोधात एका तरुणीने फेसबुक पोस्टद्वारे आक्षेप नोंदविला होता. त्यावेळेस देखील तिला आणि ती पोस्ट लाईक करणाऱ्या मैत्रिणीला ॲक्ट ६६ नुसार अटक करण्यात आली होती.

या कलमानुसार प्रसारमाध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट आढळल्यास संबंधित व्यक्तीला तात्काळ अटक करता येत होती. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या या कलमा विरोधात दिल्लीतील लॉ ची विद्यार्थिनी श्रेया सिंगल ने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २४ मार्च २०१५ रोजी आपली व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करणारे हे जाचक कलम रद्द केले. या प्रकरणावरून आजच्या तरुणांनी जबाबदारीने सोशल मीडियाचा वापर करायला हवा, अशी अपेक्षा आपण समाज म्हणून व्यक्त करतो.

जातीय संघर्ष जसा समाजात दिसून येतो, तसा तो सोशल मीडियावर देखील दिसून येतो. समाजात जसा तरुणींचा लैंगिक छळ केला जातो. तसाच तो सोशल मीडियावर देखील केला जातो. अश्लील मेसेजेस सेंड करून तरुणींना त्रास दिला जातो. विनाकारण मेसेजेस पाठविले जातात. अनोळखी व्यक्ती आय लव यू बोलून जाते. एक प्रकारे तरुणींचा ऑनलाइन लैंगिक छळ केला जातो. या छळाचा सामना करत काही तरुणी सोशल मीडियावर बिनधास्तपणे व्यक्त होतात, तर काही स्वतःवरच बंधन लादून घेतात.

अभिनेत्री केतकी चितळे हिने तिच्या चाहत्यांशी लाईव्ह संवाद साधताना मराठी भाषेविषयी मत व्यक्त केले. तिचे मत व्हिडिओद्वारे सोशल मीडियावर व्हायरल झाले, ते मत काहींना पटले नसल्यामुळे अत्यंत अश्लील भाषेत अभिनेत्री केतकी चितळेला ट्रोल करण्यात आले. नंतर तिने एका व्हिडिओद्वारे या ट्रॉलर्सचा समाचार घेतला. अशा प्रकारे अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन तरुणींना ट्रोल केले जाते. तरुणाईचा विकृत चेहराच अशा प्रसंगी समोर येतो. या सोशल मीडियामुळे तरुणाई प्रतिक्रियावादी झाल्याचे दिसून येते. काही अपवाद सोडले तर बरेच जण एखाद्या घटनेवर विचारपूर्वक व्यक्त होताना दिसत नाहीत. उथळ पाणी व्यक्त होणाऱ्या तरुणांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे जाणवते. आपण सोशल मीडियावर व्यक्त होताना दिसत नाही केलेली कृती मांडलेली मते अनेक जण पाहत असतात, त्यामुळे सोशल मीडियाबर व्यक्त होताना तरुणाईने जबाबदारी व्यक्त होणे गरजेचे आहे.

प्रसार माध्यमांच्या गैरवापरामुळे अनेक दुर्दैवी घटना घडल्या आहेत. इयत्ता बारावीत शिकणाऱ्या मुलीचा तिच्या मित्रासोबत बोलतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, तर त्या मुलीने आपली बदनामी होईल म्हणून विहिरीत उडी मारून आत्महत्या केली. प्रियसीचे दुसऱ्यासोबत लग्न ठरल्यामुळे एका तरुणाने चक्क मंदिरातूनच आत्महत्या करत असल्याचे लाईव्ह केले. प्रसारमाध्यमांच्या अतिवापरामुळे अनेकांना निराशाला

सामोरे जावे लागते. लेखनाच्या माध्यमातून, मेसेजेस द्वारे सोशल मीडियाद्वारे मोठ्या प्रमाणात संवाद साधला जातो, पण प्रत्येक वेळी असा संवाद यशस्वी ठरतोच असं नाही. मेसेज रुपी संवादामुळे गैरसमज होण्याची शक्यता असते. त्यामुळे मैत्री जोडणारा हा सोशल मीडिया मैत्री तोडण्यास देखील कारणीभूत ठरला आहे. एखाद्या व्यक्तीशिवाय त्याबद्दल चुकीची माहिती पसरविण्यातच तसेच व्यक्तीला बदनाम करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर केला जातो. या चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवून अनेक जण स्वतःच मत तयार करतात. उदाहरणार्थ देशाची फाळणी होण्यासाठी महात्मा गांधीजी कसे जबाबदार आहेत, हे सांगणारे मेसेजेस सोशल मीडियातून पसरविले जातात, असा खोटा इतिहास वाचून अनेक तरुण आपले मत तयार करतात. अशावेळी खरा इतिहास समजून घेणे आणि तो सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांपर्यंत पोहोचवणे ही आजच्या तरुणांची जबाबदारी आहे.

आज देशात कोणतीही महत्त्वाची घटना घडल्यास त्याचे पडसाद पहिल्यांदा सोशल मीडियावर उमटताना दिसतात. त्या घटनेविषयी चर्चा करण्यास तरुणाई आघाडीवर राहिलेली आहे. अशा चर्चा करण्यासाठी तरुणाईने वाचन, चिंतन इत्यादी माध्यमातून अधिकाधिक परिपक्व होणे गरजेचे आहे. सोशल मीडियावर तरुण पिढी बरोबरच जुनी पिढी देखील सक्रिय आहे. तरुण पिढीच्या तुलनेने जुन्या पिढीच सोशल मीडियावर व्यक्त होण्याचे प्रमाण कमी आहे. ही जुनी पिढी व्यक्त होत नसली तरी, तरुण पिढी सोशल मीडियावर काय काय करते याच्यावर बारीक लक्ष ठेवून असते. एक प्रकारे ही मंडळी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचं काम करते. प्रसार माध्यमांवर टाकलेली पोस्ट व्हायरल व्हायला जास्त वेळ लागत नाही. अगदी वाऱ्यासारख्या पोस्ट व्हायरल होत असतात. अशा या व्हायरल जगात तरुणांनी आक्रमकतेला थारा न देता संयम ठेवून विवेकी वृत्तीने व्यक्त होणे गरजेचे आहे. वाचनाची अत्यंत कमी आवड, टीव्हीचा वाढता प्रभाव या कारणांमुळे दहा-बारा वर्षांपूर्वी तरुणाई बद्दल फारच काळजीचे वातावरण होते. पण हे सगळे इंटरनेट आल्यानंतर स्वस्त होत गेल्यावर बदलत गेले.

इंटरनेटच्या पाठीवरुन आलेल्या सोशल मीडिया साईट्स व त्यांनी दिलेली व्यक्त होण्याची संधी यातून सोशल नेटवर्किंग वाढत गेले. जगाच्या कानाकोपऱ्यातील मंडळी एकमेकांशी संवाद साधू लागली. वेगवेगळ्या आवडी, छंद आणि इतर औत्सुकतेच्या विषयानुरूप  नेटवर्किंग वाढत जात आहे.जिथे गर्दीत सतत वाढ आहे, सर्वसामान्य समाजातील सर्व स्तरातील लोकांचा सहभाग आहे, अशा जत्रेपासून कुंभ मेळ्या पर्यंत कोणत्याही गोष्टी बरोबर कॉमर्स (व्यापार, बाजार) लगेच चिकटते. या न्यायाने या सर्व सोशल नेटवर्किंग साईट्सच्या लोकप्रियतेचा फायदा घेणारी उत्पादने तयार केली व संवादातील सहजता वाढविणाऱ्या तंत्रज्ञानाला, ते बाजारात आणणाऱ्या संशोधकांना महत्त्व आणि पैसा मिळत गेला.

# प्रसारमाध्यमे : दू:धारी तलवार

कु.पुष्पलता विजय धुमाळ,
कनिष्ठ लिपिक

तरुण पिढी आणि प्रसारमाध्यमे यांच्यातील संबंध खूप महत्त्वाचे आहेत. आजकालच्या तरुण पिढीवर प्रसार माध्यमांचा एवढा प्रभाव पडला आहे की, त्याचा वापर केला नाही तर ते अस्वस्थ होतात. दिवसातील कितीतरी तास प्रसारमाध्यमांवर व्यस्त असतात. यात प्रसार माध्यमे म्हणजे वर्तमानपत्रे,रेडिओ,दूरदर्शन, मोबाईल, इंटरनेट इत्यादी. त्यांचे कार्य माहितीचा प्रसार करणे हे आहे. मानवी जीवनामध्ये प्रसारमाध्यमाचे अनन्य साधारण महत्व आहे. माहितीचा खजिना म्हणजे हे प्रसारमाध्यमे आहेत. जगातील कोणत्याही घटकाचे ज्ञान आपल्याला यातून प्राप्त होते, ते घेण्याची लालसा प्रत्येकामध्ये असते, परंतु आजच्या तरुण पिढीला मात्र हातातलं बाहुलं बनलेल्या मोबाईलचे वेडच लागलेले पहावयास मिळते.

''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती...'' या उक्तीप्रमाणे मोबाईल हातातच असला पाहिजे, बाकी कुणाची आवश्यकता भासत नाही. पहिले टेलिफोन होता तेव्हा घरातील सर्वच सदस्य फोन जवळ जाऊन बोलत होते. आता मात्र सर्वांच्या पासून दूर जाऊन मोबाईलवर बोलतात. म्हणजे आपण काय बोलतो, हे दुसऱ्याला कळायला नको. त्यातूनच एक अस्वस्थता निर्माण होते, पण करणार काय? तरुण पिढी बरोबरच सर्व वयातील लोकांना याची सवय लागली आहे.

प्रगत तंत्रज्ञानानुसार ज्याची आवश्यकता आहे त्याचा वापर झालाच पाहिजे. ती काळाची गरज आहे. अनेक प्रसारमाध्यमे आहेत की, ज्यांचा वापर तरुण पिढीने करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ वर्तमानपत्र वाचणे, दूरदर्शनवरील बातम्या पाहणे, मनोरंजना बरोबरच जीवनाचे सूत्र समजावून सांगणारे कार्यक्रम, आरोग्य विषयक माहिती, पर्यावरण विषयी जागरूकता, जीवन घडविणारी माहिती मिळवून ती इतरांना सांगणे, ही तरुणांची जबाबदारी आहे. तसे न होता काही नकारात्मक परिणाम मनावर होतात तसेच शरीरावर होतात, हे येणाऱ्या काळात धोक्याची घंटा आहे. आता सावध झाले तर भविष्यात उद्भवणाऱ्या संकटांवर मात करता येईल.

सकारात्मक विचार सर्वांचा असतो, पण तो नकारात्मकतेकडे केव्हा घेऊन जातो हे कळत नाही. मग या पिढीतल्या तरुणांना नैराश्याला सामोरे जावे लागते. वही, पुस्तक, वर्तमानपत्रे हातातून गळून पडली व त्याची जागा मोबाईलने घेतली. पूर्वी आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी प्रत्यक्ष जाऊन भेट घेण्यात यायची, आता मात्र एका हॅलोने सर्व खुशाली कळते. पण भेट मात्र वर्षानुवर्ष अधुरीच राहते.

प्रसारमाध्यमांच्या वापरात तरुणाई इतर वयोगटापेक्षा अग्रेसर आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, शेअर चाट अशी अनेक दालने उपलब्ध झाल्यामुळे, पुस्तके मात्र बंदिस्त कपाटातच धूळ खात पडून आहेत. ग्रामीण भागातील जनजीवन बदलले आहे. अनेक तरुणांच्या कलांना वाव मिळाला, त्यातून ते जगासमोर आले. पैसा मिळवू लागले . देवाण-घेवाण होऊ लागली, अपरिचित माणसे परिचित झाली. उद्योग व्यवसायात भरभराट झाली. जाहिरात मोठ्या प्रमाणात करून जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळवता आली.

आपल्यावर सोशल मीडियाचा प्रभाव झाला आहे हे नक्कीच. नाण्याच्या दोन बाजू असतात, आपण कोणत्या बाजूकडे लक्ष केंद्रित करतो, त्यावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. प्रसार माध्यमांचा आजच्या तरुणांवर नकारात्मक आणि सकारात्मक दोन्ही प्रकारे परिणाम होतो. याचा अतिरेक करणे मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे ठरु शकते. तसेच यामुळे तरुणांना कुटुंब आणि मित्रांशी जोडलेले राहण्यास मदत होते. प्रसारमाध्यमामुळे नाण्याच्या दोन्ही बाजूंसारखे प्रगती आणि अधोगती झालेली दिसते.

# आजच्या तरुण पिढीवर होणारा समाजमाध्यमांचा प्रभाव

कु.भाग्यश्री त्रिंबक पथवे,
११ वी विज्ञान ब

आजची तरुण पिढी असुरक्षित आणि अप्रत्यक्ष वातावरणात वाढत आहे. एकीकडे संधीची कमतरता नाही, ज्याचा योग्य वेळी फायदा घेतला तर लोकांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडू शकते. दुसरीकडे प्रचंड धोके आणि आव्हाने आहेत. ज्यांना योग्यरीत्या संबोधित न केल्यास तरूणांची क्षमता कमकुवत होऊ शकते.

''शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती,
देव देश धर्मा पायी प्राण घेतले हाती...''

असा हा देशभक्तीचा आणि राष्ट्र शक्तीचा वारसा सांगणाऱ्या या देशाची युवा पिढी जेव्हा 'झिंग झिंग झिंगाट' आणि सैराट होते, म्हणजेच मैदानी खेळांपेक्षा, ग्रंथालयातील पुस्तकांपेक्षा, कुटुंबातील संस्कारांपेक्षा, तसेच व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीपेक्षा, सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत चॅटिंग, मेसेजेस, व्हिडिओ कॉलिंग, सेल्फी असा मोबाईल आणि सोशल मीडियाच्या मोहजालातच युवा पिढीची ऊर्जा संपूर्ण जाते. छत्रपती शिवाजी, संभाजी, तानाजी, धनाजी असा वीरांचा इतिहास सांगणारे आमचे युवक जेव्हा तीन जीबी, चार जीबी, पाच जीबी असे म्हणत म्हणत गेम मध्ये स्वतःचा जीव गमावून बसतात.

जेव्हा डोळे असून आंधळ्यासारखे वागणाऱ्या, तोंड असून मुक्यासारख्या जगणाऱ्या, आजच्या युवा पिढीला सोशल मीडियाच्या वापरामुळे आपल्याच घराचे थिएटर आणि आपल्याच आयुष्याचा सिनेमा होऊन बसलाय. याचे भानच राहिले नाही. सध्या दिवसभर सुरू असणाऱ्या ऑनलाईन व्हिडिओ गेम, नाचगाणी, निखळ मनोरंजनापेक्षा आणि संस्कार व संस्कृतीचा देखावा करण्यापेक्षा, अंग प्रदर्शन घडवणारी विकृत मनोवृत्ती फेसबुक, ट्विटरच्या माध्यमातून केली जाणारी महिला व मुलींची बदनामी त्यांच्या चरित्रावर उडवले जाणारे शिंतोडे, समाजातील संवेदनशील विषयावर उठवल्या जाणाऱ्या अफवा, दंगली, राजकारणातील भडक अतिशयोक्ती आणि अतिरंजित भाषणे, त्यातून समाजाची व युवकांची केली जाणारी दिशाभूल, लोकांना लाखो करोडो रुपयांचे बक्षीस लागलं, असे सांगणारे खोटे व फसवे मेसेजेस आणि त्यातच समाजाला गंडा घालणारे हॅकर्स. एवढेच नव्हे तर, गावात असून सुद्धा गावाला आहे, मीटिंगमध्ये आहे, पुण्यात, मुंबईत आहे. अशा थापा मारणारे आपलेच लोक, आपलेच नातेवाईक. उठताना गुड मॉर्निंग, झोपताना गुड नाईट आणि दिवसभर फक्त मेसेज फॉरवर्डिंगला नाही, तर बिनकामाचं ते चॅटिंग. याशिवाय अति उत्साहात डोंगराच्या माथ्याला, दरीखोऱ्यांच्या टोकाला, धबधब्याच्या तोंडाला सेल्फी फोटो काढायला जाऊन कायमचे फोटोत जाणारे आजचे महाभाग. मानवाकडी करून मोबाईलवर बोलत बोलत गाडी चालवणारे आणि अपघाताला बळी पडून स्विच ऑफ होणारे युवक बघितले, तर मन सुन्न होतं आणि मेंदू बधिर होऊन जातो.

सोशल मीडियामुळे तरुणाईवर अत्यंत मोठा विपरीत परिणाम झाला आहे. दुसरे म्हणजे सोशल मीडियाचं व्यसन लागलेली घराघरातील लहान मुलांच्या वैयक्तिक जीवनात डोकावत आहे. सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्या मुलांच्या अभ्यासातील एकाग्रता कमी होत चालली आहे, त्यांच्या मेंदूची क्रियाशीलता कमी होत चालली आहे. लहान मुलांची, मोठ्या माणसांची सुद्धा दृष्टी अंधुक होत चालली आहे. युवा पिढीची विचार करण्याची शक्तीच नष्ट होत चालली आहे. मैदानावरील खेळ, वडाच्या झाडाखाली बसून मारल्या जाणाऱ्या गप्पा यासारख्या अनेक गोष्टींचा विसर पडत चालला आहे. परीक्षेपुरतेच पाठ्यपुस्तकाचे वाचन व पाठांतर करणारा आजचा विद्यार्थी हा ज्ञानहीन बनतो. केवळ परीक्षार्थी ऑनलाइन मोबाईलचा साथी बनत चाललेला आहे.

एकीकडे पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या अनेक लेखकांच्या साहित्याचा विसर पडत चालला आहे. दुसरीकडे मंत्रमुग्ध करणाऱ्या कवितांच्या मैफिली, विनोदी किस्से यांना सुद्धा समाज विसरत चालला आहे. ज्ञानेश्वरी, भगवत गीता, संत तुकोबांची गाथा, मनाचे श्लोक, श्यामची आई अशा दर्जेदार ग्रंथांची जागा सोशल मिडीयाने

घेतली आहे. मिडीयामुळे ग्रंथ संस्कृतीची जोपासना आणि वाचन संस्कृतीची उपासना कुठे चालली आहे. चर्चा, संवाद, भजन, कीर्तन, प्रवचन, व्याख्याने अशा कार्यक्रमांचा श्रोतावर्ग सुद्धा कमी होत चालला आहे. असे म्हणतात की, 'शुरू मे इन्सान आदते बनाता है, और बाद मे आदते इंसान को बनाती है.' नेमकी हीच गोष्ट सोशल मीडियाच्या बाबतीत अगदीच तंतोतंत खरी ठरली आहे. टाईमपास म्हणून सुरू केलेल्या कोणत्याही व्यसनाचा शेवट जसा कॅन्सरमध्ये होतो, तसा नेहमी ऑनलाईन राहणाऱ्या तरुणांच्या नसानसा सोशल मिडीयाच्या कॅन्सरने विणल्या आहेत.

स्वामी विवेकानंद म्हणतात की, ''कोणत्याही स्वातंत्र्याचा गैरवापर झाला तर त्या स्वातंत्र्याचे रूपांतर स्वैराचारात होते. स्वातंत्र्याला जर विवेकाची आणि विवेक बुद्धीची जोड नसेल तर शेवटी त्या राष्ट्राची नासधूस सुरू होते.'' खरं तर डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील महासत्ता भारत जर प्रत्यक्षात आणायचा असेल तर, स्वामी विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे नैतिकमूल्य, चारित्र्यसंपन्नता, पावित्र्य या संस्काराची त्यांना गरज आहे. या संस्काराने भारित असणारी युवक पिढी तयार करणे हाच सोशल मीडियापासून सोडवायचा मूलमंत्र आहे. पण सोशल मीडिया आजच्या तरुणाईचं प्रचंड नुकसान करत आहे आणि यापुढेही यामुळे प्रचंड नुकसान होऊ शकते. असे एकतर्फी विचार म्हणजे एका झाडाला स्वतःच मिठी मारणे आणि झाड मला काय सोडेना असा अकांड तांडव केल्यासारखे झाले.

माहिती, तंत्रज्ञान इंटरनेट ई-मेल सोशल मीडिया सारख्या तंत्रज्ञानाला विरोध करणे हे चुकीचे आहे. तसेच घरबसल्या प्रत्येकाला आपल्या प्रश्नांची उत्तरे आणि शंका सोडवण्यासाठी सोशल मीडियासारखे योग्य मार्गदर्शन कोणीही करू शकत नाही. आपल्या विवेक बुद्धीने वापर केला तर, सोशल मीडिया सारखे दुसरे ज्ञानाचे माहितीचे आणि संस्काराचे साहित्य असूच शकत नाही.

# समाजमाध्यमे तरुणाईच्या जीवनातील अविभाज्य भाग

कु.आदिती दत्तू वाळुंज,
इ. १२ वी- ब

सोशल मीडिया हा तरुणाईच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तरुणाई सोशल मीडियावर सक्रिय असते. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, युट्युब अशा माध्यमांचा वापर करण्यात आजची तरुण पिढी अग्रेसर आहे. २००४ मध्ये स्थापन झालेले फेसबुक भारतात २०१४ च्या दरम्यान लोकप्रिय व्हायला सुरुवात झाली. त्याला परिस्थिती देखील तसेच पोषक ठरली. सोशल मीडिया वापरण्यासाठी लागणारे इंटरनेट स्वस्त दरात उपलब्ध झाले. स्वस्त दरातील स्मार्टफोन बाजारात उपलब्ध झाले. इंटरनेट आणि स्मार्टफोन या दोन मुख्य गरजा पूर्ण झाल्यानंतर, सोशल मीडिया वापरण्याच्या प्रमाणात वाढ व्हायला सुरुवात झाली. जिओच्या आगमनामुळे तसं तर यामध्ये अजूनच भर पडली. सुरुवातीला फक्त फेसबुक वर फोटो अपलोड करणे, ओळखीचे आणि अनोळखीचे मित्र जोडणे, त्यांच्याशी चॅटिंग करणे, एवढ्या पुरते फेसबुकला मर्यादित ठेवण्यात आले. मात्र कालांतराने यामध्ये विविध बदल झाले. यूजरच्या आवडीप्रमाणे फेसबुकने देखील विचार बदलायला सुरुवात केली. तरुण पिढीला अभिव्यक्त होण्यासाठी सोशल मीडिया जवळचा वाटू लागला. मातृभाषेतून तरुणाई व्यक्त होऊ लागली. स्वतःची सामाजिक आणि राजकीय मते बिनधास्त मांडू लागली. सामाजिक आणि राजकीय घडामोडीत आवड असणारी तरुणाई यामध्ये नेहमीच अग्रेसर राहिली. या सोशल मीडियामुळे तरुणाईला व्यक्त होण्यासाठी चांगले आणि खुले व्यासपीठ उपलब्ध झाले. कवी, लेखक, फोटोग्राफर, कलाकार मंडळींनी सोशल मीडियाचा व्यक्त होण्यासाठी खुबीने वापर केला. एक प्रकारे सोशल मीडियातून तरुणाईच्या अभिव्यक्तीचा विस्फोट घडून आला. आपल्या पोस्टला सर्वाधिक लाईक कसे मिळतील यासाठी स्पर्धा सुरू झाली. अनेकांनी फेसबुक सारख्या माध्यमातून नवनवीन मित्र जोडले. विचारांची देवाण-घेवाण सुरू झाली. एकमेकांतील अंतर कमी झाले. व्यक्त होण्यासाठी कोणतंही बंधन नसल्यामुळे तरुणाईच्या आत दडलेल्या भावना, विचार यांना वाट मोकळी झाली. प्रेम या सारख्या विषयावर आजही या समाजात बिनधास्तपणे बोलता येत नाही, मात्र सोशल मीडियामुळे समाजात दबल्या गेलेल्या विषयांवर तरुणाई व्यक्त होऊ लागली. हा फार महत्त्वाचा बदल घडून आला. ज्यांना लेखनातून व्यक्त व्हायचे होते, त्यांनी फेसबुकचा आधार घेतला, तर ज्यांना बोलून व्यक्त व्हायचे होते त्यांनी युट्युब सारख्या माध्यमांचा वापर केला. काहींनी स्वतःचे यूट्यूब चैनल काढले.

ध्रुवराठी या २१ वर्षे तरुणाने स्वतःचे  यू ट्यूब चैनल सुरू केले आणि त्या चैनल च्या माध्यमातून तो चालू घडामोडींवर विश्लेषणात्मक व्हिडिओ तयार करू लागला. त्याच्या व्हिडिओला अल्पावधीतच खूप चांगला प्रतिसाद लाभला. त्याचे सध्या २.५ मिलियन इतके सब्सक्रायबर आहेत. मैथिली ठाकूर ही तरुण गायिका सोशल मीडियामुळे प्रसिद्धीस आली. युट्युब, फेसबुक, व्हाट्सअप या माध्यमातून तिच्या गाण्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आणि तिच्या प्रतिभेला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळतोय. सोशल मीडियामुळे तरुणांच्या अभिव्यक्तीला चालना मिळाली, यामुळे तरुणाईमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मोठी मदत झाली. व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व्यक्त होणं खूप गरजेचं असतं.

सोशल मीडियाने व्यक्त होण्याची संधी दिल्यामुळे अनेकांचा व्यक्तिमत्व विकास घडवून आला. सोशल मीडियामुळे या तरुणाईला स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यास मोलाची मदत झाली. पूर्वी एखादी व्यक्ती मोठ्या पडद्यावर झळकली की, सेलिब्रेटी होऊन जायची, मात्र आता या सोशल मीडियाने अनेकांना सेलिब्रेटी बनवलं. फेसबुक सेलिब्रेटी हा नवीन वर्ग उदयास आलेला आहे. सोशल मीडियामुळे अनेकांना जॉब मिळण्यास देखील मदत झाली आहे. विविध क्षेत्रात करिअरच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, याची माहिती सोशल मीडियामुळे सहज उपलब्ध होत आहे. सोशल मीडिया म्हणजे फक्त मनोरंजन, असे चित्र आता राहिलेले नाही.

# तरुण पिढी

कु.हर्षदा नवनाथ कोकणे,
प्रथम वर्ष वाणिज्य

"आजच्या तरुण पिढीमध्ये आहे एक वेगळाच रंग,
तरुण आहे मात्र प्रसारमाध्यमांमध्ये दंग...

इंटरनेट, टीव्ही, सोशल मीडिया ने तयार केलं आहे जाळ,
ज्ञानाचा झाला सागर पण एकमेकांचा नाही ताळमेळ...

मोबाईल, स्मार्टफोन हातात, विचार मात्र गोंधळले..
विचार करून करून स्वप्नांनी एक वळण घेतले..

समाज बदलला, माणसा बदलली..
जे हवं ते जाणून घ्या, कारण आता प्रसारमाध्यमे अस्तित्वात आली...

आजची तरुण पिढी प्रसारमाध्यमामागे पळते,
ज्या बदलत्या काळाच्या मागे सतत धावते...

सोशल मीडिया, इंटरनेटचा वापर करून माहिती मिळवते,
अडचणी, शंका दूर करून ज्ञानामध्ये भर पाडते..

आजच्या तरुण पिढीला देऊन ज्ञानाचा ठसा,
प्रसार माध्यमांचा जास्त वापर नको घेऊ हा नवा वसा..."

# आजचा तरुण

कु.इन्शा समीर शेख,
११ वी विज्ञान- ब

आजच्या जगाला विकसित करणारा एकमेव सक्षम घटक म्हणून तरुणाईकडे पाहिले जाते. सामाजिक उत्थानाची जबाबदारी असलेल्या या तरुणांपुढील आदर्श व आव्हाने आहेत. हा प्रश्न एखाद्या वयस्कर माणसाला विचारला तर, त्याचे उत्तर कदाचित असेही असेल. आजच्या तरुणांना आदर्श बघवत नाहीत आणि आव्हाने पेलवत नाहीत. खरंच अशी परिस्थिती आहे का? आजची तरुण पिढी ही उद्याची मार्गदर्शक पिढी असेल, त्यामुळे तरुणांनी विचार करून काही मूलभूत आव्हाने पेलणे आवश्यक आहेत.

आज घराघरात मोबाईल आहे आणि इंटरनेट सुद्धा बहुतेक जण वापरतात. बरीच मुलं-मुली विद्यार्थी तासंतास मोबाईल हाताळण्यात घालवतात. फेसबुक, ट्विटर यावर पोस्ट शेअर करणे, पोस्ट लाईक करणे, चॅट करणे, पोस्ट अपलोड करणे, इत्यादी कार्यात अगदी भान हरपून असतात. सध्या सोशल मीडियावर बरीच चर्चा आहे. आपल्यासाठी अनेक कल्पना उपलब्ध आहेत आणि योग्यरीत्या वाचणे, समजून घेणे, आणि निष्कर्षावर येणे हे आपल्यावर अवलंबून आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापरकर्त्यांना आणि इतर लाखो लोकांना माहिती सामायिक करण्यास मदत करतात.

सोशल मीडियाचा अतिवापर तुमच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम करू शकतो. बऱ्याचदा लोकांना आळशीपणा, लठ्ठपणा, डोळ्यांमध्ये जळजळ आणि खाज सुटणे, दृष्टी कमी होणे, तसेच ताण-तणाव इत्यादींचा अनुभव येतो. जगभरात लाखो लोक आहेत, जे दररोज सोशल मीडिया वापरतात. त्यांच्या सकारात्मक आणि नकारात्मक बाबींचा संमिश्र उल्लेख करण्यात आला आहे. त्यामध्ये अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या आपल्याला मदत करण्यात महत्त्वाच्या आहेत, पण काही गोष्टी अशाही आहेत ज्या आपल्याला हानी पोहोचवू शकतात.

# निवडणूक प्रक्रिया आणि आजचा समाज

अंजली रवींद्र कुलाळ,
एम.ए. इंग्रजी

लोकशाही निवडणुका केवळ लोकांचे प्रतिनिधी निवडण्यासाठीच नाही, तर समाजातील विविध मुद्द्यांवर लक्ष वेधण्यासाठी, विकासाच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी आणि नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण ठरतात. आजच्या समाजातील लोकशाही निवडणूक प्रक्रिया कशी कार्य करते आणि तिचा आजच्या समाजावर काय प्रभाव आहे, यावर चर्चा करणे आवश्यक आहे. लोकशाही निवडणूक प्रक्रिया म्हणजेच नागरिकांना त्यांच्या इच्छेनुसार सरकार निवडण्याचा एक प्रक्रियात्मक मार्ग आहे. मतदानामुळे प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळतो आणि तो आपला प्रतिनिधी ठरवू शकतो. भारतात ती प्रक्रिया पाच वर्षांच्या अंतराने जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर केली जाते. या निवडणुकांच्या माध्यमातून लोकशाहीची खरी परिभाषा उलगडते, कारण लोक आपल्या मताद्वारे सरकारची दिशा ठरवतात.

निवडणुक ही प्रत्येक नागरिकाला आपला मतदान हक्क जागरूकता आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य असते. सरकारी यंत्रणा आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून नागरिकांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले जाते. तसेच योग्य मतदार यादी तयार केली जाते, ज्यात प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव असते. लोकशाहीत प्रत्येक नागरिकास उमेदवार म्हणून निवडून येण्याचा अधिकार असतो, पण या प्रक्रियेत काही नियम आणि अटी आहेत. उमेदवाराची निवड त्याच्या समाजातील कार्यप्रदर्शन, विश्वास आणि व्यक्तिमत्वावर अवलंबून असते. अनेक राजकीय पक्ष उमेदवारांची निवड करताना, त्यांच्या कार्यक्षमतेला महत्व देतात. निवडणुका सशस्त्र आणि स्वतंत्र असाव्यात, यासाठी निवडणूक आयोग सर्व व्यवस्थेची जबाबदारी घेतो.

मतदान ही एक गुप्त आणि मुक्त प्रक्रिया असते. प्रत्येक नागरिकाला आपल्या मताचा आदान प्रदान सुरक्षितपणे करण्याचा अधिकार असतो. मतदान केल्यावर मतगणना केली जाते आणि उमेदवारांना जास्त मते मिळतात. त्यांना विजय प्राप्त होतो. निवडणुकीचे निकाल निवडणुकीनंतर जाहीर केले जातात. या निकालाचा परिणाम त्या सरकारची दिशा ठरवतो. एक सरकार निवडून आले की, त्याच्याशी संबंधित जनतेच्या विविध मागण्या, अपेक्षा आणि विकासाच्या मुद्द्यांचा विचार केला जातो. प्रत्येक निवडणुकीनंतर सरकारला त्या मतदार संघामध्ये असलेल्या मुद्द्यांकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता असते.

आजचा समाज खूप बदलला आहे. तंत्रज्ञान माहितीचे प्रसार, जागतिकीकरण आणि वाढती माहिती यामुळे लोकशाही प्रक्रिया अधिक गतिमान बनली आहे. या बदलांचा समाजावर आणि निवडणुकीवर कसा प्रभाव पडला आहे, यावर विचार करणे महत्त्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे निवडणूक प्रक्रियेमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. आज आपण ई-मतदान, व्हाट्सअप व विविध सोशल मीडिया अशा डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रचार आणि जनजागृती पाहतो. सोशल मीडियावर उमेदवारांचा प्रचार आणि मतदारांचे मतप्रवाह खूप प्रभावीपणे संचलित होतात. तथापि यामुळे खोटी माहिती, आणि प्रचाराचा अतिरेकही होतो.

आजचा समाज अधिक जागरूक बनला आहे. लोकांच्या हक्काची जाणीव, राजकीय आणि सामाजिक विषयांवर चर्चा, आणि त्यांच्याशी संबंधित बातम्यांचे विश्लेषण, या सर्व गोष्टी नागरिकांना चांगले निर्णय घेण्यास प्रवृत्त जलद गतीने करतात. इंटरनेटच्या वापरामुळे माहितीचा प्रसार जलद गतीने होऊ लागला आहे, त्यामुळे नागरिक सुसज्ज होऊन निवडणुकीत भाग घेतात.

लोकशाही ही शासन पद्धती आहे, जिच्या सामान्य नागरिकांना शासनाच्या सर्व कामकाजात सहभाग घेण्याचा अधिकार असतो. भारत देश हा एक प्रगल्भ लोकशाही असलेला देश आहे, आणि त्याची निवडणूक प्रक्रिया ही संपूर्ण जगात आदर्श मानली जाते. निवडणूक ही लोकशाही व्यवस्थेतील एक अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे, नागरिकांना त्यांच्या प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार प्रदान करते.

लोकशाही निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाचे टप्पे म्हणजे उमेदवारांची नोंदणी, प्रचार, मतदान आणि निवडलेले प्रतिनिधी मतदान हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत अधिकार आहेत, आणि प्रत्येक मतदाराचा हा अधिकार आदरणीय आहे. प्रत्येक वयाच्या १८ वर्ष पूर्ण केलेल्या नागरिकांनी मतदानाचा हक्क प्राप्त असतो. या हक्काचा उपयोग करून नागरिक त्यांच्या हितासाठी काम करण्याची जबाबदारी सोपवली आहे.

आजच्या समाजात निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि आधुनिक बनण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि इतर तंत्रज्ञानामुळे निवडणूका अधिक सुरक्षित आणि विश्वसनीय झाल्या आहेत. इंटरनेटमुळे मतदानाची माहिती आणि निकाल जलद मिळतात.

निवडणूक प्रक्रियेत विविध आव्हान देखील आहेत. राजकीय पक्षांकडून होणारा पैशांचा वापर, प्रचारातील घातक, जाती धर्माच्या आधारावर होणारी निवडणुकीची रणनीती आणि मतदारांना योग्य माहिती न मिळणे हे काही प्रमुख मुद्दे असतात, यामुळे लोकशाही व्यवस्थेचा आदर्श तोडला जातो. मात्र यावर उपाय म्हणून जनजागृती, कडक निवडणूक कायदे आणि लोकशाही प्रक्रियेत सर्वांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे.

आजच्या समाजात लोकशाही प्रक्रियेत मतदान ही एक अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. पूर्वी लोक मतदानाची किंमत समजत नव्हते, परंतु आज लोक अधिक सक्रियपणे मतदान करतात. लोकांचा दृष्टिकोन बदलला आहे. मतदान नोंदणी आणि मतदानाचा हक्क हा एक प्रमुख नागरिक म्हणून मानला जातो. लोकशाही निवडणूक प्रक्रियेला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. भ्रष्टाचार, पैसे देऊन मतदान मिळवणे, मतदारांच्या मागे धर्म, जात आणि अन्य भेदभाव असलेल्या मुद्द्यांचा वापर या सर्व गोष्टी निवडणुकीत दिसून येतात. यामुळे लोकशाही प्रक्रियेचे खरे रूप धोका निर्माण करत आहे. यावर उपाय म्हणून सरकारने कायदे आणि उपाययोजना लागू केल्या आहेत.

आजच्या समाजात लोकशाही निवडणूक प्रक्रियेचा थेट परिणाम आपल्या दैनंदिन जीवनावर होतो. योग्य प्रतिनिधींची निवड झाल्यास समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो, त्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपल्या मतदानाचा उपयोग विचारपूर्वक केला पाहिजे. लोकशाही प्रक्रियेमध्ये नागरिकांचा विश्वास आणि सहभाग असला पाहिजे, तरच आपला समाज खऱ्या अर्थाने समृद्ध होईल. लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणि समाजाचा आजचा बदलत असलेला चेहरा यामध्ये थोड्या सुधारणा आणि जागरूकतेच्या मार्गदर्शनामुळेच आपली लोकशाही निवडणूक प्रक्रिया ही एक महत्त्वाची आणि सशक्त पद्धत आहे, जी समाजाच्या विकासासाठी आणि लोकांच्या अधिकारांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. तथापि, या प्रक्रियेतील काही दोष आणि आजच्या समाजाच्या अडचणी लक्षात घेतल्यास निवडणुकीच्या माध्यमातून योग्य आणि पारदर्शक शासन मिळवणे हे महत्त्वाचे आहे. समाजातील प्रत्येक नागरिकांनी जबाबदारीने आणि निष्ठेने मतदान केले पाहिजे, जेणेकरून लोकशाहीला अधिक सशक्त बनवता येईल आणि समाजातील सर्वांगीण विकास साधता येईल.

# आजचा समाज आणि मतदान

कु.प्रतीक्षा विनोद शेळके,
११ वी विज्ञान-ब

जगातील सर्वात मोठी लोकशाही ही भारत देशाची आहे. परंतु लोकशाही म्हणजे नेमकं काय? तर लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व निपक्षपाती निवडणूक अधिकारी लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे चालणारे राज्य. लोकशाही ही कोणत्याही देशाच्या प्रगतीचा आणि विकासाचा पाया असते. कारण त्यावरच सरकार आणि त्याच्या धोरणांची निवड ठरते. मतदान हा लोकशाही व्यवस्थेतील एक मूलभूत घटक आहे. ज्याच्या माध्यमातून सामान्य जनता आपले मत देऊन आपल्यासाठी योग्य प्रतिनिधी निवडते. जो देशाच्या विकासासाठी सक्षम असेल आणि देशाची सूत्रे कुशलतेने हाताळू शकेल.

भारत देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणूक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. २५ जानेवारी १९५० रोजी या आयोगाची स्थापना झाली. देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. लोकशाही बळकट बनवण्यासाठी निवडणुकीत मतदानाचा हक्क प्रत्येकाने बजावला पाहिजे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने काही महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. या आयोगाने मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी काही उद्दिष्टे समोर ठेवली आहेत. एकूण लोकसंख्येमध्ये मतदारांचे प्रमाण व १८ वर्षावरील मतदारांची संख्या ही समान असावी. यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून ती वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. भारत निवडणूक आयोगाने या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्याच्या उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने आर्थिक अनुदानही या कार्यक्रमांकरिता दिले आहे. १८ ते १९ या वयोगटातील युवकांच्या मतदानाचे प्रमाण सध्याच्या ३५ ते ४० टक्क्यांवरून ८० टक्के इतके झाले आहे. युवक मतदारांची नोंदणी वाढविण्यासाठी विद्यापीठे, महाविद्यालयाचे आणि त्यांचे युवक प्रतिनिधी यांच्याशी संवाद साधायला हवा.

वंचित समाज, समूह यांची मतदार नोंदणी वाढावी आणि मतदानामध्ये त्यांचा सहभाग वाढावा, यासाठी विशेषतः प्रयत्न करायला हवे. नासिक मध्ये सेनादलातील कर्मचारी, सोलापूर मध्ये बिडी कामगार, बीडमध्ये ऊस तोडणी कामगार, गडचिरोली मध्ये बडा माडिया हा आदिवासी समूह, तर ठाणे जिल्ह्यामधील तृतीयपंथी मतदार नोंदणीचे प्रमाण कमी असलेले, वंचित समूह आढळून आलेले आहेत. या समाजाची वस्ती आणि त्याची संस्कृतीचा अभ्यास करून त्यांना मतदान प्रक्रियेत सहभागी करून घेण्याकरिता, त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधणे आवश्यक आहे. मतदार पुनरिक्षण कार्यक्रमामध्ये या समाजाकडे विशिष्टपणे लक्ष दिले जाते. एकूण लोकसंख्येमध्ये आजही अशिक्षित समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे. अशा मतदारांना लोकशाही प्रक्रियेचे महत्त्व सांगणे गरजेचे आहे. यासाठी लोकशिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे गरजेचे आहे. याशिवाय सामाजिक चालीरीती, रूढी, परंपरा यामुळे मतदानाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून आले. याशिवाय गरीब जनतेला आर्थिक मोह दाखवून मतदानाला प्रवृत्त केले जात आहे. यास्तव शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे प्रामुख्याने गरजेचे आहे. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडनुकीमध्ये मतदानाचे सरासरी प्रमाण ६५% इतके असावे, असे उद्दिष्ट भारत निवडणूक आयोगाने ठेवले आहे. गेल्या लोकसभा निवडणूकीत महाराष्ट्र राज्यात सरासरी ५०.४८ टक्के इतके, तर गेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ५९.५० टक्के इतके मतदान झाले होते, निवडणूक आयोगानुसार ही टक्केवारी ६५ टक्के असायला हवी. या टक्केवारीतील कमतरता राष्ट्राच्या विकासासाठी आणि लोकशाहीसाठी अपायकारक आहे. सामाजिक विकासासाठी नेहमीच एखाद्या निर्भीड, कुशाग्र, जनतेची धोरणे लक्षात घेणाऱ्या नेत्याची गरज असते. परंतु आजही प्रामाणिकपणाची, खरेपणाची कमतरता आपल्या समाजात दिसून येते.

संघर्ष आणि मेहनत केली तर यश नक्की असते. पण त्या सेवेत सदैव सातत्य असायला पाहिजे. निवडणुका आल्या की उमेदवारांचे पेव फुटतात. मतदारांना गोंधळून टाकतात. अपक्ष फॉर्म भरणे व माघारीसाठी सौदा करणे, हे प्रकार सर्रास आढळून येतात. यामुळे लोकशाहीचा मुडदा पाडला जातो. काही मतदार लाच घेतात व आपली निष्ठा विकून टाकतात. मग यामुळे पेट्रोल महाग, स्टॅम्प ड्यूटीचे भाव गगनाला व महागाई वाढते. तरी जनता ते सहन करते. योग्य उमेदवार कोण असावा? यावर योग्य चर्चा होत नाही. त्यामुळेच समाज विखुरला जातो. रोजगार मिळाला नाही की, गरिबी वाढत जाते. सर्वसामान्य जनतेच्या मुख्य गरजा तरी काय, लाईट, रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण यापेक्षा जास्त काय पण तिथेही बोंबाबोब . मग आपण उमेदवारावर कोणताही अंकुश ठेवत नाही, पाच वर्ष वाट बघतो. याला लोकशाही म्हणतात का? आजकाल पैसा मेरा भगवान आणि औरत मेरा गुरु! ही पुढारी लोकांची वृत्ती झाली आहे. त्यामुळे मतदारांनी वेळेवर जाग होणं गरजेचं आहे. म्हणूनच एक जबाबदार नागरिक असल्याचे कर्तव्य बजावत योग्य व्यक्तीला प्रतिनिधी बनवणे गरजेचे आहे. एका व्यक्तीचे मत हे पुढील पाच वर्षांचे भवितव्य ठरवते म्हणून प्रत्येकाने मतदान करायला हवे.

# शेतीमाल उत्पादन खर्च व बाजारभाव

कु.धनश्री तुकाराम नाडेकर,
११ वी विज्ञान

आपला भारत देश हा शेतीप्रधान देश आहे. असे प्रत्येक भारतीय नागरिक अगदी सहजतेने बोलून जातो, परंतु 'प्रधान' म्हणजे मुख्य आणि अशा मुख्य शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची वर्तमान स्थिती म्हणजे, त्याने उत्पादित केलेला शेतीमाल व त्याच्या कष्टाने पिकविलेल्या पिकाला मिळणारा बाजार भाव याविषयी आस्थेने विचार करणारा एकही समाज घटक आज अस्तित्वात नाही. याची खंत म्हणून मी एक शेतकरी कन्या मला खूपत असलेले मनोगत मांडत आहे.

आज बदललेल्या जागतिक अर्थव्यवस्थेत खुल्या व्यापार नीतीमुळे सर्व छोट्या-मोठ्या उत्पादनांना शास्वत हमीभाव ठरवलेलं आहे परंतु सर्व जागांचा पोशिंदा जो शेतकरी, त्याचा उत्पादित माल मात्र यास अपवाद आहे. आजही शेतकऱ्याने पिकविलेल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला नाही. जेव्हा शेतकरी कष्टाने पिकलेला आपला शेतमाल बाजारात विक्रीसाठी घेऊन येतो, तेव्हा बाजार समित्या, व्यापारी, दलाल, अडते इत्यादी त्यांच्या मनमानी पद्धतीने शेतकऱ्याच्या शेतमालाची किंमत ठरवितात आणि त्या शेतकऱ्याच्या पिकविलेल्या मालाचा उत्पादन खर्च, त्याला प्रत्यक्ष मिळालेला मोबदला म्हणजे बाजार भाव याचा कोणताही मेळ न बसल्यामुळे, त्याच्या पदरी फक्त निराशाच पडते. नकळत त्याचे मान आत्महत्येकडे प्रवृत्त होते. त्याचे सर्वात मुख्य कारण आहे ते म्हणजे शेतकऱ्यांमधील असंघटितपणा, असहाय्य व दुर्लक्षितपणा. म्हणून अगदी तळमळीने म्हणावेसे वाटते की, शेतकरी राजा संघटित हो जगाचा पोशिंदा जागा हो,जागा हो...!

''गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून द्या, म्हणजे तो संघर्ष करून पेटून उठेल.'' हे ब्रीदवाक्य शेतकरी विसरला असल्यामुळे त्याच्यावर आज ही वेळ आलेली आहे. आजमितीस इतर सर्व क्षेत्रातील व्यापारी, उद्योजक हे संघटित असल्यामुळे संप, सत्याग्रहासारखी हत्यारे उपसून संघटनांच्या माध्यमातून राज्यकर्ते, मालक संघटनांना वेठीस धरून आपल्या विविध मागण्या सहजगत्या आपले पदरी पाडून घेतात, परंतु शेतकरी वर्ग मात्र यास अपवाद आहे.

शेतकऱ्याच्या या वास्तव दिशेला समाजातील सर्वच घटक जबाबदार आहेत. विशेषतः शासन व्यवस्थेची शेतकऱ्यांविषयी असणारी आस्था, आत्मीयता, तळमळ व योग्य तो दृष्टिकोन. शेतकऱ्याला जेव्हा आपला शेतमाल पिकवायचा असतो, त्यासाठी त्याला ज्या आवश्यक गोष्टींची आवश्यकता असते, त्या योग्य, माफक दरात मिळणे आवश्यक असते. म्हणजेच त्याला लागणारी खते, औषधे, बी-बियाणे व मजुरी इत्यादींच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्याचे काम शासन व्यवस्थेचे असते. हे नियंत्रण योग्य पद्धतीचे झाल्यास, शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाचे बाजारभाव, त्यासाठी त्याला आलेला खर्च याचा योग्य ताळमेळ बसून शेतकरी राजा सुखी होऊ शकेल.

शेतकऱ्याच्या शेतीमालास हमीभाव नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असलेल्या असंघटितपणाचा फायदा खरेदीदार व्यापारी, शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योजक हे नेहमीच घेत असतात. शेतकऱ्याचा शेतमाल कोणत्या हंगामात व कोणत्या कालावधीत विक्रीसाठी बाजारात येतो, हे व्यापारी व उद्योजक चांगले जाणून असतात, परंतु शेतकरी मात्र याबाबतीत नेहमीच अनभिज्ञ असतात. विशिष्ट हंगामात विक्रीचा आलेला शेतमाल व्यापारी उद्योजक या काळात कमी भावाने खरेदी करतात व तोच माल प्रक्रिया केल्यानंतर दुप्पट भावाने त्याच शेतकऱ्यांना विकतात. उदाहरण द्यायचे झाल्यास कमी भावाने खरेदी केलेली कडधान्य मिलमध्ये डाळी तयार करण्यासाठी टाकतात. तयार झालेल्या डाळी दुप्पट तिप्पट भावाने बाजारात विकतात. तेच जर शेतकरी संघटित होऊन स्वमालकीच्या सहकारी तत्वांवर चालविल्या तर कडधान्यही आपलेच व तयार डाळिंबापासून दुप्पट तिप्पट मिळणारा भाव ही आपलाच. हे सर्व करण्यासाठी शेतकऱ्यांनी जागृत होणे गरजेचे आहे. शेती व्यवसायाला उद्योगाच्या दर्जा प्राप्त करून घेणे, अत्यंत आवश्यक आहे.

■■■

# शेतीमाल खर्च व उत्पादन बाजारभाव

कु.ज्ञानेश्वरी अरविंद नाईकवाडी,
इ.१२ वी कला

"किंमत उरली नाही पाय माणसाने मातीची,
कवडीमोल गेली का गोणी कांद्या टमाट्याची,
ऊन वारा सोसून मी पेरलं बियाणं बावरात,
यंदा पावसाने केली माती साऱ्या पिकाची,
सांग सोबत या वाहून गेलं पुरात माझं सार,
ह्या जन्मी तरी उघडल का झोप शासनाची."

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. अगदी प्राचीन काळापासून भारतात शेती व्यवसाय केला जातो. शेतकरी उन्हातान्हाचा विचार न करता शेतात दिवसभर राबत असतो. शेतकऱ्याला या जगाचा पोशिंदा म्हटले जाते. तो संपूर्ण देशाला अन्न पुरवण्याचे काम करत असतो. शेतातील पीक त्यांच्यासाठी त्यांच्या मुलासारखे असते. ते लहानाचं मोठं होईपर्यंत शेतकरी त्या पिकाला जीवापाड जपतात. मग ते पेरणी पासून पीक येईपर्यंत. कधीही कोणत्याच गोष्टीचा विचार न करता शेतकरी महागडे बी-बियाणे शेतात पेरत असतो, पण त्यांच्या कष्टाची परवा ही कुणीच करत नाही. जेव्हा कधी अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होते, तेव्हा त्यांना किती वाईट वाटत असेल. याचा आपण विचारही करत नाही. या पिकासाठी ते महिने-महिने वाट पाहत असतात आणि जर ते पीक व्यवस्थित भावाने बाजारात विकले गेले, तर शेतकऱ्यांना आनंद होतो, पण शेतमालाला योग्य बाजार भाव मिळाला नाही तर शेतकरी आत्महत्या करतात.

पूर्वी शेतमालाचा उत्पादन खर्च शेतमालाच्या स्वरूपातच केला जात असे. शेतमाल व पशुधन हेच त्यावेळच्या शेतकऱ्यांचे वैभव. शेतमालाचे उत्पादन खर्च रोख पैशात करायला सुरुवात झाली, त्याच दिवशी खऱ्या अर्थाने शेती व्यवसाय सुरू झाला. सरकारच्या अनेक चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांना आपली शेती व्यवसायाप्रमाणे चालवता येत नाही. शेतकऱ्यांच्या अडचणी सतत वाढत आहेत. हे सर्वप्रथम शेतकरी संघटनेचे संस्थापक कै. शरद जोशी यांनी ओळखले. त्यांनी सरकारच्या शेतीविषयक धोरणाचा अभ्यास केला. देशाची पहिली पंचवार्षिक योजना इसवी सन १९५१ मध्ये व दुसरी इसवी सन १९५५ मध्ये सुरू झाली. त्यात केंद्र सरकारची शेतीविषयक धोरण त्यांनी पाहिले. देशाचा विकास करावयाचा असेल तर उद्योग धंदे वाढले पाहिजेत यासाठी शेतमालाचे उत्पादन वाढले पाहिजे व ते कमीत कमी किमतीला उद्योगधंद्यांना मिळाले पाहिजे. याचा अर्थ शेतमालाचे उत्पादन वाढले पाहिजे, पण बाजारभाव वाढता कामा नये. या धोरणामुळे शेती व्यवसाय फायद्याचा ठरणार नाही, शेतकरी उध्वस्त होणार नाही हे उघड होते. पण शेतकरी शेतीत टिकला पाहिजे, यासाठी आधुनिक शेतीच्या सुरुवातीपासून आजपर्यंत शेतकऱ्यांना शेतमालाच्या उत्पादन खर्चासाठी शासनाचे अर्थसहाय्य सुरू आहे. याचाही उपयोग शेतकऱ्यांना न होता अप्रत्यक्षपणे औद्योगिक उत्पादन वाढीसाठी झाला. शेतकरी फक्त कष्ट करत शेतीत टिकून राहिला आहे. शेतकऱ्यांना आपली शेती फायद्याची करण्यासाठी शासनाची सर्व प्रतिकूल धोरणे बदलून ती अनुकूल झाली पाहिजे, यासाठी शरद जोशींनी लढा दिला.

शेतमालाचा उत्पादन खर्च भागून शिल्लक राहणाऱ्या उत्पन्नात शेतकऱ्यांच्या प्रापंचिक गरजा भागत नाही. ही शेतकऱ्यांची मुख्य समस्या आहे, ती सोडवायची म्हणजे नेमक काय करायचं? तर शेतमालाचा उत्पादन खर्च भागून शिल्लक राहणाऱ्या उत्पन्नात शेतकऱ्यांचा प्रपंच चालला पाहिजे, त्याची गावातील पदप्रतिष्ठा चांगली असली पाहिजे. यापेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी काहीही करावे लागत नाही.

दररोज वर्तमानपत्रात शेतकऱ्यांच्या असंख्य अडचणी असतात, त्या असह्य झाल्यावर शेतकरी आत्महत्या करतात. या अडचणी मात्र कृषी अर्थशास्त्राच्या नियमानेच सोडवाव्या लागतील. त्या सोडवल्या म्हणजे शेती व्यवसाय फायद्याचं होईल. तरच शेतकऱ्यांच्या सर्व प्रपंची अडचणी संपतील. शेती व्यवसाय फायद्याचा करण्यासाठी शेतकऱ्यांना पायाभूत सुविधांची आवश्यकता असते, यामुळे शेतकऱ्यांचे दैनंदिन कामे वेळेच्या वेळी सहजपणे पार पाडतात येतात. शेतीचे उत्पन्न वाढते व उत्पादन खर्च कमी होतो. पण आज पर्यंत शासनाने पायाभूत सुविधांसाठी खर्च केलेला नाही. पीक कर्जमाफी म्हणजे शेतकऱ्यांच्या पिकाच्या उत्पादन खर्चासाठीच दिलेले अर्थसाह्य आहे. गेली ७० वर्ष हे धोरण चालू आहे, पण यामुळे शेतकऱ्यांची एकही अडचण व प्रश्न सुटलेला नाही. फक्त शेतकरी कष्ट करून शेतमालाचे उत्पादन काढण्यासाठी शेतीत टिकून आहे.

पिकाच्या उत्पादन खर्चासाठीच अर्थ सहाय्य मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतमालाचा उत्पादन खर्चाचा हिशोब ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही. स्वतःच्या पिकाचा उत्पादन खर्च स्वतःला माहीत असण्याची महत्त्व कळत नाही. तसेच शेतमालाच्या उत्पादनासाठी केलेल्या खर्चाचा परतावा मिळविण्यासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक दृष्टी मिळत नाही, यामुळे शेतकऱ्यांना अडचणीतून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही.

सध्या कर्जमाफीची आंदोलने सुरू आहे, यात कोणती भूमिका घ्यावी याबाबत शेतकऱ्यांच्या मनात गोंधळ आहे. आत्ताचे शेतकऱ्यांचे नेमके प्रश्न कोणते आहेत, ते कसे सोडवायचे याबद्दल कसलाही खात्रीचा उपाय कुणाजवळ नाही. आत्ताचे शेतकरी पूर्वीसारखे निरक्षर व अडाणी नाहीत. सर्वजण शिक्षित आहेत, काही जण उच्चशिक्षित आहेत व शेतकऱ्यांची हजारो मुली दरवर्षी कृषी अर्थशास्त्राची पदवी घेत आहेत. त्यामुळे शेतीचे प्रश्न कृषी अर्थशास्त्राच्या आधारे सोडवून, शेती व्यवसाय फायद्याचा करावा. कर्जमाफीमुळे शेतकरी कर्जमुक्त करण्यापेक्षा शेती फायद्याची करून कायमस्वरूपी शेतकरी कर्जमुक्त करावा, तरच यापुढे भविष्यात शेतकऱ्यांचे अस्तित्व टिकेल.

# कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाची आवश्यकता

कोकणे हर्षदा नवनाथ,
प्रथम वर्ष वाणिज्य

आधुनिक काळात शेती हा प्रमुख उद्योग म्हणून ओळखला जातो. शेती या व्यवसायावर संपूर्ण जगभरातील लोकांचे जीवनमान व उत्पन्न अवलंबून आहे. शेती या व्यवसायामध्ये शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या आहेत. यामध्ये शेतीमधील विविध पिकांचे उत्पादन करणे व त्यांना बाजारपेठेमध्ये विकणे, या बाबीचा समावेश होतो. शेती या व्यवसायावर अनेक कुटुंबीयांचे जीवनमान अवलंबून असते. शेतकऱ्यांना योग्य त्या प्रकारचे उत्पादन घेण्यासाठी उत्पादन खर्चाचा व मिळणाऱ्या बाजारभावाचा विचार करावा लागतो.

शेतीमाल उत्पादन खर्च म्हणजे, शेतकऱ्याला उत्पादन घेण्यासाठी करावा लागणारा खर्च होय. यामध्ये विविध प्रकारच्या घटकांचा समावेश होतो. उत्पादन घेण्यासाठी उच्च प्रतीचे बीज खरेदी करणे आवश्यक असते. यंत्रसामग्री, ट्रॅक्टर, अवजारे आणि शेती करण्यासाठी साधनांचा वापर करणे अशा प्रकारे शेतकऱ्यांना उत्पादन घेण्यासाठी विविध प्रकारचे खर्च करावे लागतात. मालाचे उत्पादन घेताना आवश्यक असणारे कीटकनाशके, खते इत्यादी घटकांचा वापर शेतीमध्ये केला जातो. शेतकऱ्यांच्या वस्तूला बाजारामध्ये मिळणारी किंमत म्हणजे त्या वस्तूचा बाजारभाव होय. वस्तूची मागणी व त्या वस्तूचा बाजारामध्ये होणारा पुरवठा यावर बाजारभाव अवलंबून असतो.

शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च नियंत्रित ठेवण्यासाठी योग्य तंत्रज्ञान पद्धती आणि आवश्यक असणाऱ्या धोरणांचा योग्य प्रकारे वापर करावा लागतो. शेतीमालाचा उत्पादन खर्च व त्याला मिळणारा बाजार भाव शेतकऱ्यांच्या जीवनावर परिणाम करत असतो. शेतकऱ्यांना योग्य तंत्रज्ञान पद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी विविध प्रकारच्या बाजारपेठांचा शोध घेणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना जास्त नफा मिळवता येईल. शेती या क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांना अधिक प्राविण्य मिळवता येईल.

# शैक्षणिक क्षेत्रातील नैतिकता

कस्तुरी केशव शिंदे,
इ.११ वी, विज्ञान

शिक्षण ही विद्यार्थी आणि शिक्षक यामधील फारच सुंदर दुवा आहे. आपल्या देशात पूर्वी 'गुरुकुल' पद्धती होती, 'गुरु-शिष्य' हे नातं फारच अतूट व पवित्र मानलं जायचं. शिक्षक असो वा विद्यार्थी आपली नैतिक, सामाजिक जबाबदारी आणि भान जपले पाहिजे, परंतु आजची परिस्थिती पाहता असे वाटते की, शिक्षक आपले काम करतात तेही प्रामाणिकपणे, परंतु आजचा विद्यार्थी आपली जबाबदारी मुल्य विसरला आहे. आपली नैतिक जबाबदारी व शिक्षण यामधील दूवा कमी झाला आहे. विद्यार्थ्यांने जबाबदारीने वागायला हवे.

नैतिकतेवर समाजाचे अस्तित्व टिकून आहे. नैतिक मूल्य आपणास चांगले वाईट शोधण्यासाठी मदत करते. आजच्या युगात आपण कसे वागावे, तसेच आपले शिक्षक , गुरुजन यांच्यासोबत आदरयुक्त व प्रेमाने वागणे ही सुद्धा एक नैतिकता आहे असे म्हणता येईल. चांगले शिक्षण हे सामाजिक तसेच सांस्कृतिक विकास होण्यासाठी किती महत्त्वाचे आहे, तसेच योग्य शिक्षण पद्धती देखील महत्त्वाची आहे. शिक्षणाशिवाय देशाचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही. आपल्या देशाची प्रगती व जगात मानाचे स्थान निर्माण करायचे असेल, तर देशातील युवा पिढी योग्य नैतिक मार्गावर हवी. कारण कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील प्रजेवर अवलंबून असते. त्यासाठी देशातील युवा पिढी सक्रिय पाहिजे. हे कार्य घर, शाळा, मंदिरे अशा वेगवेगळ्या ठिकाणावरून देखील केले जाऊ शकते. विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, सत्यता, सहनशीलता, विनंम्रपणा, प्रामाणिकपणा अशा प्रकारचे गुण वृद्धिंगत होणे गरजेचे आहे.

आजची खंत किंवा वाईट गोष्ट म्हणता येईल की, आज-काल शिक्षक असो वा पालक त्यांचा आदर सन्मान केला जात नाही. समाजात अराजकता जन्म घेते, आजच्या शिक्षण पद्धतीत नैतिकता ही कमी वाटते. आज-काल शाळा, महाविद्यालय यामध्ये याविषयी शिक्षण पाहिजे, तसेच एखादा नवीन विषय अभ्यासक्रमात घेतला पाहिजे.

मला वाटते की, शिक्षा न करण्यामुळे विद्यार्थी हा फारसा शिक्षकांना घाबरत नाही, किंवा शिक्षकांना मान देत नाही. उलट पक्षी त्याचा परिणाम हा आपसूक आजच्या पिढीवर पडतो.

''छडी वाजे छम छम, विद्या ये घमघम..''

ही युक्ती मला काही अंशी योग्य वाटते, कारण त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांबद्दल आदरयुक्त भीती असायची आणि विद्यार्थी घडला जायचा. याउलट विद्यार्थ्यांना सर्व सोयीसुविधा असो, आजचा विद्यार्थी खरोखरच नैतिक मूल्यांपासून दूर गेला आहे. इंटरनेट, मोबाईल यासारख्या गोष्टींच्या आहारी गेला आहे. त्यामुळे राष्ट्रनिर्मिती आणि समाजासाठी व येणाऱ्या पिढीसाठी नैतिक मूल्य जपणे, त्याची संवर्धन करणे ही अत्यावश्यक गोष्ट वाटत आहे.

■ ■ ■

# प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था: गुरुकुल ते विद्यापीठ

प्रा.डॉ.किरण जाधव,
इतिहास विभाग प्रमुख

प्राचीन ऋषी-मुनींनी शिक्षणाचे महत्त्व अनेक प्रकारे सांगितले आहे. मानवी जीवनाचे चार आश्रमात विभाजन केले जाई. ब्रम्हचर्याश्रम हा पहिला आश्रम असून त्यापासून जीवनाला व शिक्षणाला सुरवात होई. विद्याभ्यास व ज्ञानप्राप्ती हाच या आश्रमाचा उद्देश होता. शिक्षणामध्ये केवळ बौद्धिक विकासावर भर देण्यात येत नसे. शिक्षणाचे ध्येय ज्ञानसाधना, शील, व्यक्तिविकास व सामाजिक वारशाचे संरक्षण असे चतुर्विध असे. या ध्येयाला अनुसरून शिक्षण- पद्धती व शिक्षणसंस्था निर्माण झाल्या. अर्थात त्या काळाला अनुसरून शिक्षणाचे उद्देश ठरविण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या मनात पावित्र्य आणि धार्मिकता यांची भावना निर्माण करणे, चारित्र्य घडवणे, व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे, साहित्य व संस्कृतीचे संरक्षण करणे आणि कर्तव्याची भावना जागृत करणे, इत्यादी बाबींवर भर देण्यात आला. विद्याहीन मनुष्य पशु आहे; विद्या कल्याणाची किल्ली व कामपूर्ती करणारी कल्पलता आहे; असा विद्येचा गौरव केला आहे. विनय व इंद्रियदमन ही विद्यासाधनेला आवश्यक मानली आहेत.

## १. गुरुकुल:

घरामध्ये किंवा नगरामध्ये शिक्षणाला अनुकूल वातावरण मिळू शकत नाही, म्हणून भारतीय आश्रम, गुरुकुले आणि विद्यापीठे शहराबाहेर असत. गुरुशिष्यांचा जास्तीत जास्त संबंध येण्यासाठी विद्यार्थ्याने गुरुगृही राहण्याची पद्धती होती. गुरुकुल ही सर्वाधिक प्राचीन शिक्षण संस्था होती. गुरुकुल नगराच्या बाहेर वनात असे. प्रत्येक व्यक्तीस शिक्षणासाठी गुरुकुलात जावे लागे. गुरुकुल हेच शिक्षणाचे सर्वप्रथम केंद्र होते. वेद, पुराणे, रामायण, महाभारत व संस्कृत साहित्यात विभिन्न गुरुकुलांचे उल्लेख आढळतात. गुरुसेवा करून विद्यार्थी विद्या संपादन करी. समाजाची विभागणी चार वर्णात झालेली होती. शूद्र वर्णातील व्यक्तीस शिक्षण उपलब्ध नव्हते. गुरुगृही विद्यार्थामध्ये गरीब-श्रीमंत असा भेद केला जात नसे. गुरुगृही विद्यार्थ्यांची जेवण आणि निवासाची मोफत सोय असल्याने गरीब परंतु होतकरू विद्यार्थासही विद्यार्जन निश्चितपणे करता येई. समाजही अशा शिक्षकांच्या नित्य संपर्कात राहून त्यांस सर्व प्रकारचे साहाय्य देई. भारतीय राजेही विद्वानांचा सन्मान करून, पंडितांना राजाश्रय देऊन, शिक्षणविषयक आपले कर्तव्य बजावीत. याप्रमाणे शिक्षणास मदत देऊनही, समाज वा राजसत्ता शिक्षणाच्या अंतर्गत व्यवस्थेत कधीही ढवळाढवळ करीत नसे. भारतीय आचार्यही साधी राहणी व उच्च विचारसरणी असा आपला जीवनादर्श ठेवून बाणेदारपणे आपले स्वातंत्र्य अबाधित राखीत. शिक्षकवर्गाला आर्थिक स्पर्धेच्या क्षेत्रापलीकडे ठेवून समाज देखील त्यास विशुद्ध राहणी राखण्यास मदत करी. संपत्तीवर व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरत नसल्याने निर्धन ज्ञानी व्यक्तींनाही समाजात प्रतिष्ठा व मान्यता मिळे. विद्वान कधीही राजसत्तेपुढे आपले मस्तक झुकवीत नसत. ह्यूएनत्संग यानेही भारतीय विद्वानांचे ज्ञान व शील यांबद्दल फार आदराने लिहिले आहे.

मुलांच्या शिक्षणास वर्णमालेपासून सुरुवात होई. नंतर सिद्धिरस्तु नावाचा द्वादशाध्यायी ग्रंथ अभ्यासिला जाई. पुढे धातुपाठ, उणादी सूत्रे, अष्टाध्यायी इ. शिकत. व्याकरणाचा अधिक अभ्यास काशिकावृत्ती, महाभाष्य, वाक्यपदीय आकरग्रंथांच्या साह्याने केला जाई. सर्वसाधारणपणे विद्यार्थाना शब्दविद्या (व्याकरण), शिल्पस्थानविद्या, चिकित्साविद्या, हेतुविद्या व आत्मविद्या याचा अभ्यास शिकविला जाई.वेद, वेदांगे, सांख्ययोग तत्त्वज्ञान, बौद्ध धर्मग्रंथ इत्यादिकांचाही अभ्यास शिकविला जाई. ज्योतिष व वैद्यक, लष्करी शास्त्रे व विविध कला यांचेही शिक्षण दिले जाई. बाणभट्टाने आपल्या हर्षचरितात विंध्य पर्वतातील दिवाकर मित्राच्या आश्रमाचे मोठे मनोरम वर्णन दिले आहे. त्या आश्रमात अनेक प्रांतांतील बौद्ध भिक्षु, नाना पंथांचे उपासक, दिगंबर व श्वेतांबर जैन, जटिल, मुंडक, कापिल, कृष्णभक्त, ब्रह्मचारी, तार्किक, वेदान्ती, नैयायिक, धातुवादी, धर्मशास्त्री, पौराणिक, वैयाकरणी, मीमांसक, पांचरात्रिक, पाशुपत इ. विविध पंथांचे व तत्त्वांचे लोक एकत्र राहात. आपापल्या तत्त्वांचे

निरूपण करीत, परमताविरुद्ध शंका व प्रश्न करीत. वादविवाद, अभ्यास व मनन करून सर्वजण ज्ञानाची एक-निष्ठेने उपासना करीत.

**२.प्राचीन विद्यापीठे:**

गुरुकुलाशिवाय अनेक प्रसिद्ध विद्यापीठे शिक्षणकेंद्रे म्हणून उदयाला आली आणि जगभर नावाजली गेली. त्यापैकी तक्षशिला, नालंदा, वल्लभी आणि विक्रमशिला हि विद्यापीठे प्राचीन काळात जगप्रसिद्ध बनली होती.

**२.१ तक्षशिला विद्यापीठ:**

तक्षशीला विद्यापीठ हे भारतातील सर्वात प्राचीन विद्यापीठ असून तक्षशिला ही नगरी प्राचीन गांधार देशाची राजधानी होती. पूर्वी भारतात असलेले हे ठिकाण सध्या पाकिस्तानातील रावळपिंडी पासून वायव्येस सुमारे ३५ कि. मी. अंतरावर नवीन सराईकल या रेल्वे स्थानकाजवळ आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाचे प्रमुख संचालक सर जॉन मार्शल यांनी या भागात उत्खनन केले. या प्राचीन विद्यापीठाचे उल्लेख रामायण, महाभारत आणि जातक कथांत आढळतात. काही ग्रीक व चिनी परदेशी प्रवाशांनी आपल्या प्रवास वृतांतात या विद्यापीठाचा उल्लेख केलेला आहे.

कैकयीपुत्र भरताने तक्षशीलानगर वसविताना त्याला तक्ष या आपल्या मुलाचे नाव दिले, असे मानले जाते. काही आख्यायिका सांगतात कि तक्षखंड (आधुनिक ताश्कंद) राज्याचा राजा तक्ष याने तक्षशीला हि नगरी वसवली आहे. कुरुंचा वारस परीक्षित याने तक्षशीला येथे राज्य केलेअसा उल्लेख महाभारतात येतो. परंपराच्या आधारे असे मानले जाते कि, परिक्षिताचा मुलगा जनमेजय याच्या सर्पसत्र यज्ञाच्या प्रसंगी तक्षशीला येथेच महर्षी व्यास यांच्या आज्ञेनुसार त्यांचा शिष्य वैशंपायन ऋषी याने प्रथम महाभारताचे पठन केले. दामोदर धर्मानंद कोसंबी यांच्या मते तक्षशीला हि तक्षकाशी (''सुतार'') संबंधित असून ते प्राचीन काळातील नागांचे पर्यायी नाव आहे. अभ्यासकांनी या विद्यापीठाच्या स्थापनेबाबत वेगवेगळी मते नोंदवली आहे. इ.स. पूर्व आठवे ते पाचवे शतक या दरम्यान स्थापना होवून इ.स. च्या चौथ्या किंवा पाचव्या शतकापर्यंत असे सुमारे १२०० ते १३०० वर्ष हे विद्यापीठ अस्तित्वात असावे. इ.स. पाचव्या शतकात नालंदा विद्यापीठाचा उदय होण्यापूवी तक्षशिला हेच विद्यापीठ महत्त्वाचे शिक्षण केंद्र म्हणून प्रसिद्धीस आले हाते. तक्षशिला हे शहर सीमेवर असल्याने शक, कुशाण, हुण, इंडो-ग्रीक व पहलव या परकीयांच्या आक्रमणाची झळ सतत या विद्यापीठाला पोहोचत असे.

तक्षशीला येथील अभ्यास केंद्रास विद्यापीठ म्हणता येईल का याबाबत अभ्यासकांमध्ये मत मतांतरे आहेत. काही त्यास भारतातील पहिले विद्यापीठ मानतात, काही त्याला उच्च शिक्षणाचे केंद्र मानतात तर काही त्याला नालंदा सारख्या आधुनिक विद्यापिठासारखे विद्यापीठ मानीत नाहीत. इ. स. ५ व्या शतकात श्रीलंकेत लिहिल्या गेलेल्या जातक कथांमध्ये तक्षशीला विद्यापीठाचे काही उल्लेख येतात. तक्षशिला विद्यापीठ आशिया खंडात प्रसिद्धीस आले होते. या विद्यापीठाची रचना ही आधुनिक विद्यापीठांप्रमाणे नव्हती. तेथे अनेक विद्यार्थी उच्च अध्ययनाकरीता देशाच्या कानाकोप-यातून तसेच आशिया-यूरोपमधील देशातूनही येत. प्रत्येक शिक्षक म्हणजे एक स्वतंत्र संस्थाच असे. त्यांना त्याचे माजी विद्यार्थी मदत करीत असत. एका शिक्षकाच्या हाताखाली सुमारे ५०० विद्यार्थी असत असा जातक कथांमध्ये उल्लेख आहे. विद्यार्थ्यांच्या भोजन आणि निवासाची सोय विद्यापीठाच्या वसतीगृहात असे. सधन वर्गातील विद्यार्थी संपूर्ण शिक्षणाकरिता सामान्यतः एक हजार सुवर्ण नाणी शुल्क म्हणून देत असत. निर्धन विद्यार्थी गुरुगृही राहून नेमलेली कामे दिवसा करीत आणि रात्री अध्ययन करीत असत. काही विद्यार्थी अध्ययन पूर्ण झाल्यानंतर पैसे मिळवून गुरुदक्षिणा देत.

या विद्यापीठात एकाच वेळी शंभर विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येई. प्रवेश परीक्षेनंतर १६-१७ वर्षे वयाचे विद्यार्थी घेतले जात. शिक्षणाचा कालावधी सामान्यपणे ७ ते ८ वर्षांचा असे. इ.स. पूर्व सहाव्या शतकात या ठिकाणी बनारस, राजगृह, मिथिला, उज्जयिनी इ. नगरातून व कुरु, कोसल इ. राज्यातून विद्यार्थी येत. कोसलचा राजा प्रसेनजित व राजपुत्र जीवक (बिंबिसारचा अनौरस पुत्र) यानी येथेच शिक्षण घेतले. वैय्यकरणी पाणिनी, चिकित्सा विशारद कौमारभृत्य आजीवक, कौटिल्य, मोर्य घराण्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य, आयुर्वेदाचार्य चरक यांनी तक्षशिला विद्यापीठात शिक्षण घेतले आहे. चाणक्य अथवा विष्णुगुप्त या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कौटिल्य याने आपला प्रसिद्ध 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ तक्षशिला विद्यापीठात लिहिला आहे. अध्यापकांच्या श्रेणीत

धौम्य ऋषी, आयुर्वेदाचार्य जीवक इत्यादींचे उल्लेख येतात.

तक्षशिलेस फक्त उच्च शिक्षणाची व्यवस्था होती. सखोल अभ्यासावर भर दिला जाई राज्यशास्त्र, वैद्यक, धनुर्विद्या, व्याकरण, तत्त्वज्ञान, वास्तुशास्त्र इ. प्रमुख विषय शिकविले जात. याशिवाय शल्यक्रिया, युद्धतंत्र, ज्योतिष, कृषिविज्ञान, फलज्योतिष, वाणिज्य, सांख्यिकी, विज्ञान लेखाशास्त्र, संगीत, नृत्य, चित्रकला असे विषयही शिकविले जात. विद्यापीठात विद्यार्थ्यांना धर्मजातीकुलनिरपेक्ष प्रवेश असे. हजार-बाराशे वर्षांच्या कालखंडात ज्या ज्या राजवटींनी तक्षशिलेवर अधिराज्य कले, त्याचा परिणाम तेथील अभ्यासक्रमावर व भाषेवरही कमी-अधिक प्रमाणात झाला. काही परकीय विषयांचे ज्ञानही या विद्यापीठात दिले जाई. इराणी व ग्रीक संस्कृतीचे अनेक विषय व संकल्पना शिक्षणक्रमात समाविष्ट झाल्या. ब्राह्मी लिपी ऐवजी खरोष्ठी लिपीचा वापर अधिक होऊ लागला. ग्रीक स्थापत्यकला व नाणकशास्त्र यांचा समावेश अभ्यासविषयात करण्यात आला असावा असे अँपोलोनिअसच्या वृत्तान्तावरून दिसते.

राजवटींचा विचार करता प्रामुख्याने ग्रीक, इराणी, मौर्य, इंडो-बेक्ट्रियन, सिथियन, कुशाण इत्यादी अनेक राज्यकर्त्यांच्या राजकारणाचा, संस्कृतीचा आणि भाषांचा प्रभाव पडला.हिंदू आणि बौद्ध तक्षशिलेस धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या पवित्र मानतात. हिंदूंसाठी ते वैदिक ज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र तर होतेच शिवाय मौर्य साम्राज्याच्या स्थापनेत महत्वाचे कार्य करणारा चाणक्य तेथे वरिष्ठ अध्यापकही होता. बौद्ध धर्मियांसाठी महत्वाचे असण्यामागील महत्वाचे कारण म्हणजे बौद्ध परंपरा मानतात कि महायान पंथ येथेच  आकारास आला आहे. हजार-बाराशे वर्षे अव्याहत शिक्षणकार्य करीत असलेले हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एकमेव प्राचीन विद्यापीठ होते. तथापि इ.स. पाचव्या शतकात भारतात आलेला चिनी प्रवासी फाहियान याला येथे शैक्षणिकदृष्ट्या काहीच महत्त्वाचे दिसले नाही, असे त्याच्या प्रवासवृत्तांतावरुन दिसते. कुशाणाच्या काळापर्यंत हे विद्यापीठ शिक्षणाचे केंद्र राहिले. नंतर हुणांची सतत आक्रमणे सुरु झाली. त्या आक्रमणामुळेच प्रसिध्द तक्षशीला विद्यापीठ नष्ट झाले.

## २.२ नालंदा विद्यापीठः

भारताच्या ईशान्य भागात असलेले  नालंदा विद्यापीठ हे प्राचीन काळात एक आदर्श विद्यापीठ मानले जाते. बिहार राज्यातील पाटण्यापासून सुमारे ३२ कि. मी. तर मगध साम्राज्याची राजधानी असलेल्या राजगीरच्या उत्तरेस १२ कि.मी. अंतरावर ते वसलेले होते. १८६० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ अलेक्झांडर कनिंगहॅम याने नालंदा विद्यापीठाची जागा शोधली आणि १९१५-१६ मध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने येथे उत्खनन सुरु केले. आजपर्यंत जेव्हढे उत्खनन झाले आहे तो विद्यापीठाचा केवळ लहानसा भाग असून अजूनही बराच मोठा भाग गावांच्या खाली गाडला गेलेला आहे.बौद्ध परंपरेनुसार इ. स. पाचव्या शतकाच्या सुरुवातीस सक्रदित्य याने नालंदा विद्यालयाची स्थापना केली. काही अभ्यासकांनी इ. स. ४२७ मध्ये या विद्यापीठाची स्थापना झाल्याचे म्हटले आहे. गुप्त सम्राट कुमारगुप्त प्रथम (४१४-४५५) याने राजाश्रय दिल्यामुळे या विद्यालयाचे रूपांतर विद्यापीठात झाले. विद्यापीठ स्थापनेचे व संवर्धनाचे श्रेय गुप्तवंशाच्या सहा राजांकडे जाते. त्यांच्याशिवाय हर्षवर्धन, यशोवर्मन, पाल राजे व जावातील शैलेंद्र राजे यांनीही भरपूर अर्थसाहाय्य दिले. राजा हर्षवर्धन याने त्याच्या कारकिर्दीत विद्यापीठाच्या संपूर्ण खर्चासाठी १०० गावांचा महसूल देण्याची व्यवस्था केली होती. काही अभ्यासक स्थापनेचे श्रेय बौद्ध आचार्य नागार्जुन यांचा शिष्य आर्यदेव यास देतात. उत्खननात सापडलेल्या मुद्रेवर 'श्री नालंदा महाविहार आर्य भिक्षुसंघस्य' असे लिहिलेले आहे. या मुद्रेच्या दोन्ही बाजूवर सारनाथचे धर्मचक्र आहे.

ह्यूएनत्संग हा चीनी बौद्ध पंडित इ. स. ६३० ते ६४५ या काळात भारतात येवून गेला. त्याने या विद्यापीठाचे सविस्तर वर्णन केले आहे. नालंदा विद्यापीठाच्या सुमारे दीड कि. मी. लांब व पाऊण कि. मी. रुंद क्षेत्रात विद्यापीठाची भव्य इमारत व वसतिगृह होते. नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय खूप मोठे होते. या ग्रंथालयात सुमारे ९० लक्ष हस्तलिखित ग्रंथ होते असे म्हटले जाते. या ग्रंथालयासाठी रत्नासागर, रत्नोदधी व रत्नरंजन अशा तीन सुंदर इमारती होत्या. ग्रंथालयाच्या विभागास धर्मगंज किंवा धर्मयज्ञ असे म्हणत असत. रत्नोदधी या नावाची इमारत नऊ मजली असून या इमारतीत प्रामुख्याने तांत्रिक पंथासंबंधीचे साहित्य होते. आपल्याकडे येथील ग्रंथ आणि कागदपत्रांची स्वतंत्र प्रत असावी म्हणून विद्यार्थी कष्टपूर्वक लिहून  अक्षरशः दुसरी नक्कल तयार करून घेत असत.

ग्रथांना रत्न मानण्यात येवून ग्रंथालयाच्या इमारतीला वरील प्रकारची नावे दिली होती.

निवासासाठी ४००० व अभ्यासासाठी १००० खोल्या होत्या. विद्यार्थी संख्या सुमारे १०,००० इतकी असून त्यांना ज्ञान देण्यासाठी १५१० आचार्य होते. थोडक्यात १०,००० विद्यार्थी आणि २००० शिक्षकांची निवासाची सोय करण्यात आली होती. येथे असलेल्या अनेक मठांमध्ये भिख्खू राहिले आहेत आणि त्यांनी येथे अभ्यास केला आहे. काळाच्या ओघात या मठांची पुनर्बांधणी झाल्याचे दिसते. येथील एक कमी उंचीचा दरवाजा असलेल्या खोलीत नरोपा या तिबेटमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार करणाऱ्या प्रसिद्ध आचार्यांची असल्याचे सांगितले जाते. कर्मदान नावाचा एक भिक्षू अधिकारी सर्व विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवीत असे. विद्यापीठाच्या परिसरात अनेक इमारती होत्या. काही इमारती महाविद्यालयासाठी, काही ग्रंथालयासाठी तर काही इमारती विद्यार्थी व अध्यापकांच्या निवासासाठी होत्या. येथील इमारती अनेक मजली होत्या. इमारतीच्या भिती व स्तंभाची सजावट केलेली होती. उद्याने, स्नानगृहे व क्रिडागंणे देखील होती.विद्यार्थ्यांना शिक्षण,निवास, भोजन, कपडे व औषधोपचार विनामूल्य असे. नालंदा विद्यापीठाचा अभ्यासक्रम प्रगत आणि बहुव्यापक होता. प्रामुख्याने बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठीचे अभ्यासकेंद्र असूनही या ठिकाणी वेदवेदांगे, हिंदू व जैन तत्त्वज्ञान इ. यांचाही अभ्यास केला जाई. बौद्धधर्माचे महायान व हीनयान पंथ, जैन धर्म, व इतर धर्म त्याचप्रमाणे योग, व्याकरण, साहित्य, तर्कशास्त्र, शब्दविद्या, चिकित्साविद्या, गणित, ज्योतिष, चित्रकला, शिल्पशास्त्र, मंत्रविद्या, दंडनिती, वेद, उपनिषदे, सांख्य तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, स्थापत्यकला इ. विषयांचे अध्ययन होत असे.

दररोज वादविवाद व चर्चा आयोजित केल्या जात. दररोज सुमारे शंभर व्याख्याने होत. राजा हर्षवर्धनच्या काळात शीलभद्र हे विद्यापीठाचे कुलगुरु होते. त्याकाळी सहा विद्यार्थ्यांच्या पाठीमागे एक शिक्षक असे. नालंदा विद्यापीठाची ख्याती भारतात व विदेशातही होती. या कीर्तीमुळे देशाच्या कानाकोपऱ्यातून व मध्य आशिया, चीन, कोरिया, तिबेट इ. परदेशांतून विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत. विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत असल्याने त्यांना प्रवेश मिळणे अत्यंत स्पर्धात्मक असे.प्रवेश मिळण्यासाठी द्वारपंडित घेत असलेली प्रवेश परीक्षा अत्यंत कडक असे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी शेकडा २०-३० टक्के उच्च गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळे. अध्यापकाचे काम महान विद्वान करत असत. धर्मपाठक, चंद्रपाल, आर्यदेव अंग, प्रभामित्र, शीलभद्र, शांतरक्षित, जिनमिन व ज्ञानचंद्र इत्यादी विद्वान अध्यापनाचे कार्य करत असत. या विद्यापीठाने कर्णमती, वसूबंधू, स्थिरमती, गुणमती, बुद्धकीर्ती, कमलशील इत्यांदी विद्वानांची मालिका निर्माण केली. विद्यार्थी आणि आचार्य यांच्यातील संबंध खूप सौहार्दपूर्ण होते.

नालंदा विद्यापीठ बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र बनले होते. त्यामुळे येथील आचार्यांकडून शिक्षण मिळावे म्हणून फाहियान, ह्यूएनत्संग,घोनसी ह्युनिचिऊ, नाऊस्गि हैग, आर्यवर्मन, बुद्धवर्म वगैरे मंडळी चीन, तिबेट, कोरिया इत्यादी ठिकाणाहून नालंदा येथे आलेली होती. येथे चालत असलेल्या शैक्षणिक वातावरणामुळे आधुनिक अभ्यासक या विद्यापीठास 'महायान पंथाचे ऑक्सफर्ड' असे म्हणतात. ह्यूएनत्संग येथे सुमारे ५ वर्ष विद्यार्थी आणि अध्यापक म्हणून राहिला होता.

चारित्र्यसंपन्न व बुद्धिवान अध्यापक, अभ्यासू व होतकरू विद्यार्थी, कुशल प्रशासन, राज्यकर्त्यांचा सतत लाभलेला राजाश्रय यामुळे नालंदा विद्यापीठाची उत्तरोत्तर सतत सात ते आठ शतके भरभराट होत गेली. भारतीय भाषा आणि साहित्य यांचा भारताबाहेर प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विद्यापीठाने केले. अनेक भारतीय विद्वानांनी भारताबाहेर जावून तेथील भाषांमध्ये भारतीय साहित्य भाषांतरित केले. येथे शिक्षण घेतलेल्या परदेशी विद्यार्थ्यांनीही भारतीय संस्कृती आणि साहित्य त्यांच्या मायदेशी पोहोचविण्याचे काम केले. प्राचीन भारतातील अध्ययन-अध्यापनाच्या श्रेष्ठ परंपरेला सातत्य व समृद्धी मिळवून देण्यात या विद्यापीठाचा फार मोठा वाटा आहे.

विक्रमशिला विद्यापीठाच्या प्रगतीबरोबर नालंदा विद्यापीठास उतरती कळा लागली. सेन घराण्याच्या राजवटीत आवश्यक राजाश्रय मिळू शकला नाही. हे विद्यापीठ इ. स. ११९७ पर्यंत विद्यादानाचे कार्य करत होते. बाराव्या शतकाच्या शेवटी बख्त्यार खिलजीच्या स्वारीच्या प्रसंगी विद्यापीठाची मोडतोड झाली व आगी लावून विध्वंस करण्यात आला. या आगीत विद्यापीठातील ९ दशलक्ष हस्तलिखिते जळून खाक झाली. नालंदा विद्यापीठाची आठवण म्हणून त्याच ठिकाणी बिहार सरकारच्या सहकार्याने १९५१ साली नूतन नालंदा महाविहार

(नालंदा पाली प्रतिष्ठान) स्थापन करण्यात आले आहे.

**२.३ विक्रमशिला विद्यापीठ:**

विक्रमशीला हे आजच्या बिहार राज्यात असलेले एक प्राचीन बौध्द विद्यापीठ आहे. तिबेटी परंपरेनुसार मगधाचा पालवंशी राजा धर्मपाल (कार ७८०-८१५) याने विक्रमशिला विहाराची स्थापना केली. या विहाराला विक्रम नावाच्या यक्षाचे नाव देण्यात आले. या विहाराचे पुढे प्रसिध्द विक्रमशिला विद्यापीठात रुपांतर झाले. धर्मपालाचे दूसरे नाव विक्रमशील असल्यामुळे विद्यापीठाचे नाव विक्रमशिला असे ठेवण्यात आले.

या विद्यापीठाच्या निश्चित स्थानाविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद असले तरी ते प्राचीन मगध देशांत गंगेच्या काठी एक टेकडीवर प्रामुख्याने भागलपूरजवळ पाथरघाट टेकडीवर वसले होते असे आता निश्चित झाले आहे. फणीद्रनाथ बोस यांच्या मते ते भागलपूर परगण्यात एका टेकडीवर असावे. नंदलाल डे आणि प्राच्यविद्या पंडित अ.स. अळतेकर यांच्या मते अंग राज्याची राजधानी असलेल्या चंपा नगरच्या पूर्वेला ३८ कि.मी. दूर असलेले पाथरघाट नामक स्थान म्हणणंच विक्रमशिला असावे. या ठिकाणाला १८१३ साली बूचानन या स्कॉटिश अभ्यासकाने प्रथम भेट दिली. सतिशचंद्र विद्याभूषण यांनी मात्र सुलतानगंज (भागलपुर जिल्हा) हे स्थान म्हणजेच विक्रमशिला हे निश्चित केले आहे.

पाटणा विद्यापीठाच्या प्राचीन इतिहास व संस्कृती या विभागाने १९६० ते ६९ या कालावधीत बिहारमधील भागलपूर जिल्हयातील अँटीचक येथे उत्खनन केले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्यानेही १९७२-७३ पासून येथे मोठ्या प्रमाणावर उत्खनन करुन विक्रमशीला विद्यापीठाचे अवशेष शोधून काढले. तेथील भव्य मठ, पाषाणाच्या बुध्दप्रतिमा, मोहोरा, स्तूप आणि भव्य जलाशये त्या काळाची ग्वाही देतात.

लामा तरानाथ या १७ व्या शतकातील तिबेटी भिक्षुने लिहिलेल्या बौध्द धर्माच्या इतिहासात विक्रमशीला विद्यापीठाची माहिती मिळते. धर्मपाल राजाने महाविहार बांधून बौध्द धर्माच्या चार प्रमुख पंथांचे प्रत्येकी २७ असे एकूण १०८ अध्यापक चार विभागात नेमले आणि महाविहारास देणग्या दिल्या. नंतरच्या पाल घराण्यातील राजांनीही या विद्यापीठास आणि नालंदा व सोमपुरीसारख्या अनेक शिक्षण केंद्रांना आर्थिक सहकार्य केल्याचे उल्लेख आढळतात. इतर धनिकांनीही त्यास देणग्या दिल्या. महाविहाराभोवती तटबंदी असून चार दिशांना महाद्वारे होती. प्रत्येक प्रवेशद्वारावर एक प्रवेशपरीक्षागृह होते. राजा देवपाल याने नवव्या शतकाच्या पूर्वार्धात आणखी दोन प्रवेश परीक्षागृहे बांधली. या सहा द्वारांवर रत्नाकर शांती, वागीश्वरकीर्ती, भट्टारक नरोत्पल, प्रज्ञाकरमती, रत्नवज्र, ज्ञानश्रीमित्र यासारख्या नामांकित विद्वान पंडित तथा आचार्यांची नेमणूक केलेली होती. या आचार्यांपैकी काही विख्यात नैयायिक होते. विहाराच्या मध्यभागी महाबोधीची कलाकृती असलेले देवालय व अन्य १०८ देवालये होती. केंद्रस्थानी असलेल्या विहारास विज्ञानगृह म्हणत. याशिवाय येथे एक विशाल सभाभवन होते. त्यात एकावेळी आठ हजार व्यक्तींची बसण्याची सोय केलेली होती. प्रवेश द्वारावर उजव्या बाजूला नालंदा विद्यापीठाचे प्रमुख आचार्य नागार्जुन यांचे चित्र होते, तर डाव्या बाजूला याच विद्यापीठाचे प्रमुख अतिश दिपंकर यांचे चित्र होते. विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार बंद झाल्यावर येणाऱ्यांसाठी या प्रवेशद्वाराबाहेर एक धर्मशाळा होती. विद्यार्थ्यांची येथे मोफत निवास भोजनाची व्यवस्था होती.

या विद्यापीठात परदेशातून तसेच भारतातील विविध भागातून अध्ययनासाठी विद्यार्थी येत. द्वारस्थ आचार्यांकडून परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतरच त्यांना प्रवेश मिळे. तिबेटी भिक्षु येथे अध्ययन करुन संस्कृत ग्रथांचा तिबेटी भाषेत अनुवाद करीत. विद्यापीठीय परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यास पंडित, महापंडित इत्यादी पदव्या राजदरबारात देण्यात येत व अशा पंडितांना राजपंडित हे बिरुद मिळे. अशा प्रख्यात राजपंडितामध्ये आचार्य रत्नकीर्ती, जेतारी, ज्ञानश्रीमित्र, अतीश दीपंकर, रत्नवज्र, वागीश्वरकीर्ती इत्यादींचा अंतर्भाव होता.

येथील ग्रंथालय विशाल व समृध्द होते. बौध्द धर्मातील विविध संप्रदाय, वेद, अध्यात्मविद्या, व्याकरण, न्यायशास्त्र इत्यादी विषयांचे येथे अध्यापन होई. तंत्रमार्गाच्या अध्यापनावर विशेषतः वज्रयान व सहजपान यावर येथे विशेष भर होता. हे विषय शिकविण्यासाठी प्रशांतमित्र, बुध्दगृहे, बुध्दशांती. राहुलभद्र व पद्माकर घोष यासारखे तांत्रिक आचार्य, कमलशिलासारखे व्याख्याकार, कल्याण रक्षित व शोभव्यूह सागरघोष यासारखे न्यायशास्त्र विशारद होते. या विद्यापीठाची पदवी मिळविणे फार कठीण होते. इ. स. दहाव्या शतकात नालंदा व इतर

विद्यापीठांना मागे टाकून या विद्यापीठाने प्रसिध्दी मिळविली होती. या विद्यापीठाने बौद्ध धर्माचा प्रसार केला.

विद्यापीठाचे प्रशासन महाधीपतीकडे असून त्यांच्या मदतीला सहा आचार्यांचे मंडळ असे. काही काळ नालंदा विद्यापीठाचा कारभारही या मंडळाच्या नियंत्रणाखाली होता. तेथील प्रशासन उत्कृष्ट होते. इ. स. सातव्या आठव्या शतकातील ह्यूएनत्संग (६०२-६६४) व इत्सिंग (सु.६३४-७१३) ह्या चिनी प्रवाशांच्या वृत्तांतातून या विद्यापीठाचे कार्य व प्रगती याबाबत माहिती मिळते.

इ.स. ११९२ मध्ये महमद बिन बख्तियार (खिल्जीघराणे) याने मगधाचा पाल राजा गोविंद याच्यावर स्वारी केली आणि त्याची राजधानी औदंतपुरी जिंकून घेतली. पुढ थोडयाच वर्षांने त्याने नालंदा, औदंतपुरी तसेच विक्रमशिला विहार भोवतालच्या भिंती किल्ल्याचा तट वाटल्यामुळे त्यावर हल्ला करुन त्याने संपूर्ण ग्रंथालय जाळले व तेथील ब्राम्हणांना व बौध्द भिक्षुना कंठस्नान घातले. परंतु येथील विद्वानांनी मिळविलेल्या पदव्या नष्ट होऊ शकल्या नाहीत.

### २.४ वल्लभी विद्यापीठ:

गुजरात राज्याच्या भावनगर जिल्हयातील वल्लभी येथे हे प्राचीन विद्यापीठ इ. स. सातव्या शतकात स्थापन झाले. वल्लभी हि मैत्रक राजांची (४६५-७७५) राजधानी असल्याने या विद्यापीठाची स्थापना व संवर्धन यांचे श्रेय मैत्रक राजांना दिले जाते. विद्येचे माहेरघर व आंतरराष्ट्रीय व्यापार असलेले बंदर असा वल्लभीचा नावलौकिक असल्याचा उल्लेख काश्मिरी पंडित सोमदेव याच्या कथा सरित्सागरात व मैत्रककालीन ताम्रपटात आढळतो.

वल्लभी विद्यापीठात बौध्द, जैन इ. धर्माचे अध्यापन होत असले तरी प्रामुख्याने हीनयान पंथाचे विद्यापीठ समजले जाते. पूर्व भारतातील नालंदा विद्यापीठाशी याचे साम्य असून त्या काळी त्याची कीर्ती दूरवर पसरली होती. जैन व बौध्द आचार्यांनी येथे धर्मप्रसारार्थ विहार बांधले. त्या काळी जैन धर्मग्रंथ लिपीबध्द नव्हते. जैन आचार्यांनी धर्मप्रसाराचे त्यांचे सिध्दांत लिपीबध्द केले. वल्लभी येथे सुमारे इ. स. ४५४ मध्ये पार पडलेल्या जैनधर्म परिषदेत ८४ ग्रंथाना मान्यताही लाभली असे म्हटले जाते.काही गावांच्या उत्पन्नातून केले जाणारे अर्थसाहाय्य व विद्यापीठास लाभलेला राजाश्रय यामुळे जैन धर्माचे शिक्षण उपलब्ध होऊ लागले.

या विद्यापीठातील अध्यापन पध्दतीत पाठनिर्देश व व्यावसायिक शिक्षण यांना विशेष महत्त्व देण्यात आले होते. यापैकी पहिल्याचा प्राथमिक शिक्षणासाठी तर दुसऱ्याचा उच्च शिक्षणासाठी उपयोग केला जाई. विविध विषयांचे प्रात्यक्षिकही करून दाखविण्यात येत असे. कला, अध्यात्मविद्या, तर्कशास्त्र, वैद्यक इ. विषयांना अध्यापनात स्थान असे. धर्मशास्त्राशिवाय वेदांगे, इतिहास, तत्त्वज्ञान, ज्योतिर्विद्या, भूगोल, अंकगणित, धातुविज्ञान, नीतीशास्त्र, व्रत, चिकित्साशास्त्र इत्यादींचे अध्यापन केले जाई. प्राकृत व संस्कृत हे अध्यापनाचे माध्यम असे. शिक्षण मोफत दिले जाई.

येथील कलासंस्था व विहारस्थाने ही अध्यापनाची प्रसिध्द केंद्रे होती. कलासंस्थात प्राथमिक, माध्यमिक शिक्षणासोबत उपयुक्त कला, सैनिक प्रशिक्षण, बौद्धिक व शास्त्रीय अध्यापन केले जात असे.

विहारात विद्वान भिक्षु निवास करुन ज्ञानदान करीत. नालंदा विद्यापीठात अध्ययन केलेले स्थिरमती व गुणमती हे वसुबंधूचे शिष्य या विद्यापीठाचे प्रसिद्ध कुलपती होते. चिनी प्रवासी ह्यूएनत्संग याने आपल्या प्रवासवृत्तात नमूद केल्यानुसार वल्लभी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या १०० बौध्द विहारांत सुमारे ६००० अनुयायी अध्ययन करत होते. येथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना द्वारपरीक्षा द्यावी लागे. या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्यांच्या डोळ्यातून वाहिलेल्या अश्रूंचा तेथे नेहमी चिखल असे, अशी प्रशस्ती इत्सिंग देतो.

विहारात श्रीमंत व गरीब असा भेदभाव केला जात नसे. समान संधीचा सर्वांना लाभ होई. विहारातील विद्यार्थ्यांची साधी राहणी व उच्च विचारसरणी असून शांतता, शिस्त इ. सर्वसाधारण आचार-नियम त्यांना पाळावे लागत.

विहारात ग्रंथालयांचीही सोय होती. विहारांत अध्ययन पूर्ण केल्यावर विद्यार्थी राजदरबारी वर्णी लावून धर्मसिध्दांत, तत्त्वज्ञान यावरील चर्चेद्वारे आपली योग्यता सिध्द करीत व नंतर राजदरबारात अधिकारी म्हणून नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करीत, असे इत्सिंग ह्या चिनी प्रवाशाने आपल्या प्रवास वृत्तात नमूद केलेले आढळते.

### ३. शिक्षणाची इतर केंद्रेः

गुरुकुल आणि विद्यापीठांशिवाय राजधानीची नगरे, तीर्थक्षेत्रे, बौद्धविहार, मठ व अग्रहार ग्राम ही सुद्धा शिक्षणाची केंद्रे होती. बौद्ध व जैन विहारांतून भिक्षू व सामान्य जन यांना शिक्षण दिले जाई. हिंदूच्या मंदिरांतून पाठशाळा चालविल्या जात. विविध विषय शिकविण्यासाठी देवळांना इनामे व निधी दिले जात. राजे स्वतःच विद्वान असल्याने ते अनेक विद्वानांना आश्रय देत. अनेक श्रीमंतांनी संपत्तीचे विश्वस्तनिधी उभारून शिक्षणसंस्था स्थापन केल्याचे उल्लेखः दानपत्रांतून आढळतात. विशेषतः दक्षिणेतील प्रशस्त मंदिरांतून हे विद्यादानाचे कार्य फार समाधानकारकपणे चालविले जाई. राजधानीतील राजसभेत अनेक विद्वान असत. या विद्वानांकडे विद्यार्थी ज्ञानप्राप्तीसाठी येत असत. उज्जयिनी, मिथिला, तक्षशिला, पाटलीपुत्र, वाशीम, बदामी, कल्याणी, कंधार, वेरूळ, कनोज व मगध ही प्राचीन काळात शिक्षणाची केंद्रे होती. अग्रहार गावे प्राचीन काळात शिक्षणाची केंद्रे असत. राजे-महाराजे लोक आपल्या राज्यातील विद्वानांना अनेक गावे दान देत असत. दान म्हणून दिल्या गेलेल्या अशा गावांनाच अग्रहार म्हणत असत. ब्राह्मण विद्वान अशा गावाच्या उत्पन्नावरच उपजिविका करीत असत. विद्वान लोक अशा अग्रहारात कायमस्वरुपी राहत असत. त्यामुळे अनेक विद्यार्थी अग्रहार गावामध्ये शिक्षणासाठी येत. इ. स. च्या सहाव्या शतकानंतर दक्षिण भारतात चालुक्य, राष्ट्रकूट व यादव यांच्या राज्यात शिक्षणासाठी अग्रहार गावे ब्राह्मणांना दिलेली असत. चालुक्याच्या लेखातून महाघटिका स्थानाचा (महाविद्यालय) उल्लेख आढळतो. प्रतिष्ठान, नाशिक व दक्षिणेतील कांची ही प्राचीन काळातील महत्त्वाची शिक्षण केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आलेली होती. सामान्य जनांनादेखील मंदिरांतील पुराण, कीर्तन, प्रवचन याद्वारे भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली जाई. मंदिरांतील शिल्पकला म्हणजे पौराणिक धर्माचे दृकशिक्षणच होते. दक्षिणेकडे वेगवेगळ्या आचार्यांच्या मठांतून व घटिकांतून शिक्षण देण्याचा व्यवस्था असे. ग्रामसभा, नाडुसभा यादेखील शिक्षणासाठी निधी पुरविण्याची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडीत. या काळात व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या स्वतंत्र संस्था नव्हत्या व त्यांची गरजही भासत नसे. व्यवसाय वंशपरंपरागत चालत असल्याने प्रत्येक धंद्यातील कसब जुन्या पिढीकडून नवीन पिढीला घरच्या घरीच मिळू शकत असे. एकत्र कुटुंबपद्धतीचाही या कामी चांगला उपयोग होई. पुष्कळदा धंद्यामध्ये दुसऱ्याच्या हाताखाली उमेदवारी करून व्यवसायाचे ज्ञान मिळे. अशी उमेदवारी करीत असताना केलेल्या कामाचा मोबदला विद्यार्थ्यास देण्यात येई.

भारतीय शिक्षणाचे सुपरिणाम भारतीयांच्या जीवनात पाहावयास मिळतात. भारतीयांबद्दल लिहिताना ह्यूएनत्संग म्हणतो: ''ब्राह्मण व क्षत्रिय निर्दोष व निर्दंभ, शुद्ध व सात्त्विक चारित्र्याचे व मितव्ययी आहेत. सामान्य जनांबद्दल बोलावयाचे तर, जरी ते स्वभावतःच थोडेसे अविचारी असले, तरी प्रामाणिक व उदार असतात. पैशाच्या बाबतीत त्यांच्यामध्ये कोणताच कावा नसतो व न्याय देण्याच्या बाबतीत ते दयाळू आहेत, त्यांचे वर्तन कपटी वा विश्वासघातकी नाही. आपल्या शपथेशी व वचनाशी ते प्रामाणिक असतात. ''

# स्त्री शिक्षण

कु.ज्ञानेश्वरी अरविंद नाईकवाडी,
इ.१२ वी, कला

"स्त्री म्हणजे वात्सल्य, स्त्री म्हणजे मांगल्य,
स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे कर्तृत्व..."

एक सभ्य आणि सुशिक्षित समाज त्या देशातील शिक्षित नागरिकांमुळे होतो. असे मानले जाते की, एका पुरुषाला शिक्षित केल्याने एकच व्यक्ती शिक्षित होतो, तर एका स्त्रीला शिक्षित केल्याने संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. स्त्री कुटुंबाचा केंद्रबिंदू असते. ती आईच्या रूपात आपल्या मुलांना संस्कार देते. देशाच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीसाठी पुरुषांसोबत स्त्रियांनाही शिक्षित करणे महत्त्वाचे आहे.

भारतात आज सर्व क्षेत्रात स्त्रिया पुरुषांबरोबरच्या बरोबरीने काम करत आहेत. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया कार्यरत आहेत. परंतु आजही जर आपण भारताची तुलना इतर विकसित देशांची केली, तर आपल्या लक्षात येईल की महिलांना शिक्षित करण्यात आपण किती मागे आहोत. शिक्षण आयुष्यात खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणाने बुद्धीचा विकास होतो आणि सोबतच ज्ञान देखील वाढते. खरे पाहता शिक्षण हीच मूर्खाला विद्वान बनवते. शिक्षणाला वाघिणीचे दूधही म्हटले जाते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणायचे, "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. पुस्तक वाचा, शिक्षण घ्या कारण पुस्तक वाचल्याने मस्तक सुधारतं आणि सुधारलेलं मस्त कुणापुढेही नतमस्तक होत नसतं" म्हणूनच गरज आहे शिक्षणाची.

जरी आज प्रत्येक गावागावात शिक्षण पोहोचले आहे, तरीही देशातील काही ठिकाण अशीही आहेत जेथे स्त्रियांना शिकवणे व्यर्थ मानले जाते. त्यांना फक्त चूल आणि मूल सांभाळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. अशिक्षित महिलेपेक्षा एक शिक्षित महिला जास्त सक्रिय पद्धतीने कुटुंबाला सांभाळते. शिक्षित महिला तिच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला जबाबदार बनवते. ती तिच्या मुलांमध्ये चांगल्या गुणांचा संचार करते, कशा पद्धतीने एक शिक्षित महिला संपूर्ण कुटुंब आणि समाजाला शिक्षित करते म्हणून स्त्री शिक्षणाकडे अधिकाधिक लक्ष द्यायला हवे. स्त्री शिक्षण म्हटल्यावर स्त्री शिक्षणाची निर्माती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना विसरून कसे चालेल. ज्यांच्यामुळे स्त्रिया या आज आकाशात उंच झेप घेऊ शकल्या, त्यावेळी जर सावित्रीबाईंनी स्त्रियांना शिकवले नसते, तर कदाचित आजही स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असूनही त्यांना शिक्षणापासून दूर राहावे लागले असते, म्हणूनच त्यांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. स्त्री शिक्षणाचे अनेक फायदे आहेत. शिक्षण प्राप्त करून स्त्रीमध्ये आत्मविश्वास आणि आत्मसन्मान निर्माण होतो. याशिवाय महिलांना शिक्षित केल्यावर कुटुंबाला त्याचे फायदे होतात. शिक्षित महिला नोकरी करून आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करू शकते. शिकलेली स्त्री आपल्या मुलांना कधीही अशिक्षित राहू देणार नाही. लहानपणापासूनच ती आपल्या बाळामध्ये सद्‌गुणांचा संचार करील. आज भारत हा स्त्री शिक्षणात नित्य प्रगती करीत आहे. भारताचा इतिहास अनेक शूरवीर महिलांनी भरलेला आहे.

घरातील चुलीपासून बाहेर निघून व्यवसाय, साहित्य, प्रशासन, पोलीस, सैन्य, खेळ इत्यादी क्षेत्रांमध्ये महिला पुढे आल्या आहेत. आजच्या इंटरनेटच्या युगात अनेक महिला घरची कामे सांभाळीत मोबाईलवर ऑनलाईन शिक्षण प्राप्त करीत आहेत. देशाच्या उज्वल भवितव्यासाठी स्त्रियांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने घ्यायला हवी. सोबतच जुन्या शिक्षण पद्धतीत बदल करून नवनवीन गोष्टी अभ्यासक्रमात सामील करायला हव्यात.

"थेंबा थेंबा मधून येथे, सामर्थ्याचा सागर व्हावा,
विश्वाच्या कल्याणासाठी, स्त्री शिक्षणाचा जागर व्हावा..."

# पुस्तक परिक्षण

# ताई मी कलेक्टर व्हयनू

लेखक : श्री.राजेश पाटील

पुस्तक परिक्षण : कु.साक्षी शांताराम वाक्चौरे, तृतीय वर्ष, विज्ञान






आपल्याला जर एखादी गोष्ट मिळवायची असेल तर, त्यासाठी आपल्याला आधी संघर्ष हा करावाच लागतो. कोणती गोष्ट स्वतः आपल्याजवळ येत नसते, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे एका खेडेगावातील खूप गरीब व कष्टाळू असलेला राजेश नावाचा मुलगा हा आहे.

एका छोट्याशा घरातील जन्माला आलेला हा मुलगा होता. त्याचबरोबर त्याची आई वडील व त्याच्या तीन बहिणी असा छोटासा त्यांचा परिवार होता. लहानपणापासूनच घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आपल्याला जीवन जगायचे असेल तर शिकलेच जावे लागेल . त्याचबरोबर शेतातील कष्ट करण्याची क्षमता देखील त्यांच्यामध्ये असल्याने, त्यांनी कोणतेही काम करण्यात कधीच माघार घेतली नाही. लहानपणापासूनच त्यांचे वडील व त्यांची आई जिला ते प्रेमाने आई असे बोलत होते हे पण आधीपासूनच शेतात काबाडकष्ट करत असत, असे ते सांगतात. त्यांची ताई देखील खूप कष्ट करत असे, का तर तेव्हा आर्थिक परिस्थिती नीट नव्हती . त्याच बरोबर त्यातून आपली रोजी रोटी भागली पाहिजे व उरलेच तर माझे शिक्षण देखील असा त्यांचा हेतू असायचा. लहानपणापासून अक्का ताई मोलमजुरी करत असत.

पण कधी कधी माझे मन हे कष्ट करायला नाही म्हणायचे, मग मी माझ्या सवंगड्यांसोबत खेळायला जायचो. पोरांसोबत नदीवर मासे पकडायला जायचे, असे अनेक खेळ खेळत मी मोठा होत गेलो . मला ताई -अक्का कायम सांगत अशा पोरांसोबत खेळत जाऊ नको, पण मी कधी ऐकली नाही व माझा हट्टपणा सोडला नाही. पण त्याच बरोबर मला नंतर समजू लागले व माझे लक्ष अभ्यासाकडे दिले व चांगल्या मार्कांने दहावीत उत्तीर्ण झालो व त्यानंतर एचएससी बोर्डात पण पास झालो. त्यातून त्याला एक निश्चित दिशा गवसत गेली व आपल्याला काहीतरी करून दाखवायचे अशी जिद्द त्यांनी ठरवली.

त्यांनी त्यानंतर घरची परिस्थितीकडे बघून बी.एस्सी. मध्ये प्रवेश घेतला व त्याला अभ्यासाबरोबर स्पर्धा परीक्षांचा देखील अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यातून यश मिळवले म्हणजे, ही पदवी प्राप्त केली . जीवनात अपयशाचे मार्ग येतात, पण त्यात माघार न घेता यशाचा पाठलाग करून यश मिळवलेच याचे उत्तम उदाहरण आहे.

जीवनाकडे आणि समाजाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे हे राजेश पाटील यांची व्यक्तिमत्व होते त्यांनी त्यांच्या जीवनात यश मिळवण्याची कारणच ते होते की न खचता, न डगमगता, अपयशाला न घाबरतात ते पुढे पुढे जात राहिले. त्यांनी कष्टाची लाज न बाळगता त्यांनी अभ्यासा बरोबर कष्ट करून आपली अनुकूल असे मोल त्यांनी मिळवले. त्या परिस्थितीच्या झळा आपल्याला खूप काही अनमोल धडा शिकून जातात.

त्यांना या गोष्टीतून खूप काही चटके बसले असतील, पण त्या चटक्यांनी ते शेकून निघले, म्हणजे एका परिस्थितीत सोबत संघर्ष करत, यश पत्कारत ते पुढे चालले होते. मोठमोठ्या थोर महात्मांमुळे त्यांच्यावर सामाजिक दृष्ट्या दृढ संस्कार मिळालेले होते, म्हणजेच त्यांना वाचण्याची खूप आवड होती. म्हणून त्यांना जिथे कुठे कोणतेही पुस्तक वाचायला मिळाले तर ते आवर्जून वाचत असत. आजच्या विद्यार्थ्यांना काही गोष्टी माहित नसतात, मग त्या माहीत करून घ्यायला त्यांना मोठ्या महात्म्यांची / थोर पुरुषांची व त्याचबरोबर आजच्या समाजात काय करावे, वाचन कसे करावे, हे राजेश पाटील यांनी योग्य भाषेत समजावून सांगितले आहे.

हे सर्व सांगताना त्यांनी कधी स्वतःच्या व कौटुंबिक जीवनाचा विचार नाही केला तर,त्या समस्या कशा सोडण्यात येतील यावर मार्ग शोधायचा प्रयत्न करत असे. अपयश ही यशाची पहिली पायरी असते. त्यात माघार न घेता पुढे जात राहायची संकल्पना त्यांनी मांडली.

या सर्व त्यांच्या अनुभवामुळे त्यांचा देवावरील विश्वास नाहीसा झालेला होता. त्यांनी एवढेच सांगितले की, जीवनात यशाकडे जायचे असेल तर स्वतः कष्ट करून मिळवायचे ,देवावर सोडून तुम्ही काही न करता तो आपोआप थोडी मिळणार आहे. त्यातून आपल्याला मार्ग देखील हा नंतर नक्कीच.

एका खेडेगावातील मुलगा, त्याच्या घरच्या परिस्थितीला तोंड देत,आपल्या यशाच्या मार्गाकडे झुंजारत, संख्याशास्त्र या विषयांमध्ये विद्यापीठात पदवूत्तर शिक्षण घेतो व तेथील विद्यापीठातील ग्रंथालयात अभ्यास करत असतो . त्यातूनच तो आयएएस होतो, ही आश्चर्यचकित करणारी गोष्ट आहे.

असे राजेश पाटील यांसारखे असे खूप विद्यार्थी आहे, जे की पुढे जाऊन खूप काही करू शकतात, पण ते प्रयत्न करत नाही, माघार घेतात व यशाकडे जाण्यापर्यंत पोहोचत नाही, असे विद्यार्थी आयुष्यात नेहमी प्रयत्नशील राहावेत, असे ते म्हणतात. शिक्षणाबरोबरच आपण एखादा व्यवसाय देखील करावा. त्यामुळे सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीवर आधारित शैक्षणिक सोयी सुविधांचे व्यवहार होणार नाहीत.

# तेथे जीवाणू जगती

लेखक : प्रा. म. वि. दिवेकर

पुस्तक परिक्षण : कु.मोहिनी दिलीप गुंड, द्वितीय वर्ष वाईन टेक्नॉलॉजी




विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र विभागात नोकरी करणारे (प्रा. म. वी. दिवेकर) यांनी लिहीलेल १२८ पानांच ''तेथे जीवाणू जगती'' ह्या पुस्तकाने आपल्याला बहुमोल संदेश दिला आहे. आजकालच्या विज्ञान युगामध्ये माणसाने भरपूर शोध लावले पण अजूनही काही अशाही गोष्टी आहेत, ज्या की, आपल्याला माहितच नाही. तेथे जीवाणू जगती या पुस्तकात लेखकाने 'हिमकेशी' वटवृक्ष व ग्रीन जीवाणू यांचे वर्णन केले आहे, जे की वाचकांचे लक्ष वेधून घेतात. हिमकेशी म्हणून लेखकाने 'कॅक्टस' जातीच्या वनस्पती विषयी लिहिले आहे. ही वनस्पती दिसायला सुंदर व दुर्मिळ अशी पण दीड- दोन इंच लांबीचे काटे असणारी आहे.

या वनस्पतीला 'हिमकेशी' असेही म्हणतात. कारण ती हिमालयात सापडलेली व केसासारखे बारीक काटे असणारी आहे. ही हिमकेशी नावाची वनस्पती रक्त शोषून घेणारी आहे म्हणूनच ह्या वनस्पतीला रक्तपिपासु व ब्लड सकर असे समजायचे. सर्वसामन्यांच्या दृष्टीने वनस्पतिंना काहीच महत्व नाही पण लेखकाने संशोधक म्हणून या वनस्पतीचा शोध घेणे महत्वाचे होते. हिमालयात बर्फाखाली दडून राहिलेली ही काटेरी वनस्पती रक्तपिपासू वनस्पती नव्हती. अतिथंड प्रदेशात बर्फाखालीसुद्धा जगण्याची क्षमता असलेलं एक दुर्मिळ जातीचे कॅक्टस होते. हिमालयात ट्रेकिंग साठी जाणाऱ्या वैज्ञानिकांना पर्वतीय रोगाची लागण व्हायची म्हणून ते कॅक्टस या वनस्पतीला ब्लडसकर समजायचे. ते या वनस्पतीचा मुळापासून नाश करायला निघाले होते.

तृष्णा विषयी लिहिताना लेखकाने ''एका वटवृक्षाविषयी सांगितले आहे जो की, पाणी नसल्यामुळे आपली तहान दुधावर भागवतो आहे. पण दुध हे वटवृक्षासाठी हानिकारक आहे, कारण दुधामधले अनावश्यक घटक वटवृक्षाच्या शरीरामध्ये साचून राहतील, वाढायला लागतील व वटवृक्षाचे संतुलन बिघडवून टाकतील.'' मानवाने प्रगल्भ बुद्धिमत्तेच्या जोरावर स्वत:साठी निसर्गाचा हवा तसा उपयोग करून घेतला आणि त्याचमुळे निसर्गाचं संतुलन बिघडून इतर जैविक घटक दुखावले गेले. मानवाइतकाच श्रेष्ठ असा घटक वनस्पती आहे. कारण त्या स्वयंजीवी असतात. स्वत:चे अन्न स्वतः तयार करण्याची निसर्गाने त्यांना देणगी दिलेली आहे. मानवा इतकीच वनस्पतींनाही पाण्याची आवश्यकता असते. पाणी मिळवण्यासाठी वनस्पतीची मुळे जमिनीमध्ये हालचाल करीत असतात. पाणी कमी होण्याची कारणे मानवाच्या चुकीच्या वागण्याने निर्माण झालेली आहेत, कारण निसर्गाचं संतुलन एका बाजूला मानव अव्याहतपणे मोडकळीस आणतो आहे आणि त्या वेळी जमिनीतलं पाणी तो येनकेन प्रकारे काढून घेतो आहे. वटवृक्षाने घातलेल्या

हैदोसामुळे व त्याची तहान भागवण्यासाठी, त्याला पाणी पुरवणे आवश्यक होते. म्हणून हजारो हातांच्या श्रम दानाने, घामाने, बायका पोरे, पुरुष, सगळ्यांच्या सहकार्याने बंधाऱ्याचे काम झाले. पावसाळ्यात पडलेल्या पावसाच्या पाण्याने बंधारा तुडूंब भरला व नवीन उमलू पाहणाऱ्या जीवांची तहान भागवता आली. जीवाणू विषयी लेखकाने आपले मत मांडताना एका अश्या जीवाणू चे वर्णन केले आहे.

जो जीवाणू दुधाचे दह्यात रुपांतर करणाऱ्या लाक्टोबासीलस नावाच्या बॅक्टेरीया व मृत शरीराचे डीकंपोझीशन करणारे जीवाणू यांना मारत आहे. एवढेच नव्हे तर इतरही जीवाणू हे ग्रीन नावाचे जीवाणू मारत आहे. या जीवाणूंनी देशाचे संतुलन बिघडवले होते, म्हणूनच या जीवाणूंना कंट्रोल करणे महत्वाचे होते पण त्यासाठी अगोदर हे जीवाणू आले कोठून याचा शोध घ्यावा लागणार होता.

कीटकांच्या शरीररचनेचा अभ्यास करताना संशोधकांना त्यांच्या पोटाच्या भागात एक पोकळी सापडली. याच पोकळीमध्ये जीवाणू सापडले. आणि याच जीवाणूंना जिवंत केले. हेच जीवाणू म्हणजे ग्रीन जीवाणू होते. पुढे हे जीवाणू शेकडोने वाढायला लागले. हे जीवाणू स्वतः चे अन्न स्वतः च तयार करत होते. यांना फक्त सूर्यप्रकाश पुरेसा होता. यांचा रंग हिरवा होता म्हणून यांना ग्रीन जीवाणू म्हणत होते. ह्या बॅक्टेरिया मुळे देशात खळबळ माजली. पण देशात तज्ञ बुद्धिमान वैज्ञानिकारांचा तोटा नाही. विज्ञानाची झपाट्याने प्रगती होत आहे. त्यामुळे या जीवाणूंना नियंत्रित ठेवण्यासाठी उत्तर सापडू शकत होते.

या जीवाणूंना नियंत्रित ठेवण्यासाठी संशोधकांनी स्वतः असे ग्रीन जीवाणू बनवले जे की अगोदरच्या जीवाणूंना शक्तिहीन करून स्वतः शक्तिहीन होणार होते, आणि हे जीवाणू सुप्तावस्थेत जातील व सध्याच्या कोणत्याच प्रक्रियेमध्ये ते भाग घेणार नाहीत. अगदी सहज व सोप्या भाषेत लेखकाने आपण वनस्पतीची कशी काळजी घ्यावी, ती आपल्यासाठी किती महत्वाची आहेत हे पटवून दिले आहे. जसे माणसामध्ये जीव आहे तसे वनस्पतीमध्ये मध्ये पण जीव आहे. त्यांना पण तहान लागते, त्यांना पण भूक लागते. वनस्पती आहे, म्हणूनच माणूस आहे. जे आपल्याला जगण्यासाठी प्राणवायू देतात. झाडांना जर पाणी घातले तर ते पण आपल्याला भरभरून त्यांचे सर्वकाही देतात. ते निस्वार्थी असतात. आपल्या भोवताली असलेले कुठलेही झाड आपल्यासाठी त्रासदायक नसते फरक फक्त एवढाच आहे की, आपल्याला त्या झाडाची पूर्णपणे माहिती नसते, हे पुस्तक वाचून माझे काट्याच्या झाडाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला.

इतरत्र असलेले लाखो सूक्ष्मजीव जे की आपल्यासाठी काही चांगले व काही वाईट, काही आपल्याला जीवनदान देतात. तर काही आपला जीव घेतात. सृष्टीचे कामकाज व्यवस्थीत पद्धतीने चालविणे याचा एक भाग सूक्ष्मजीव आहे. दुधाचे दह्यात रुपांतर करण्यापासून ते माणसाचे शरीराची विल्हेवाट लावण्यापर्यंत हे सूक्ष्मजीव काम करत असतात. सूक्ष्मजीव नसते तर कदाचित हे जीवन जगणे कठीण असते असे मला वाटते. या पुस्तकामधून मी खूप काही शिकले. सूक्ष्मजीवा विषयी माहिती मिळाली. वडाच्या झाडाविषयी वाचताना इतरही झाडांची कशी काळजी घ्यावी हे समजले. या पुस्तकामुळे मला एक नवीन प्रेरणा मिळाली.

# Wings of Fire

An Autobiography of Dr.A.P.J.Abdul Kalam by Abdul Kalam with Arun Tiwari

## Book Review : Pratiksha Gangaram Dethe , S.Y.B.Sc

"Wings of fire" is the autobiography of the former president of india and the missile man of india, Dr.A.P.J.Abdul Kalam.It was written by A.P.J Abdul kalam and Arun Tiwari.

In this book,Dr.Abdul Kalam shares his journey from humble beginnings and challenges he faced in his personal and professional life. This book is just a masterpiece of inspiration and motivation for those who want to do something extraordinary in their life and that's why I chose this book for the book review.

The book "Wings Of Fire" is a story of Dr.A.P.J.Abdul Kalam journey from a small town in tamil nadu to becoming the president of india .In this book,the former. president Dr.Abdul Kalam shares his personal experiences and minutest details of his life. It narrates his life,right from the former late president's rise from childhood to his vision for the country in the year 2020.

It has been divided into four parts .The first part narrates his early life that includes his parents, teachers and other influential role models. The second part deals with Dr.Kalam's further education, work experience and his involvement with projects. The third and fourth parts are about his ISRO career and the last phase of his life,where he was bestowed upon with several awards and honours In such a way in this book Dr.Kalam talks about his early life, effort,hardship,luck and chance that led him to become the frontman of Indian space research,nuclear and missile programs.




Wings of fire: An Autobiography of Dr. A.P.J Abdul Kalam. This story sheds light on the journey of young boy from rameswaram to become a renowned scientist. The book is divided into four parts, each covering a different stage of his life.

1. Orientation
2. Creation
3. Propitiation
4. Contemplation

The first part of book i.e "Orientation"

introduces to kalam's childhood and early education. In the beginning ,he introduces us to his family and tries to familiarize us with his birthplace rameswaram. In childhood,he was a great admirer of his father,jainulabdeen.He was a man of great wisdom and kindness.and pakshi lakshamana sastry, a close friend of his father and head priest of the rameswaram temple. He was also influenced by his close friend Ahmed Jalaluddin; He was about 15 years older than kalam with his friend. he talked about spiritual matters.. This shows that he believed in spirituality and also believed in god.He completed his school education in rameswaram elementary school and in 1950 he joined St. Joseph's college, trichi to study for BSc degree but he realized physics was not his subject. Then he applied to madras institute of technology. But he or his family could not afford to spend that much money on the course .Kalam grew up in a humble family and faced many challenges in pursuing his education.However he remained determined to succeed and went an to study aerospace engineering.

The second part of the book "Creation" focuses on Dr.Kalam's career as a scientist and his contribution to india's space and missile projects. The "Creation" section of this book covers kalam's life and work for 17 years ,from the year 1963 until 1980.It starts with his recollection of works at the Langley research NASA in Houston,Virginia U.S and at other facilities in U.S, including the wallops flight facility at wallops island in east coast of U.S,at a NASA facility.He remebers to have seen a painting prominently displayed in the lobby. The painting depicted a battle scene with a rocket flying in the background. On closer examination ,he found that the painting depicted Tipu sultan's army fighting the british .Kalam felt overjoyed to see an Indian glorified in NASA as a hero of rocketry warfare. His association with satellite launch vehicle and related projects are vividly presented in the creation, kalam ;in the year 1976,lost his father who lived up to 102 years of age and despite suffering such a lot of suffering,but he continued his mission journey without fear and hesitation.

The third part of the book "Propitiation" reflects on kalam's spiritual and philosophical beliefs .He discusses the importance of spirituality in his life and how it helped him through difficult times and also the section propitiation covers the period 1981 to 1991. This section covers the scientist's journey towards becoming the missile man of india. In this section,his excellent leadership qualities as taking up the responsibility of shaping up the guided missile development program are clearly visible. In this phase of life, kalam was responsible for the developement of 5 missiles -Prithvi, Trishul, Akash,Nag,and Agni.

The fourth and last part of the book is "Contemplation" looks back on kalam's life and the lessons he learned along the way. He shares his thoughts on leadership, education and the role of science and technology in society. After many struggle kalam gets appointed as director in DRDL in 1982 .Anna university,madras confers the honorary degree of doctor of science

on him .With the successful development of ballistic missiles. He gains the title of Missile man of india and The government of india honoured him with Padma Bhushan on 26 January 1981. He attains many honours and awards for his performance and talk about his dream for year 2020.

"Wings of fire" is not just a story of A.P.J Abdul Kalam's life, but it is also a source of inspiration for millions of people around the world. His life story teaches us that with hard work, determination and dedication .We can achieve anything we want in life. Kalam's message is a reminder that we should never give up on our dreams, no matter how difficult the journey may be.

"Wings of fire" is an outstanding autobiography that offers a compelling and insightful look into the life of Dr. A.P.J. Abdul Kalam. Wings of fire is fascinating and inspiring book that a definitely worth reading. It offers a unique perspective on Indian history and culture as well as valuable lessons on leadership and personal growth and also Kalam says, we all are born with a divine fire in us. Our efforts should be to give wings to this fire and fill the world with glow of its goodness. And that's why this story of book give us to a very inspiring message to young generation or Indian youth and reminders that, the obstacles are temporary and you all are surmountable this obstacles without any fear and complete your dream.No matter your family background and money issues you just focus on your goals with a positive attitude or positive thinking because all problems are solved in life.

# श्यामची आई

लेखक : साने गुरुजी

पुस्तक परिक्षण : कु.अवधुत गोरक्षनाथ नवले, तृतीय वर्ष वाणिज्य

श्यामची आई हे पुस्तक साने गुरुजींनी लिहिलेले आहे. साने गुरुजींनी लिहिलेले हे पुस्तक खऱ्या अर्थाने अमूल्य आहे. या पुस्तकात आईच्या प्रेमाचे आणि त्यांच्या बलिदानाचे महत्वाचे संदेश आहेत. हे पुस्तक वाचून वाचकांचे डोळे व ह्रदय भरून येईल. या पुस्तकात मातेचा महिमा आहे. हे पुस्तक मराठी भाषेतील अक्षरधन ठरले आहे. या पुस्तकात माय-लेकरातील प्रेम व संस्कारांच्या ह्रदयस्पर्शी आठवणी आहेत. या पुस्तकात आईचे आपल्या जीवनातील स्थान, तिच्या शिकवणींचे महत्त्व, आणि तिच्या कष्टांची जाणीव करून देणारे संदेश आहेत.

हे पुस्तक ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील कोकणातील ब्राह्मण कुटुंबातील साने गुरुजींचे आत्मचरित्र आहे. श्यामच्या बालमनावर जे माणुसकीचे संस्कार त्याच्या आईकडून झाले त्या घटना या अजरामर कलाकृतीत कथन केल्या आहेत. सानेगुरुजींनी १९३३ साली नाशिकच्या तुरुंगात अवघ्या पाच रात्रींत हे पुस्तक लिहिले.

फिरते श्यामचे बालपण गरीब पण संस्कारक्षम कुटुंबात घडते श्यामच्या कुटुबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत कठीण असते. वडील फारसे शिकलेले या परिस्थितीत श्यामची आई कुटुंबाची सर्व जबाबदारी सांभाळते आणि त्याच्या पूर्ण जबाबदारी उचलते.

या पुस्तकातून साने गुरुजींनी त्यांच्या आईवर असलेले अपार प्रेम, आदर कृतज्ञता व्यक्त केली आहे आईच्या भूमिकेने तिला नवी ओळख दिली आहे




"श्यामची आई" हे पुस्तक केवळ, साहित्यिक दृष्टिकोनातून नव्हे, तर नैतिक आणि समाजसेवेच्या दृष्टीकोनातूनही महत्वाचे पुस्तक भारतीय साहित्यातील रत्न मानले जाते.

# हिंदी विभाग

प्रा.गोरख इदे
प्रा.गंगाराम साबळे

## अनुक्रमणिका

१ सोशल मिडिया और युवा पिढी - कु.राहुल विठ्ठल मेंगाळ ---------------- ६८
२ लोक संस्कृती - कु. संस्कृती पुंडलिक पथवे ------------------------ ६९

# सोशल मिडीया और युवा पिढी

कु.राहुल विठ्ठल मेंगाळ,
तृतीय वर्ष कला

**प्रस्तावना :**

opportunities with multinational companies. Mastering English not only fosters professional growth but also empowers individuals to succeed in the global marketplace. Ultimately, English serves as a key skill that unlocks countless opportunities for students and professionals worldwide.

# The Digital Dominance of English as a Global Language

**Waghmare Swapnil Dilip**
M.A. II English

**• Introduction**

In today's global society, English functions not just as a means of communication but as a bridge between diverse cultures, nations, and communities. With over 1.5 billion speakers worldwide, it is truly a global language—widely used in education, commerce, diplomacy, science, and digital life.

**• The Rise of English as a Global Language**

English was originally spread through British colonization from the 16th to the 20th centuries across parts of Asia, Africa, America, and Oceania. It became the language of administration, trade, and education in many colonies. Later, the rise of the United States as a superpower in the 20th century further increased the global importance of English, especially in fields like science, politics, economics, and entertainment.

**• Number of Speakers Today**

Today, English is spoken by approximately 1.46 billion people globally. This includes around 380 million native speakers and over 1 billion non-native speakers. English is the official language in over 67 countries and is used as a second or foreign language in more than 100 others.

**• English as a Lingua Franca**

English serves as a lingua franca, allowing people from different linguistic backgrounds to communicate with one another. In international businesses, global conferences, academic research, and diplomacy, English is the common bridge. It unites people in a shared space where ideas, technology, and cultures can be exchanged smoothly.

**• In Education and Research**

English dominates the world of higher education. Top universities around the globe teach in English, and most international academic journals are published in English. More than 60% of global corporations use English as their working language. Knowing English gives students and researchers access to cutting-edge knowledge and increases international job opportunities.

**• Role in Business and Economy**

English is the primary language of global business. Whether it is writing emails, contracts, or attending international meetings, English is the standard. Industries such as aviation, tourism, international law, and technology all rely on English for day-to-day operations. Being fluent in English can provide significant professional advantages.

• Dominance on the Internet and Media

English has a strong presence online. As of 2025, about 49.1% of all websites use English. It is also the top language for digital platforms like YouTube, Instagram, and online news. Around 66% of You Tube content is in English. This gives English speakers greater access to global information, trends, and educational resources.

• Challenges and Criticisms

**Despite its advantages, the spread of English raises certain concerns:**

- Linguistic Imperialism – Smaller local languages are disappearing due to the dominance of English. Experts say a language vanishes every two weeks.
- Inequality in Access – Not everyone has the same chance to learn English. Poorer countries or rural areas may lack quality English education, creating gaps in opportunity.
- Cultural Loss – Over-reliance on English may lead to forgetting native cultures, traditions, and mother tongues.

**• Conclusion**

English is more than just a language. It is a tool that connects billions of people and opens doors to global opportunities. However, as we use and promote English, we must also respect and preserve our local languages and cultures. A balanced approach is essential where English empowers, but does not erase other identities.

A truly global citizen uses English to connect, but never forgets the beauty and richness of their own mother tongue.

# वार्षिक अहवाल

## वरिष्ठ महाविद्यालय

शैक्षणिक वर्ष २०२४-२५

## महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव

प्राचार्य डॉ. भास्कर शेळके

आपले अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय हे महाविद्यालय सुरु झाल्याने ग्रामीण व आदिवासी क्षेत्रांमध्ये शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली. सन् १९७२ मध्ये स्थापन झालेल्या अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे दि.०१/०७/१९७४ रोजी अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय स्थापन झाले. या महाविद्यालयात सन् २०२४-२५ सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दि.०१/०७/२०२४ ते दि.०७/०७/२०२४ पर्यंत सप्ताह साजरा करण्यात आला. या सुवर्ण सप्ताहात विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या सर्व इमारतींवर विद्युत रोशणाई करण्यात आली व प्रवेशव्दार फुलांनी सजविण्यात आले. या कालावधीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. माजी प्राचार्य, माजी प्राध्यापक, माजी विद्यार्थी यांचा सन्मान केला. दि.०७/०७/२०२४ रोजी इमारत उद्घाटन, स्मरणिका प्रकाशन आणि संकेतस्थळ उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन महसूल मंत्री तथा आपल्या जिल्हयाचे पालकमंत्री नामदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील, प्रमुख पाहुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. सुरेश गोसावी साहेब, दुसरे प्रमुख पाहुणे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. मनोहर चासकर साहेब, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ मार्गदर्शक माजी मंत्री तथा अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त मा. मधुकरराव पिचड साहेब, स्वागताध्यक्ष माजी आमदार तथा संस्थेचे कायम विश्वस्त मा. श्री. वैभवराव पिचड साहेब, प्रमुख उपस्थिती मा. श्री. गिरजाजी जाधव तसेच संस्थेचे सर्व स्वीकृत विश्वस्त, पदाधिकारी, सदस्य, माजी विश्वस्त, माजी पदाधिकारी, हितचिंतक, नागरिक आणि विद्यार्थी पालक उपस्थित होते. महाविद्यालयाची पन्नास वर्षातील गरुडझेप ध्वनित करणारी स्मरणिका प्रकाशन, संस्थेचे संकेतस्थळ आणि इमारत कोनशीला अनावरण करण्यात आले. फिनिक्स पक्षाप्रमाणे झेपावणारा या महाविद्यालयाच्या उत्कर्षाचा आनंद आहे. दिवंगतांबद्दल कृतज्ञता आहे, सभासदांचे आशीर्वाद आणि विद्यार्थी, पालक वर्गाच्या शुभेच्छांचे साक्षात वटवृक्ष म्हणजे अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे हे आपले महाविद्यालय आहे. सुवर्ण महोत्सवाने सुरुवात करुन आपण अमृत महोत्सव, हिरक महोत्सवाकडे वाटचाल करत आहोत. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या शाखांचा विस्तार झाला. प्रथम कला, वाणिज्य नंतर विज्ञान विभाग जोडला गेला. पदव्युत्तर वर्ग (झ.ऋ) सुरु झाले. पीएच्.डी. रिसर्च सेंटर (झह.ऊ) आणि त्यानंतर इझअ, इउअ, इउड, इ.डल. थळपश, ङीशुळपस रपव अश्रलेहेश्र ढशलहपेश्रेसू असा गुणात्मक विस्तार झाला. याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटतो.

दि.०१/०७/२०२४ रोजी सुवर्ण महोत्सवानिमित्त महाविद्यालयाने गत ५० वर्षात केलेली वाटचाल, विविध क्षेत्रात घेतलेली उत्तुंग भरारी, अनेक गुणवंत व यशवंत विद्यार्थी घडविण्यात दिलेले योगदान, विविध उपक्रम, उपलब्ध सुविधा याला अनुसरुन प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते.

दि.०४/०७/२०२४ रोजी सुवर्ण महोत्सवानिमित्त महाविद्यालयात दिंडी काढण्यात आली. पालखी, रिंगण सोहळा, फुगडी, अभंग म्हणत ढोलकीच्या आणि टाळ मृदुंगाच्या गजरात वारी महाविद्यालयातून काढण्यात आली. याचे नियोजन प्रा. डॉ. रंजना कदम आणि प्रा. डॉ. विजय शेडगे यांनी केले.

दि.०९/०८/२०२४ रोजी महाविद्यालयामध्ये सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून मआदिवासी दिनफ साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात भव्य रॅली काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी आदिवासी पारंपरिक वेशभूषा करुन व विविध घोषणा देऊन आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवून आणले.

मअगस्ति शिक्षण संकुलफअल्पावधीतच साकार होईल, अनेक माजी विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत, अनेकांनी व्यवसाय क्षेत्रात नावलौकिक मिळविला असून महाविद्यालयाचे नाव मोठं करण्यात आपणा सर्वांचे योगदान अनमोल आणि अलौकिक

आहे, यापुढेही महाविद्यालय गरुडझेप घेत राहील, याची ग्वाही देतो आणि थांबतो, धन्यवाद!

*****

## विद्यार्थी मंडळ

प्रा. डॉ. पंकज नाईकवाडी

१) राष्ट्रीय सांप्रदायिक सद्भाव प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्या अंतर्गत महाविद्यालयात दि.१९ ते दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी सांप्रदायिक सद्भाव अभियान सप्ताह आणि झेंडा दिवस साजरा करण्यात आला. फ्लॅग स्टीकरचे विद्यार्थ्यांना वाटप करून प्रती स्टीकर रु.१०/- याप्रमाणे एकूण रु.९,५००/- मदत निधी जमा करुन वरील संस्थेकडे पाठविण्यात आला. ही संस्था निराधार मुलांना मदत करत असते.

२)महाविद्यालयात दि.१८जानेवारी ते ४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये रांगोळी स्पर्धा, कवी कट्टा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, राष्ट्रीय एकता रॅली हे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात राबविण्यात आले.

*****

## विद्यार्थी विकास मंडळ

प्रा. डॉ. किरण जाधव

दि. २९/०७/२०२४ रोजी विद्यार्थी विकास कक्ष, रॅगिंग प्रतिबंध समिती, तक्रार निवारण कक्ष, महिला अत्याचार प्रतिबंधक समिती, समान संधी कक्ष, निर्भय कन्या अभियान, कमवा व शिका योजना समिती, आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला.

*****

## कला मंडळ

प्रा. डॉ. सुनील घनकुटे

जल्लोष युवक महोत्सव आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यातून एका विद्यार्थिनीची विद्यापीठ स्तरावर निवड झाली. सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने दि.१/०७/२०२४ ते दि.०७/०७/२०२४ या कालावधीत विविध कार्यक्रम घेण्यात आले. दि.०७/०१/२०२४ रोजी विविध गुणदर्शन कार्यक्रम ममहाराष्ट्राची लोकधाराफ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

*****

## शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग

प्रा. डॉ. राहुल भोसले

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी हँडबॉल, नेटबॉल, कॉर्फबॉल, सार्फ्टबॉल, बेसबॉल क्रॉसकंट्री व मैदानी स्पर्धा या सारख्या खेळांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केले. यावर्षी आपल्या महाविद्यालयातील १९२ विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत भाग घेतला व दोन विद्यार्थ्यांची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच ३१ विद्यार्थ्यांनी आंतरविभागीय स्पर्धेत व ०४ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेतला. यावर्षी वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व अगस्ति महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरविभागीय बेसबॉल (मुली) व कॉर्फबॉल (मुले व मुली) या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पुणे शहर, पुणे ग्रामीण, नाशिक व अहिल्यानगर या संघांनी भाग घेतला. अहमदनगर जिल्हा विभागीय क्रीडा स्पर्धेअंतर्गत आंतर-महाविद्यालयीन बेसबॉल (मुली) या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. आंतरमहाविद्यालयीन नेटबॉल (मुली) स्पर्धेचे विजेतेपद व नेटबॉल (मुले) स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले. तसेच हँडबॉल (मुले) स्पर्धेचे उपविजेतेचेपद पटकावले. कुस्ती (मुली) क्रॉसकंट्री) (मुली) स्पर्धांत व्दितीय क्रमांक पटकविला.

*****

## राष्ट्रीय सेवा योजना

प्रा. डॉ. शिवाजी खेमनर

वृक्षारोपण, स्वच्छता मोहिम, राष्ट्रीय सेवा योजना दिन, माजी स्वातंत्र्य सैनिक सन्मान, एड्स जनजागृती मोहिम, मतदार जनजागृती मोहिम, राष्ट्रीय युवा दिन, राष्ट्रीय एकता रॅली, युवा ही दुवा, कर्मवीर धान्य संकलन योजना, गणेश मूर्ती व निर्माल्य संकलन

इत्यादी दिन व उपक्रम राबविण्यात आले. पुणे ते पंढरपूर पायी दिंडी मध्ये या योजनेतील स्वयंसेवक व प्रा. डॉ. सुनील मोहटे हे सहभागी झाले होते. दि.१/०१/२०२५ ते दि.०७/०१/२०२५ या कालावधीत तांभोळ येथे मविशेष श्रमसंस्कार शिबिरफसंपन्न झाले.

*****

## राष्ट्रीय छात्र सेना

कॅप्टन डॉ. सचिन पाळंदे

या शैक्षणिक वर्षात छात्र सैनिक अधिकारी व छात्र सैनिकांनी विविध उपक्रमात सहभागी होऊन यश संपादन केलेले आहे. छात्र सैनिकांमधून डणज पदासाठी कु. गोर्डे मयूर बाळासाहेब यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच त्याची विद्यार्थी मंडळाचे एनसीसी प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली आहे. दि.२१/०६/२०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. वृक्षारोपण, मेरी माटी-मेरा देश, हर घर तिरंगा अभियान, रक्तदान शिबीर, स्वच्छ भारत अभियान या उपक्रमात राष्ट्रीय छात्र सेना स्वयंसेवक सहभागी झाले. तसेच २६/११ शहीद स्मारक दिन, राष्ट्रीय संविधान दिन, एक दिया शहीदो के नाम, एकता आणि संप्रदायिकता दिवस, ग्रंथ दिंडी, राष्ट्रीय छात्र सेना दिवस, पुलवामा हल्ला, काळा दिवस या उपक्रमात राष्ट्रीय छात्र सेना स्वयंसेवक सहभागी झाले.

दि.२७/०४/२०२४ रोजी अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कायम विश्वस्त माजी आमदार मा. श्री. वैभवराव पिचड साहेब यांचे जन्मदिनानिमित्त राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. दि.२०/०९/२०२४ रोजी महाविद्यालयात मस्वच्छ भारत अभियानफ राबविण्यात आले. यावेळी स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी माजी आमदार मा. श्री. वैभवराव पिचड साहेब यांनी राष्ट्रीय छात्र सैनिकांना स्वच्छतेची शपथ दिली.

महाविद्यालयात दि.०१/०५/२०२४ रोजी ममहाराष्ट्र दिनफ दि.१५/०८/२०२४ रोजी स्वातंत्र्य दिन व दि.२६/०१/२०२५ रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. दि.०३/०१/२०२५ रोजी एनसीसी विभागामार्फत ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले.

दि.१५ जून २०२४ ते दि.२४ जून २०२४ या कालावधीत CATC कॅम्प प्रवरानगर येथे घेण्यात आला. दि. ७ जुलै २०२४ ते दि. १६ जुलै २०२४ या कालावधीत CATC कॅम्प अहमदनगर येथे घेण्यात आला. दि.२१ ऑगस्ट २०२४ ते दि. ३० ऑगस्ट २०२४ या कालावधीत CATC व दि.१ सप्टेंबर २०२४ ते दि.१९ सप्टेंबर २०२४ या कालावधीतही CATC कॅम्प अहिल्यानगर येथे घेण्यात आला. बी प्रमाणपत्र परीक्षा २०२५ साठी १६ विद्यार्थी व ५ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले तसेच सी प्रमाणपत्र परीक्षा २०२५ साठी १४ विद्यार्थी व १० विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले. SGT कुमकर माया मानेश- MIRC अहमदनगर(राष्ट्रीय स्तर), SGT वडजे सृष्टी दत्तात्रय - MIRC अहमदनगर(राष्ट्रीय स्तर), गणज गोर्डे मयूर बाळासाहेब- प्रजासत्ताक दिन परेड ग्रुप सिलेक्शन कॅम्प अहमदनगर (राज्य स्तर), गणज गिन्हे विजय भागवत-थल सेना कॅम्प ग्रुप सिलेक्शन कॅम्प अहमदनगर (राज्य स्तर), LCPL पारधी ऋषिकेश बाळासाहेब - बेस्ट कॅडेट या सर्व छात्रांची एनसीसी कॅम्पमध्ये निवड झालेली आहे.

या शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेचा माजी छात्र सैनिक राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन परेड कर्तव्य पद नवी दिल्ली या ठिकाणी झालेल्या पथसंचलनामध्ये त्यांचे रेजिमेंटतर्फे सहभागी झालेला आहे.

*****

## प्रशासकीय कार्यालय

श्री. सीताराम बगाड, प्रबंधक

महाविद्यालयात पदवीसह पदव्युत्तर विभाग, भूगोल संशोधन केंद्र, संगणकशास्त्र व व्यवस्थापन विभाग आणि बी.एस्सी वाईन ब्रेवींग आणि अल्कोहोल टेक्नॉलॉजी असे विविध विभाग कार्यरत आहेत. तसेच बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाविद्यायीन अभ्यास केंद्रामार्फत प्रवेश दिले जातात. चालू शैक्षणिक वर्षात कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालय व पदव्युत्तर विभागातील सर्व वर्गांचे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने झाले. महाविद्यालयाचे स्वत:चे सॉफ्टवेअर आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया, शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड, वार्षिक निकाल व अकाऊंटींग

या ऑनलाईन सुविधांमुळे कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान झाले आहे. चालू शैक्षणिक वर्षात सर्व विभागांची प्रवेशित विद्यार्थी संख्या ४३८८ इतकी आहे.

पंचायत समिती, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, अधिक्षक पे युनिट, अहिल्यानगर, शिक्षण उपसंचालक, शिक्षण सहसंचालक, शिक्षण संचालक पुणे विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरु व महाराष्ट्र शासन स्तरावरील परिपत्रकानुसार महाविद्यालयाकडून मागविलेल्या माहितीवर कार्यवाही होऊन ती वेळेवर पाठविली जाते. शासन व विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रथम वर्ष पदवी व पदव्युत्तर विभागातील सर्व वर्गांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अमंलबजावणी करण्यात आली.

मा. वरिष्ठ लेखा अधिकारी, लेखा पडताळणी पथक (शिक्षण विभाग) अहिल्यानगर यांचेकडून कनिष्ठ महाविद्यालयाचे सन् १९९४-९५ ते सन् २०२३-२४ या कालावधीतील शासन स्तरावरील लेखापरिक्षण झालेले आहे.

*****

## कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

प्रा.प्रेमकुमार माळी

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले एकूण विद्यार्थ्यांपैकी ५० विद्यार्थी (गरीब व होतकरु) सहभागी झाले आहे. विद्यार्थ्यांना या योजनेकरिता सावित्रीबाई फुले विद्यापीठाकडून मानधन दिले जाते. या योजनेसाठी विद्यापीठाकडून अनुदानाचा रुपये १,०९,०००/- प्रथम हप्ता प्राप्त झाला आहे. सदर योजनेवर महाविद्यालयाने रुपये १,१८,०००/- इतका खर्च केला आहे. विद्यार्थ्यांना अर्थिक लाभ रुपये १,१८,०००/- इतका झाला.

*****

## भूगोल संशोधन केंद्र

प्रा. डॉ. विजय भगत

भूगोल संशोधन केंद्रामध्ये एकूण ०७ विद्यार्थ्यांची पीएच.डी.साठी नाव नोंदणी झालेली आहे. त्यापैकी मनिषा नाईकवाडी यांना महाज्योती संशोधन शिष्यवृत्ती मंजूर झाली. तसेच अनिल मेंगाळ या विद्यार्थ्यास केंद्र सरकारच्या आदिवासी विभागाची पीएच. डी. पदवीसाठी संशोधन शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे. या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ३७,०००/- कठअ + पुढील २ वर्षे व ४२०००/- कठअ + शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे. त्यापुढील ३ वर्षे असे एकूण ५ वर्षे ही शिष्यवृत्ती मिळणार आहे.

*****

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

प्रा. डॉ. धनराज हाडुळे

पुणे विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षी दोन कार्यक्रमांसाठी रु.१०,०००/- चे अनुदान मंजूर केले जातात. यावर्षी महाविद्यालयात राष्ट्रीय एकात्मता व महिला सबलीकरण या दोन कार्यक्रमांना विभागाकडून मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यापैकीमहिला सबलीकरण हा कार्यक्रम दि.७ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आला. या कार्यक्रमास अकोलेचे पोलिस निरिक्षक श्री.मोहनराव बोरसे व अकोले न्यायालयाचे वकील भाऊसाहेब गोडसे यांनी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

*****

## परीक्षा विभाग

प्रा. डॉ. व्ही. जी. कोटकर

सन् २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील सर्व वर्गाचे विद्यापीठ परीक्षा फॉर्म भरण्यात आले. तसेच सर्व वर्गांच्या परीक्षा या विद्यापीठ नियमानुसार घेण्यात आल्या. अंतर्गत मूल्यमापन परीक्षा एसवाय/टीवायबीए,बी.कॉम.,बी.एस्सी आणि संगणक शास्त्र व व्यवस्थापन विभाग या विभागांची दि.०९/०९/२०२४ ते दि. १८/०९/२०२४ या कालावधीत घेण्यात आली. प्रथम वर्ष २०२० ची अंतर्गत मूल्यमापन परीक्षा दि.२३/०९/२०२४ ते दि.१६/१०/२०२४ या कालावधीत घेण्यात आल्या. तसेच प्रथम, व्दितीय व तृतीय या वर्गांच्या परीक्षेचे मूल्यमापन महाविद्यालय स्तरावर विद्यापीठ नियमाप्रमाणे करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व परीक्षांसाठी केंद्रीय एकात्मिक व्यवस्थापन व

पारदर्शक पध्दतीने इंटरनेटवर आधारित संगणकीय प्रणाली यशस्वीपणे विकसित करण्यात आली आहे. व्दितीय सत्रातील परीक्षांचे नियोजन विद्यापीठ नियमानुसार करण्यात येणार आहे.

*****

## विज्ञान मंडळ

प्रा.दिपक देशमुख

विज्ञान मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन दि.२६/०७/२०२४ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. डॉ. मुजतबा लोखंडवाला यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना अंधश्रध्दा आणि विज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले.

*****

## ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट सेल

प्रा. डॉ. देवदत्त शेटे

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने मा. प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली मट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट सेलफ सुरु आहे. महाविद्यालयातून पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतानाच उद्योगजगताला आवश्यक असणारे कौशल्य विकसित व्हावे यासाठी रुबिकॉन लिमिटेड या नामवंत कंपनी बरोबर सामंजस्य करार करण्यात आलेला असून गत ४ वर्षापासून अंतिम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना तज्ञ प्रशिक्षकांव्दारे मोफत ट्रेनिंग दिले जाते. महाविद्यालयात On Campus Drive आयोजित केले जातात. तसेच सातत्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व विविध Off Campus Drive च्या संधीही Whatsapp ग्रुपद्वारे पुरविल्या जातात. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अनेक नामवंत कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली आहे. टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस या कंपनीतंर्गत महाविद्यालयातील एकूण ३१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची निवड झाली.

*****

## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

प्रा. डॉ. सुरिंदर बावळे

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शैक्षणिक दिनदर्शिका आणि वेळापत्रक तयार करण्यात आले. नॅक मानांकनासाठी विविध विभागांकडून अहवाल घेऊन फाईल्स अद्ययावत केल्या. महाविद्यालयाची वेबसाईट अपडेट करण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व नॅकसाठी प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे योगदान या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. महाविद्यालयातील नॅकसाठी २०२३-२४ या वर्षाचा अटअठ सर्व क्रायटेरिया प्रमुखांच्या सहकार्याने पूर्ण केला.

*****

## शैक्षणिक व संशोधन विभाग

प्रा. डॉ. शिवाजी खेमनर

अविष्कार संशोधन प्रकल्पफ स्पर्धा दि. २८सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आल्या. सदर स्पर्धेत १२ विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण केले. यातील ०२ विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली. या स्पर्धेतील विद्यार्थ्यांना डॉ. राहुल वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. या विभागातील १५ विद्यार्थ्यांनी ग्राम सर्वेक्षण व शेतीपूरक व्यवसाय परिसंस्था भेट तांभोळ येथे दि.०६/०१/२०२५ रोजी दिली.

'Preparation of Jelly chocolate from dragon Fruits' या संधोधन प्रकल्पाची विभागीय स्तरावर निवड करण्यात आली.

*****

## अगस्त्य नियतकालिक विभाग

प्रा. डॉ. सुनील घनकुटे

महाविद्यालयाचे नियतकालिक 'अगस्त्य'साठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्यांकडून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा, आजची तरुण पिढी आणि प्रसारमाध्यमे, लोकसंस्कृती, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यश-अपयश, शैक्षणिक क्षेत्रातील नैतिकता, शेती माल उत्पादन खर्च व बाजारभाव या विषयांवर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून लेख कविता मागविण्यात आल्या.

*****

## नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यासकेंद्र

प्रा. संदेश कासार

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यासकेंद्र नवीन स्वतंत्र इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आले. नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्रामार्फत केंद्राच्या वतीने स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी या विषयावर प्रा. जुई सुपेकर (दिव्य क्रांती अकादमी,पुणे) यांचे विशेष व्याख्यान दि.०३/०९/२०२४ रोजी आयोजित करण्यात आले. टेलिग्राम या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त अभ्यास-साहित्य पुरविण्यात आले. विविध परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी टेस्ट सिरीजचे आयोजन करण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये केंद्रातील खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले.

१) योगेश पांडुरंग थोरात - पोलीस उपअधीक्षक
२) अक्षय शांताराम पाडेकर- पोलीस उपअधीक्षक
३)सागर पंढरीनाथ शेळके - कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
४)आकाश पंढरीनाथ शेळके- लेखापाल (महावितरण)
५) दत्तात्रय रामकिसन खाटीक - सेट (गणित)

*****

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासक्रेंद्र

प्रा. डॉ. विजय काळे

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अभ्यास केंद्रामार्फत मज्ञानगंगा घरोघरीफ हे ब्रीदवाक्य घेऊन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या अभ्यासकेंद्रात एकूण ५०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्याचबरोबर नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे परिचय सत्र आयोजित करुन त्यांना मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली. विद्यापीठ परिपत्रकानुसार प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे अइउ खऊतयार करण्यात आले.

*****

## वाद-विवाद मंडळ

प्रा.गोरख इदे

आपल्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी आंतर महाविद्यालयीन वादविवाद व वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेऊन प्राविण्य मिळविले. ॲड् एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे पारितोषिके मिळविली आहेत.

१. आरती डोके (टी.वाय.बी.कॉम.) - वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक
२. करिष्मा मधे (एस.वाय.बी.ए.) - वादविवाद स्पर्धेत तृतीय क्रमांक
३. मयुरी कानवडे (एस.वाय.बी.ए.) - वक्तृत्व व वादविवाद चतुर्थ क्रमांक

तसेच आपल्या महाविद्यालयाला वाद-विवाद स्पर्धेतील उत्कृष्ट संघ म्हणून फिरता करंडक मिळाला. सहयाद्री महाविद्यालय, संगमनेर येथे मधे करिष्मा या विद्यार्थिनीचा वक्तृत्व स्पर्धेत चतुर्थ क्रमांक प्राप्त व कला वाणिज्य व विज्ञान कॉलेज, नारायणगांव येथे मयुरी कानवडे या विद्यार्थिनीचा वक्तृत्व स्पर्धेत चतुर्थ क्रमांक प्राप्त झाला.

*****

## माजी विद्यार्थी संघ

प्रा. डॉ. एस. एस. गायकवाड

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये माजी विद्यार्थी संघ कार्यकारिणी सदस्यांच्या एकूण तीन सहविचार सभा महाविद्यालयात पार पडल्या. महाविद्यालयात दि.१/०७/२०२४ रोजी माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. माजी विद्यार्थ्यांकडून एकूण ४९०००/- रु. ची देणगी जमा झाली. माहे जानेवारी २०२५ अखेर माजी विद्यार्थी संघाच्या खात्यावर १,५१,९६५.४७/- इतकी रक्कम जमा आहे. माजी विद्यार्थी संघास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांनी स्व. चिरंजीव डॉ. अविनाश शेळके यांच्या स्मरणार्थ रु.११,०००/- इतकी देणगी रक्कम

दिली.

*****

## स्टाफ ॲकेडमी

प्रा. सुरेश मुठे

दि.२१/०६/२०२३ रोजी महाविद्यालयातील मराष्ट्रीय योग दिवसफ साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या मवाचन संकल्प महाराष्ट्राचाफया उपक्रमांतर्गत प्रत्येक प्राध्यापकाने एक पुस्तकाचे वाचन करुन त्यावर पुस्तक परीक्षण केले.

*****

## बहि:शाल शिक्षण मंडळ

प्रा.भानुदास खताळ

दि.२८/०८/२०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बहि:शाल शिक्षण मंडळ व गृहविज्ञान व संगणक महिला महाविद्यालय लोणी यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय (वक्ता, ग्रंथ अन्वेषक) कृतीसत्रामध्ये प्रा. भानुदास खताळ उपस्थित राहिले. या कृती सत्रामध्ये डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला, यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला व ग्रंथ अन्वेषक यावर चर्चा झाली.

*****

## इस्त्रो व उन्नत भारत अभियान

प्रा. डॉ. सुरिंदर वावळे

आपल्या महाविद्यालयात इस्त्रोमार्फत विविध ऑनलाईन कोर्सेस चालविले जातात. या उपक्रमात महाविद्यालयातील २४ सर्टिफिकेट कोर्स राबविण्यात आले. इस्त्रो मार्फत मोफत चालविल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा ११७२ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या उपक्रमामुळे महाविद्यालयातील ०९ विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाली.

*****

## आरोग्य विभाग

प्रा. प्रेमकुमार माळी

आरोग्य विभागाच्या वतीने दि.४/१०/२०२४ या दिवशी आंतरराष्ट्रीय मपाळीव प्राणी दिनफनिमित्त पाळीव प्राण्यांसाठी लसीकरणाचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती करुन अकोले ग्रामीण रुग्णालयात पाळीव प्राण्यांसाठी लसीकरण याबाबत माहिती दिली. दि.२३/१२/२०२४ रोजी महाविद्यालयात प्राध्यापकांसाठी मप्रकृती परीक्षणफ या ॲपव्दारे प्रकृती परीक्षण करण्यात आले. दि.०८/०१/२०२५ रोजी डॉ. एकता वाबळे-डेरे (मेडीकोर रुग्णालय, संगमनेर) यांचे मकिशोरवयीन मुलींच्या समस्या व आहाराचे महत्त्वफ या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थिनींकरिता व्याख्यान झाले.

*****

## भूगोल विभाग

प्रा. डॉ. विजय भगत

या विभागात नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. प्राध्यापकांनी विविध चर्चासत्र व कार्यशाळांमध्ये सहभाग तसेच विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रम निर्मितीमध्ये सहभाग नोंदविला.

*****

## हिंदी विभाग

प्रा.डॉ.साहेबराव गायकवाड

दि.२२/०६/२०२४ रोजी हिंदी विभागांतर्गत मसंत कबीर जयंतीफ निमित्त संत कबीर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. या विभागांतर्गत मकवि कट्टाफ हा विशेष कार्यक्रम घेण्यात आला. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील कविता वाचन करण्यासाठी विद्यार्थी स्पर्धेत सहभाग झाले. दि.१४/०९/२०२४ रोजी महिंदी दिवसफ महाविद्यालयात साजरा करण्यात आला. दि.०१/०९/२०२४ ते दि.३१/१०/२०२४ या कालावधीत महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी महिंदी पत्रकारिताफ हा कोर्स घेण्यात आला. या अभ्यासक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. साहेबराव गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य होते.

*****

## इंग्रजी विभाग

प्रा.सोपान साळवे

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयात Certificate Course in Spoken English and Basic Grammar हा सर्टिफिकेट कोर्स इंग्रजी विभागांतर्गत राबविण्यात आला. हा कोर्स सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात घेण्यात आला. या विभागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. राहुल पंचम यांनी HRDC सागर मध्यप्रदेश चा Research Ethiics चा ऑनलाईन कोर्स केला.

*****

## मराठी विभाग

प्रा.डॉ.रंजना कदम

दि.०४/०७/२०२४ रोजी भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. तसेच २५ विद्यार्थ्यांनी वारी नृत्य सादर केले. दि.५/०८/२०२४ रोजी मुलांची अभिनय कार्यशाळा घेण्यात आली. दि.२१/०८/२०२४ रोजी प्रथम वर्ष कला वर्गातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ निमित्त गझल सादरीकरणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभाग प्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी गझल सादर केल्या. दि. १८/०८/२०२४ रोजी प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अयोजित प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर करंडक २०२४ स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मपंचमहाभूतेफ या विषयावर पथनाटय सादरीकरण केले. दि.०५/०९/२०२४ रोजी शिक्षक दिन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली. दि.२२/०९/२०२४ रोजी शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी करण्यात आली. दि.०३/०१/२०२५ रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. दि.१२/०१/२०२५ रोजी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. दि.१४ जानेवारी २०२५ ते दि.२८ जानेवारी २०२५ या कालवधीत ममराठी भाषा संवर्धन पंधरवडाफ साजरा करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध, पुणे येथे दि.२८/०१/२०२५ रोजी राज्यस्तरीय कर्मवीर करंडक पथनाटय स्पर्धेमध्ये मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी मसत्य शोध जाणतेफ या विषयाचे पथनाटय सादर केले.

*****

## रसायनशास्त्र विभाग

प्रा. डॉ. एस. एम. सोनवणे

दि.३१/०८/२०२४ रोजी एम.एस्सी. भाग १ या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सतीश परदेशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ममाती परीक्षण सुविधाफ विभागातर्फे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी मसर्टिफिकेट कोर्स इन डेअरी केमिस्ट्रीफहा प्रमाणपत्र कोर्स सुरु आहे.

*****

## गणित विभाग

प्रा. समरीन पठाण

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये गणित विभागांतर्गत दि.२२/१२/२०२४ रोजी मराष्ट्रीय गणित दिवसफसाजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने घेण्यात आलेल्या ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेत ४४ विद्यार्थी सहभागी झाले. तसेच दि.२३/१२/२०२४ रोजी पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा घेण्यात आली. दि.१२/०१/२०२५ रोजी Madhava Mathematics Competition आयोजित केली. या स्पर्धेमध्ये एकूण ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

*****

## ग्रंथालय विभाग

प्रा.प्रदीप बच्छाव

या शैक्षणिक वर्षात अॅपेक्स मुंबई यांचेकडून ४० मासिके खरेदी करण्यात आली. ग्रंथालयात अनेक पुस्तके दानस्वरुपात प्राप्त झाले. या दान स्वरुपातील पुस्तकांतून कै. डॉ. अविनाश शेळके दालन, अकोले व महाराजा सयाजीराव गायकवाड दालन स्थापन झाले. महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मसुवर्ण अगस्त्यफ स्मरणिका व माजी मंत्री स्व.

मधुकररावजी पिचड साहेब यांचे आत्मचरित्र 'कळसुबाईचा शिखरयात्री' ग्रंथालयाच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात आले. या वर्षी श्री. सिध्दीविनायक गणपती मंदिर ट्रस्ट प्रभादेवी मुंबई पुस्तक पेढी योजनेतंर्गत गरीब, होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे सेट उपलब्ध करुन दिले. अगस्ति ग्रंथालयाच्या युटयुब चॅनलवर वाचन प्रेरणा दिनानिमित्त व्हिडीओ स्वरुपात पुस्तक परीक्षणे अपलोड करण्यात आली. डेलनेट, नवी दिल्ली व एन-लिस्टव्दारे ग्रंथालयात ३० लाखाहून अधिक इ-बुक्स व ६००० हून अधिक इ-जर्नल्सचा ॲक्सेस मिळत आहे. यावर्षी ग्रंथालयाची नवीन वेबसाईट htttps:akrc.agasticollege.edu.in तयार करण्यात आली.

आपल्या महाविद्यालयाचे नवीन संकेतस्थळ www.agasticollege.com तयार करण्यासाठी अरनेट, (ERNET -- Educational and Research Network,Govt. of India) नवी दिल्ली (शासकीय डोमेन रजिस्ट्री, भारत सरकार) यांचेकडून नवीन डोमेन खरेदी करण्यात आला. सध्याचे डोमेन कमर्शिअल (.com) असून यावरील वेबसाईट अद्ययावत करण्यासाठी नवीन डोमेन व वेब स्टोरेज खरेदी करण्यात आला. तसेच अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले संस्थेसाठी https://atesakole.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले. वरील डोमेन सेटअप झाला असून त्यावर लवकरच महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी. चे व ग्रंथालयाचे नवीन अद्ययावत संकेतस्थळ विकसीत करण्यात येईल.

आपल्या महाविद्यालयाचे सर्व्हर मे. अगस्ति टेक्नोलॉजी, पुणे यांनी तयार केले असून त्यासाठी यावर्षी नवीन क्लाऊड सर्वरस्पेस खरेदी केला. यामुळे सर्व प्रशासकीय कर्मचारी यांना काम करणे व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेणे, कागदपत्रे अपलोड करणे सोपे झाले आहे.

महाराष्ट्र शासन, शिक्षण सहसंचालक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुरस्कृत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दि.२९/१२/२०२४ ते दि.१६/०१/२०२५ या कालावधीत महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने राबविला. समन्वयक म्हणून ग्रंथपाल प्रा. प्रदीप बच्छाव व प्रा. डॉ. महेजबीन सय्यद यांनी काम केले. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून सहाय्यक ग्रंथपाल डॉ. प्रविण घुले यांनी काम पाहिले.

*****

## भौतिकशास्त्र विभाग

प्रा. डॉ. अशोक दातीर

भौतिकशास्त्र विभागातील तृतीय वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी विभागाच्या वतीने स्वागत समारंभ घेण्यात आला. तसेच दि.०५/०९/२०२४ रोजी 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला.

दि.२७ व दि. २८ जानेवारी २०२५ या दिवशी पिंपरी-चिंचवड विज्ञान केंद्र, पुणे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे अभ्यासाचा भाग म्हणून शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. या विभागामार्फत पुढील शिक्षणासाठीच्या प्रवेश परीक्षांची तयारी वर्ग Advance Learners Scheme या अंतर्गत घेण्यात आले. विभागातील प्रा. दीपक देशमुख या योजनेचे समन्वयक म्हणून काम पाहतात.

*****

## वनस्पतीशास्त्र विभाग

प्रा.डॉ.राहुल वाघमारे

दि.१३/१०/२०२४ रोजी व्दितीय वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमांतर्गत भंडारदरा धरण क्षेत्र दौरा आयोजित करण्यात आला होता. कौशल्य संवर्धन अभ्यासक्रमांतर्गत महाविद्यालयातील प्रथम वर्ष विज्ञान विद्यार्थ्यांना आवळा कँडी, टोमॅटो केचप, टोमॅटो प्युरी इ. तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. सर्व शैक्षणिक उपक्रम शैक्षणिक दिनदर्शिकेनुसार पूर्ण झाले.

*****

## वाईन ब्रेवींग ॲन्ड अल्कोहोल टेक्नॉलॉजी विभाग

प्रा. डॉ. राहुल वाघमारे

प्रथम वर्ष विज्ञान वाईन ब्रेवींग ॲण्ड् अल्कोहोल टेक्नॉलॉजी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे समुपदेशन

करण्यात आले. या वर्षात कौशल्य विकास कार्यक्रम, इंटर्नशिप, वाइन प्रकल्प, रेड वाईन मेकिंग, माल्टप्रीपेरेशन यासारखे आणि इतर अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले.

*****

## प्राणीशास्त्र विभाग

प्रा. सुरेखा गुंजाळ

दि.०१/१०/२०२४ ते दि.०७/१०/२०२४ या कालावधीत मजागतिक वन्यजीव दिनफ निमित्त वन्यजीव संवर्धन सप्ताह कार्यक्रम प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयात घेण्यात आला. या सप्ताहामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वन्यजीवांवर आधारित पोस्टर प्रेझेंटेशन केले. प्राणीशास्त्र विभागांतर्गत प्रथम वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांनी दि.०९/०१/२०२५ रोजी श्रमिक दूध व अन्न प्रक्रिया उद्योग, धांदळफळ येथे क्षेत्र भेट दिली.

*****

## अर्थशास्त्र विभाग

प्रा. डॉ. विश्वनाथ कोटकर

अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात आयोजित स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. या विभागातील तृतीय वर्ष कला (अर्थशास्त्र) या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी असीळर्लीश्रींीरश्र रीज़र्शाळपस ळप खपवळर हा प्रमाणपत्र कोर्स सुरु केला आहे.

*****

## वाणिज्य विभाग

उपप्राचार्य डॉ. सचिन पाळंदे

पदवी व पदव्युत्तर विभागाने दि.०५/०९/२०२४ 'शिक्षक दिन' साजरा केला. वाणिज्य विभागांतर्गत Placement घेण्यात आले. महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. दि.०१/०२/२०२५ रोजी युनियन बजेट २०२५-२६ या सत्राचा ऑनलाईन कार्यक्रम वाणिज्य विभागांतर्गत लाईव्ह दाखविण्यात आला.

या विभागांतर्गत या वर्षाचा वाणिज्य महोत्सव माहे मार्च २०२५ मध्ये घेण्यात आला. तसेच या विभागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले.

*****

## संगणकशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र विभाग

प्रा. काशिनाथ गुंजाळ

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये या विषयासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी जादा तास व सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या विभागातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा व उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. बी.बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक क्षेत्र भेट नाशिक येथे आयोजित करण्यात आली. या चालू शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष बी.बी.ए. आणि बी.सी.ए. या दोन अभ्यासक्रम All India Council for Technical Education- (AICTE) बरोबर संलग्न करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शासनाव्दारे घेण्यात येणाऱ्या सामुदायिक प्रवेश प्रक्रियेसंदर्भात माहिती अकोले तालुक्यातील २५ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेटीव्दारे देण्यात आली.

*****

## तत्वज्ञान विभाग

प्रा. डॉ. धनराज हाडुळे

तत्त्वज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. विजय शेडगे हे नियत वयोमानानुसार दि. ३१ मे २०२५ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा महाविद्यालयात संपन्न झाला. तसेच विभागातील प्रा. डॉ. धनराज हाडूळे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून जगन्नाथ राठी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वर्षी प्रथमच विविध प्रकारची प्रात्यक्षिके प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. तत्त्वज्ञान विभागाचे ॲकडेमीक कॅलेंडर तयार करून त्यानुसार वर्षभर विविध उपक्रम घेतले जातात. उदा: रेमीडियल कोचिंग, लायब्ररी व्हीजीट, वाचन संकल्प, विविध व्याख्याने, विविध

जयंत्या, जागतिक तत्त्वज्ञान दिवस इत्यादी.

*****

## इतिहास विभाग

प्रा. डॉ. किरण जाधव

डेक्कन अभिमत विद्यापीठ पुणे येथील डॉ. पांडुरंग साबळे आणि त्यांचे सहकारी यांनी ऐतिहासिक पुरावे शोधणे आणि संशोधन करणे यादृष्टीने उत्खनन केले. या कामात महाविद्यालय २० विद्यार्थ्यांसह उत्खनन कार्यात सहभागी झाले. कोतुळ येथील उत्खनन कामाचे प्रशिक्षण ह्या Collaborative Work साठी महाविद्यालयाने रु.५०००/- इतके आर्थिक सहाय्य करुन प्रोत्साहन दिले. माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये कोतुळ आणि नाणेघाट येथे वारसा सहलींचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रो. डॉ. किरण जाधव यांचा पंजाबी विद्यापीठ, पतियाळा,पंजाब येथे २८ ते ३० डिसेंबर २०२४ ह्या कालावधीत Indian History congress Aया ८३ व्या सत्रात अजीव सदस्य म्हणून सहभाग घेवून A Study of Cavalry of Chhatrapati Shivaji Maharaj ह्या विषयावर शोधनिबंध सादर केला. तसेच UGC Care List मध्ये समावेश असलेल्या Proceedings of Indian History Congress (ISBN 2249-1937) 2024 मध्ये Trade Prospect of Hormuz in sixteenth and Seventeenth Century ह्या शीर्षकाचा शोधनिबंध प्रकाशित झाला आहे.

*****

## संरक्षण व सामाजिकशास्त्र विभाग

प्रा. भानुदास खताळ

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष कला या वर्गातील या विषयासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले. तसेच या विभागातील विद्यार्थी महाविद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये सहभागी झाले.

*****

## पी. एम. उषा योजना व विद्यापीठ अनुदान आयोग (UGC)

प्रा. प्रदीप बच्छाव

प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) या योजनेसाठी महाविद्यालयाने अर्ज दाखल केला. कागदपत्राची प्रत्यक्ष पडताळणी सदर समितीने एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई येथे केली.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून पूर्वी घेतलेल्या अनुदानाचा हिशोब इ-मेल व्दारे व ऑनलाईन मिटींगव्दारे युजीसी,दिल्ली ऑफिसला पाठविण्यात आला. त्यासाठी प्रबंधक सिताराम बगाड, डॉ. प्रविण घुले, डॉ. राहुल भोसले, प्रा.अश्पाक पठाण यांचे सहकार्य लाभले.

*****

## सामाजिक समता मंडळ व विवेक वाहिनी

प्रा. भानुदास खताळ

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक एकोपा, सहकार्य वृध्दीगत व्हावे यासाठी प्रयत्न केले. तसेच विद्यार्थ्यांकरिता नव मतदार नोंदणी अभियान दि.२५/०१/२०२५ रोजी घेण्यात आले. यावेळी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले.

*****

## नारि मंच, तनिष्का, निर्भय कन्या अभियान

प्रा. कोमल राठी

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये तनिष्कांतर्गत विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक, सामाजिक व वैयक्तिक समस्या निवारण तसेच विद्यार्थिनींचा सर्वांगिण विकास होण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्य विषयक जाणीव, मेंहदी, रांगोळी अशा विविध स्पर्धा घेतल्या. दि.२७/०१/२०२५ रोजी स्वयंसिध्दा या कार्यक्रमासाठी शारदाबाई महाविद्यालय, बारामती येथे १५ विद्यार्थिनी पाठविण्यात आल्या.

दि.०८/०३/२०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त ममाझी आई कॉलेज पाहीफ हा उपक्रम दरवर्षाप्रमाणे राबविण्यात आले. यामध्ये विद्यार्थिनींच्या मातांचे महाविद्यालयात स्वागत करुन विद्यार्थिनी व माता यांचेशी मुक्त संवाद साधला.

*****

## इनोव्हेशन, इनक्युबेशन ॲण्ड् स्टार्टअप सेल

प्रा. दीपक देशमुख

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना आणि उद्योगजकता वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच त्यांच्या स्टार्टअपला पाठींबा देण्याचे काम या सेलव्दारे केले होते. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना वाव, नेटवर्किंगच्या संधी प्रदान करणे, व्यवसायात नाविन्यपूर्ण बदल करण्यासाठी त्यांना मार्गदशन करण्याचे काम या सेलमार्फत केले जाते.

*****

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

प्रा. डॉ. विजय भगत

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून आपल्या महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पदवी (प्रथम वर्ष सर्व शाखा) व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अमंलबजावणी करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यापीठ मार्गदर्शनानुसार महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दि.१८/०६/२०२४ रोजी मराष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जागृती कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आय.क्यु.ए.सी.समन्वयक प्रा. डॉ. संजय ढोले यांचे मार्गदर्शन लाभले. दि.२४/०६/२०२४ रोजी महाविद्यालयात 'NEP २०२० जागृती आणि शास्त्रशुध्द माहितीसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये २०० पेक्षा अधिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले. या कार्यशाळेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे आय.क्यु.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. संजय ढोले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरु प्रा. डॉ. विजय खरे, बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेर या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील व संगमनेर महाविद्यालय, संगमनेर या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळा राबविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अनुदान रक्कम रुपये ५५,०००/- प्राप्त झाली. या कार्यशाळेस तालुक्यातील शेंडी, राजूर, कोतुळ, समशेरपुर, अकोले येथील महाविद्यालयांचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले. तसेच महाविद्यालयात विद्यापीठ मार्गदर्शक सूचनांप्रमाणे स्वतंत्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व Internship कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

पुढील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणीकरिता आपल्या संस्थेतील विविध विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालय इ.९ वी ते इ.१२ वी या वर्गांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी School Connect - 02 या कार्यक्रमांतर्गत 'महाविद्यालय भेट'आयोजित करण्यात आली होती.

*****

## आंतरवासिता कक्ष

प्रा. डॉ. महेजबीन सय्यद

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदव्युत्तर स्तरावर इंटर्नशिपचा समावेश केला आहे. तसेच २०१९ मध्ये चॉइस-बेस्ट क्रेडिट सिस्टम पध्दती लागू झाल्यापासून वाणिज्य शाखेच्या पदवी अभ्यासक्रमात या इंटर्नशिपचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये इंटर्नशिपबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये व्याख्यानांचे आयोजन केले जाणार आहे. शैक्षणिक शिक्षण व व्यावसायिक कौशल्यांमध्ये सहसंबंध निर्माण करण्याकरिता हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा

आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५७ पदव्युत्तर स्तरावरील व ९२ पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे इंटर्नशिप पूर्ण केली.

दि.२५/०७/२०२४ रोजी मा. चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी विद्यार्थी व संस्था प्रतिनिधी यांच्यासाठी दूरदृश्य प्रणालीव्दारे मार्गदर्शन केले.

*****

## आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

प्रा. डॉ. पंकज नाईकवाडी

महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाची आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (अउघतघ) ही नाविन्य पूर्ण योजना सुरु करण्यात आली. सदर योजनेचे उद्घाटन दि.२०/०९/२०२४ रोजी दूरदृश्य प्रणालीव्दारे देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी साहेब यांच्या हस्ते महाविद्यालयात करण्यात आले. याअंतर्गत आपल्या महाविद्यालयात वाणिज्य शाखेसाठी Accounts Assistant व संगणकशास्त्र व व्यवस्थापन विभागासाठी Domestic IT Helpdesk Attendant हे दोन कोर्सेस सुरु करण्यात आले आहेत. सदर कोर्ससाठी ६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

*****

## आमचा मान आमचा सन्मान
## मा.प्राचार्य डॉ. भास्कर शेळके

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात 'सुवर्ण अक्षस्त्य' स्मरणिका संपादक सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने मा. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी प्राचार्य कराडकर, संस्थेचे माजी सेक्रेटरी मा. बाबा मालुंजकर, संस्थेचे माजी विश्वस्त डॉ. बी. जी. बंगाळ, श्री. बाबुराव बाळाजी देशमुख यांना समक्ष भेटून कार्यक्रमाचे निमंत्रण दिले.

सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. सुरेश गोसावी आणि रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. मनोहर चासकर आणि या वर्षाच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा या विद्यापीठाचे कुलगुरु मा. ज्ञानदेव म्हस्के यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करून एकाच वर्षात तीन कुलगुरु महाविद्यालयात निमंत्रित करण्याचा दुर्मिळ योग.

महाविद्यालयाच्या नॅक मुल्यांकनाची तिसरी सायकल पूर्ण व संस्थेच्या इतर ०३ महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकनाच्या तयारीमध्ये सहभाग.

मा. जिल्हाधिकारी यांच्या समवेत युवा ही दुवा तसेच निवडणूक आयोग आयोजित मतदान जागृती कार्यशाळेत सहभाग. याप्रसंगी मा. जिल्हाधिकारी यांचे शुभहस्ते सत्कार.

दि.२५/०६/२०२४ रोजी मराष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० कार्यशाळेत पी. व्ही. पी. महाविद्यालय, लोणी येथे सहभाग तसेच सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर येथे स्कुल कनेक्ट उपक्रमात व्याख्यान

दि.२०/०९/२०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात महिला अत्याचार आणि शिष्यवृत्ती यासंबंधित आयोजित करण्यात आलेल्या सहसंचालक कार्यशाळेमध्ये सहभाग.

संस्थेच्या परफेक्ट इंटरनॅशनल स्कूल मान्यता प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व वसतिगृह विद्यार्थी रसद पुरविली.

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात ०७ पुस्तकांचे परीक्षण व व्हिडीओ विद्यापीठाच्या विशेष पोर्टलवर अपलोड तसेच मनवसाहित्यफया विषयावर व्याख्यान.

दि.२८/०१/२०२५ रोजी तउ छोळपशश म्हणून संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. प्रवेशासाठी काम.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळामध्ये प्राचार्य निवड समितीमध्ये VC Nominee तसेच प्राचार्य निवड समितीमध्ये तज्ञ सदस्य म्हणून १)आश्विन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मांची, २)सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कोळपेवाडी, ३)एस.एस. ढमढेरे महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे, ४)लोकनेते बाळासाहेब थोरात महाविद्यालय तळेगाव दिघे येथे काम करण्याची संधी मिळाली. ५) आमदार शिवाजी कर्डीले कॉलेज ब्रम्हानगर, अहिल्यानगर येथे प्राचार्य मुलाखतीसाठी विषयतज्ञ म्हणून सहभाग.

महाविद्यालयाच्या भूगोल रिसर्च सेंटरमध्ये

दि.२७/०१/२०२५ रोजी पीएच्.डी. प्रवेश समितीचे अध्यक्षपद.

महाविद्यालयातील संगणकशास्त्र व व्यवस्थापन विभागातील बी.बी.ए. आणि बी.सी.ए. या कोर्ससाठी मान्यता मिळाली. तसेच महाविद्यालयात सेतू कार्यालय स्थापनेस मंजूरी व आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजनेस मान्यता मिळविली.

दि.११/०१/२०२५ रोजी राजूर महाविद्यालय येथे कृतार्थ या ग्रंथ प्रकाशन समारंभास उपस्थिती.

दि.२५/१२/२०२४ रोजी कनिष्ठ महाविद्यालय हिवाळी शिबीर, नवलेवाडी व दि.०१/०१/२०२५ रोजी वरिष्ठ महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेच्या तांभोळ,ता.अकोले येथील विशेष हिवाळी श्रमदान शिबिराचे उद्घाटक तसेच संत कोंडाजी बाबा महाविद्यालयाच्या विशेष हिवाळी श्रमदान शिबिराच्या समारोप प्रसंगी उपस्थिती.

दि.२९/०१/२०२५ मध्ये आयसर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्हा व विद्यापीठ पातळीवरी क्रीडा स्पर्धांचे आयोजन व उद्घाटन तसेच आरटीओ, श्रीरामपूर आयोजित मरस्ता सुरक्षा सप्ताहफसमारोप कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे मार्गदर्शन.

सत्ता पदांचे विकेंद्रीकरण करून प्रशासन अधिक गतीमान करण्याचा प्रयत्न केला तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे प्रभावी नियोजन करुन प्रवेश ते परीक्षा विना तक्रार यशस्वीपणे संपन्न.

महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने सन् २०२४-२५ पासून महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभामध्ये मा. प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांनी त्यांचे चिरंजीव कै. डॉ. अविनाश शेळके यांचे स्मरणार्थ मडॉक्टर्स डेफनिमित्त रु.२१,०००/- च्या कायम ठेवीच्या व्याजातून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अत्यंत उत्कृष्ट असे काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यास सन्मानपूर्वक पुरस्कार (सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह).

अकोले तालुक्यातील विद्यालये, महाविद्यालये, वसतिगृहे इ. यांच्या शैक्षणिक विकासासाठी रोख स्वरुपात देणगी दिली.

१)कन्या विद्या मंदिर विद्यालय,अकोले - रु.११,०००/-, २) भारतरत्न राजीव गांधी विद्यालय,धामणगाव आवारी - रु.११,०००/-, ३) श्री. छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, मेहेंदुरी- रु.५,०००/-, ४)अ.ता.ए.सोसायटी वसतिगृह रु.११,०००/-, ५) महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ - रु.११,०००, ६)संस्थेतील इ.१० वी व इ.१२ वी या वर्गात प्रथम येणाऱ्या आणि अगस्ति महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींची प्रवेश फी देण्यात आली. ७) स्व. मधुकरराव पिचड वादविवाद स्पर्धेच्या ट्रॉफी खरेदीसाठी रु.२१०००/- देणगी जाहीर केली.

मा.उपप्राचार्य कॅप्टन डॉ. सचिन अन्तोन पाळंदे :

पदोन्नती - ३

दि.२१/०७/२०२४ ते दि.३१/०१/२०२५ या कालावधीत वाणिज्य विभाग व राष्ट्रीय छात्र सेना विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग.

दि.०९/०१/२०२४ रोजी सहयोगी प्राध्यापक म्हणून पदोन्नती.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उपप्राचार्य, वाणिज्य शाखा म्हणून नेमणूक.

प्रा. डॉ. सचिन पाळंदे यांची राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय कॅडेट कोर मुख्यालय, रक्षा मंत्रालय, नवी दिल्ली या विभागामार्फत लेप्टनंट पदावरुन कॅप्टन या रँकवर पदोन्नती.

दि.११/११/२०२४ ते दि.२३/११/२०२४ या कालावधीत 'Commerce, Accountancy and Management' हा रिफ्रेशर कोर्स राजस्थान विद्यापीठ, जयपूर यामध्ये यशस्वी सहभाग.

शोधनिबंध - ३

AMIERJ या आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलमध्ये 'Reforms in Agriculture' या विषयावर शोधनिबंध प्रसिध्द.

International Research Journal of Management and Commerce या आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलमध्ये 'The agriculture Sector - problems and recommendations' या विषयावर शोधनिबंध प्रसिध्द.

International Research Journal of Management and Commerce या आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलमध्ये 'Global Financial Crisis' या विषयावर शोधनिबंध प्रसिध्द.

सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर येथे आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबाजवणी या कार्यशाळेत वाणिज्य विभाग प्रमुख म्हणून सहभाग नोंदविला.

पुस्तक प्रकाशन -२

Villege Adoption Scheme of SBI ho पुस्तक scientific Internation Public House, TamilNadu येथे प्रकाशित.

Villege Adoption Scheme of SBI ho पुस्तक Alfa Internation Public House, TamilNadu येथे प्रकाशित.

पेटंट प्रकाशन -३

EVALUATING THE INFORMATION SYSTEM MANAGEMENT APPROACH AND ITS RELEVANCE IN IMPROVING BUSINESS in june 2024 या विषयावर पेंटट प्रकाशित.

Maximising Profit : The Role of Technology in Modern Commerce in June 2024. या विषयावर पेंटट प्रकाशित.

3.The Impact of Global Recession on Information technology sector in India, January 2025. या विषयावर पेंटट प्रकाशित.

ई- कंटेंट : २

१. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या महाराष्ट्र शासन पुरस्कृत आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उपक्रमामध्ये 'The Problem of rupee' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन स्कुल ऑफ इकोनॉमिक्स या ठिकाणी सादर केलेल्या प्रंबधनात्मक पुस्तकाचे समीक्षा लेखन.

२.'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या महाराष्ट्र शासन पुरस्कृत आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उपक्रमामध्ये 'Changing India' या डॉ. मनमोहन सिंग, अर्थतज्ञ, माजी पंतप्रधान यांच्या पुस्तकाचे समीक्षा वाचन.

प्रो. डॉ. शिवाजी भगवान खेमनर:

१.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडून राष्ट्रीय सेवा योजना अहिल्यानगर विभागाचे समन्वयक म्हणून नियुक्ती.

२.दि.२७/०१/२०२५ रोजी तउ छोळपशश म्हणून एसएसर्जीएम महाविद्यालय, कोपरगाव येथे विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. प्रवेशासाठी काम.

प्रा. डॉ. सुरिंदर गोपाळराव वावळे :

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्दितीय वर्ष कला या वर्गातील भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमाच्या निमित्तीत सदस्य.

पेटंट : Route follower based shopping robot. या पेटंटला भारत सरकारची मान्यता.

शोधनिबंध :

The Institute of Indian Geographers (IIG) and The Department of Geography at North Eastern Hill University Shillong, Meghalaya, organized an International Conference on "Mapping the future: Geography for a better World" that included a research paper presentation titled "Assessment of Air Quality Index of Pune City in Maharashtra State, India."

## प्रा. डॉ.पंकज हरिभाऊ नाईकवाडी

रसायनशास्त्र विषयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक या विद्यापीठाची Evaluation of Potent Efficacy of Naturally Isolated Antiinflimatory Compunds या विषयावर पीएच्. डी. पदवी प्रदान. दि.१२/०८/२०२४.महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त व महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास रोजगार योजनेअंतर्गत मआचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रफ महाविद्यालयात स्थापन करण्यात आले. या केंद्राचे समन्वयक म्हणून नेमणूक.

पेटंट : Advanced Solvent Impurity Detection Device, dt.13/09/2024 या विषयावर पेंटट प्रकाशित.

शोधनिबंध :राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर

एकूण ०६ शोधनिबंध सादर केले.

1.Stevioside potent anti-inflammatory compound of Woodfordia floribunda Salisb

2.Phorbol is an active anti-inflammatory compound of Woodfordia floribunda Salisb

3.Isolation and Characterization of Lupeol from the leaves of Woodfordia floribunda Salisb and its Antinflammtory activity

4.Ethnopharmacological anti-inflammatory study of phytol in pet ether extract of Woodfordia floribunda Salisb.

